कविकुलगुरु-कालिदास-संस्कृत-विश्वविद्यालयः

This PDF you are browsing now is a digitized copy of rare books and manuscripts from the Jnanayogi Dr. Shrikant Jichkar Knowledge Resource Center Library located in Kavikulaguru Kalidas Sanskrit University Ramtek, Maharashtra.

KKSU University (1997- Present) in Ramtek, Maharashtra is an institution dedicated to the advanced learning of Sanskrit.
The University Collection is offered freely to the Community of Scholars with the intent to promote Sanskrit Learning.

Website
https://kksu.co.in/

Digitization was executed by NMM

https://www.namami.gov.in/

Sincerely,

Prof. Shrinivasa Varkhedi
Hon'ble Vice-Chancellor

Dr. Deepak Kapade
Librarian

Digital Uploaded by eGangotri Digital Preservation Trust, New Delhi
https://egangotri.wordpress.com/

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक
हस्तलिखित संग्रह

दाखल क्र M 1367. विषय अद्वैत वेदान्त.
नाव. श्रीब्रह्मसूत्र चतु:सूत्री भाष्य-व्याख्यानम् (मराठी)
लेखक/लिपीकार श्री. धु. धर्माधिकारी (भाग २) MSS.
पृष्ठ 106. काळ इ.स 1968. पूर्ण/~~अपूर्ण~~

Checked 2012

॥ श्रीः ॥

ब्रह्मसूत्र चतुःसूत्री भाष्य व्याख्यान

भाग २रा

नवीनवही

M 1367
11/12/07

॥ व्याख्यान ॥

उद्देशाने विधान असते. म्हणुन संस्कार्याचे अवच्छेदकत्व वयजात्यवच्छिन्न असलेले माणवकाच्या संस्कार्यत्वाविषयीं नित्यनिमित्त होते. म्हणुन भाष्यरीतीने उपनयनाला अध्ययनार्थत्व असल्यामुळे व त्याला साधिकारत्व असल्यामुळे त्याच्या अधिकाराने अध्ययनविधि साधिकार आहे. व अक्षरग्रहणमात्राने अधिकाराची सिद्धि होते. अर्थावबोध तर कारणान्तरामुळे होतो.

५५।१६

पण तरी " एवमधीतो वेदो धर्मजिज्ञासायाः हेतुर्जातः अनंतरं धर्मो जिज्ञासितव्यः " [पू. मी. भा. १।१।१] अशारीतीने वेदस्य अधीत अन्यनिरपेक्ष धर्म~~ची~~ जिज्ञासेकरितां हेतु आहे. असे मीमांसा भाष्यकार बोलतात. खरें तें तसेच आहे. अन्यथा कोण म्हणतो? अधीत वेद तर अवश्यकरणीय न केली असतां प्रत्यवायाला उत्पन्न करणाऱ्या नित्य नैमित्तिक कर्मांना जाणतो. तो अनंतरच अवश्य विचार करण्यास योग्य आहेत. कारण त्यावाचुन त्यांचे अनुष्ठान कसें होणार? म्हणुन अध्ययनाच्या पूर्वी तो (कर्मविधि) कळत नसल्यामुळे अयोग्यत्वामुळे अधीतवेदत्वच अन्यनिरपेक्ष अर्थावबोधाला हेतु आहे असे सांगितले जाते. तसें ब्रह्मज्ञान न केले असतां प्रत्यवायाला हेतु आहे म्हणुन अवश्य कर्तव्य आहे या विषयीं प्रमाण नाही. म्हणुन अधीत वेदाने धर्मजिज्ञासा अवश्य कर्तव्य आहे. अशी ब्रह्मजिज्ञासा नाही. त्यामुळे भाष्यरीतीने ब्रह्मजिज्ञासेला (= ब्रह्मज्ञानेच्छेला) अधिकार (= प्रारंभ) करिता अयोग्यत्व असल्यामुळे व (कथनाच्या प्रारंभाला) ब्रह्म व त्याच्या ज्ञानाला अनन्यमानत्व असल्यामुळे जिज्ञासा अनुपपन्न आहे. (म्हणुन

मंगळस्यच वाक्यार्थे समन्वयाभवात् । अर्थान्तरप्रयुक्त एव ह्यथशब्दः श्रुत्या मंगळप्रयोजनो भवति । पूर्वप्रकृतापेक्षायाश्च फलतः आनं-

---

॥ व्याख्यान ५

अथशब्द अधिकाराच्या सिद्धीकरितां आनंतर्यार्थीच आहे असा अर्थ)

५८।१

'मंगळस्यच' = मंगळाच्यातर 'वाक्यार्थे' = वाक्यार्थांत 'समन्वयाभावात्' = समन्वयाचा अभाव असल्यामुळे व 'हि' = ज्याअर्थी 'अर्थान्तरप्रयुक्त एव' = अर्थान्तरांत प्रयुक्तच 'अथशब्दः' = अथशब्द 'श्रुत्या' = श्रवणमात्रानें 'मंगलप्रयोजनो भवति' = मंगळफलक होतो. त्या अर्थी 'अथ' शब्द आनंतर्यार्थी ग्रहण केला जातो. प्रारंभार्थी नाहीं हें स्मरणें योग्य आहे असा अर्थ. पण 'अथ' शब्दावरून जर प्रारंभ केल्या जाणाऱ्याहून पूर्वप्रकृतही (= हेतुभूत अर्थाहून अर्थान्तरही) कांहीं नियमानें प्रतीत होते. तर त्याच्या (= अर्थान्तराच्या) प्रतिपत्तीकरितां 'अथ' शब्दाचा ग्रहण केला जात नाही? सांगतो — हें आनंतर्याहून पृथक् नाही. कसें? असें — ते आरंभ केल्या जाणाऱ्याचे नियमानें पूर्ववृत्त असते, जर त्याच्या अनंतर त्याच्याच अपेक्षेनें ते आरंभ केले जात असेल. व असें असतां तो आरंभ केला जाणाऱ्याचा हेतुभूत अर्थ पूर्वी सिद्ध असतो. (त्याच्याहून अर्थान्तर पृथक् नसते) अन्यथा ज्या कोण्या तरी पूर्ववृत्ताची अपेक्षा असतां याला अनुवादत्व व अदृष्टार्थत्वामध्ये एकाचा प्रसंग येतो. (वस्तुतस्याहून आनंतर्य पृथक आहे) म्हणून (फळाकरितां) हेतुभूत अर्थ अपेक्षा करण्यास योग्य आहे. तेंच सांगतात — 'पूर्वप्रकृत'. 'फलतः' = फळावरून किंवा फळाला. 'पूर्वप्रकृतापेक्षायाश्च' = पूर्वप्रकृत हेतु-

तर्याव्यतिरेकात् । सति चानंतर्यार्थत्वे यथा धर्मजिज्ञासा पूर्ववृत्तं वेदाध्ययनं नियमेनापेक्षते एवं ब्रह्मजिज्ञासाऽपि यत्पूर्ववृत्तं नियमेनापेक्षते तद्वक्तव्यम् । स्वाध्यायानंतर्यं तु समानम् ।

॥ व्याख्यान ॥

श्रुत अर्थाची अपेक्षा होत असल्यामुळेच तिच्या बळावर फलाला अर्थान्तरत्व असतां 'आनंतर्यात्' = आनंतर्याहून अर्थान्तराच्या 'अव्यतिरेकात्' = भेद नसल्यामुळे = आनंतर्यामध्ये अर्थान्तराच्या अंतर्भाव होत असल्यामुळे असा अर्थ. अथशब्दाने त्याला सांगणे वृथा असून हेतु फलभाव ज्ञाना करिता आनंतर्याला सांगणे अवश्य असल्यामुळे 'अथ' शब्द आनंतर्यार्थी आहे असा अन्वय. ज्याकोणाहून अर्थान्तर अथशब्दाने समर्पण केले जाते याची 'च' शब्दाने व्यावृत्ति केली आहे 'सति च आनन्तर्यार्थत्वे' = अथशब्दाला आनन्तर्यार्थत्व असतांही 'यथा धर्मजिज्ञासा' = जशी धर्मजिज्ञासा 'पूर्ववृत्तम्' = पूर्वी सिद्ध झालेल्या 'वेदाध्ययनम्' = वेदाध्ययनाला 'नियमेनापेक्षते' = नियमाने अपेक्षित करिते 'एवं ब्रह्मजिज्ञासाऽपि' = याप्रमाणे ब्रह्मजिज्ञासाही 'यत्पूर्ववृत्तम्' = ज्या पूर्ववृत्ताला 'नियमेनापेक्षते' = नियमाने अपेक्षित करिते 'तद्वक्तव्यम्' = त्याला सांगितले पाहिजे. 'स्वाध्यायानंतर्यं तु' = स्वाध्यायाध्ययनाच्या अनंतरत्व तर 'समानम्' = समान आहे ज्याच्यावाचून नियमाने अनंतराचा (जिज्ञासेचा) आरंभ होणार नाही. तो त्याप्रकारच्या हेतू पूर्वी सिद्ध झालेला सांगितला पाहिजे कीं ज्याच्या अनंतर ब्रह्मजिज्ञासा

नन्विह कर्मावबोधानन्तर्यं विशेषः । न । धर्मजिज्ञासायाः प्रागप्यधीत-

॥ व्याख्यान ॥

प्रारंभ केला जातो. स्वाध्याया (= स्वशाखीय वेदा) चे अध्ययन तर समान = धर्म व ब्रह्मजिज्ञासेंत साधारण हेतु आहे. म्हणून 'अथातो ब्रह्मजिज्ञासा' अशा रीतीने पुनः अथशब्दाने तन्मात्राची अपेक्षा करणे व्यर्थ होते. अथवा 'समान' = अत्यंत अपेक्षित नाही = स्वतः च सामर्थ्य उत्पन्न करण्याकरिता व प्रयोजित करण्याकरिता शक्त नाही. म्हणून समान हेतु = अवश्य निष्पादक नाही. असा अर्थ.

'नन्विह' = पण येथें ब्रह्मविचारांत 'कर्मावबोधानंतर्यं विशेषः' = कर्मावबोधाहून आनंतर्य हा विशेष आहे? तसेंच दुसऱ्या वृत्तींत वर्णन केले आहे "कर्मणामधिकारपरंपरया शक्तितो वा संस्कारतया वा यथाविभागं तादर्थ्यावगमात् निःश्रेयसप्रयोजनत्वाच्च आनंतर्यवचनोऽथशब्दोऽधिगतानंतरमिति" (= शब्द प्रमाणावरून कर्मांच्ये अधिकार [= प्रवृत्ति] परंपरेने किंवा संस्कारतेने [= फलपरंपरेने] विभागानुसार तादर्थ्य [= ब्रह्मज्ञानार्थत्व] कळत असल्यामुळे व मोक्ष प्रयोजनत्व असल्यामुळे आनंतर्यवचन असलेला अथशब्द धर्मज्ञानानंतर आहे. असे) अन्यांनीं देखील स्ववृत्तींत वर्णन केले आहे. — तेथे (स्ववृत्तीत) 'अथ व अतः' शब्द प्रथमच्या अध्यायांत प्रथमसूत्रांत (असे) वर्णित आहेत — 'अथेति पूर्वप्रकृतां धर्मजिज्ञासामपेक्ष्यानंतरं ब्रह्मजिज्ञासा प्रारभ्यते । अत इति पूर्वविहितस्यैवार्थस्य हेतुता भाव्यते ब्रह्मजिज्ञासां प्रतीति' शाबर सांगतात 'न' = नाही. कारण 'धर्मजिज्ञासायाः प्रागपि' = धर्मविचाराच्या पूर्वीही 'अधीत-

इप. दा. पृ. ५८५. १८

वेदान्तस्य ब्रह्मजिज्ञासोपपत्तेः ।

॥ व्याख्यान ॥

वेदान्तस्य - वेदान्तांचे अध्ययन केल्याने 'ब्रह्मजिज्ञासोपपत्तेः' = ब्रह्मविचाराची उपपत्ति होते. वेदान्ताध्ययन केवळ जरी पुष्कळ कारण नाही. तरी त्याच्यावाचून ब्रह्मजिज्ञासा उपपन्न होत नाही. धर्मावबोधावाचूनही तर उपपन्न होते असा अभिप्राय. कशी? तेथें तर धर्मजिज्ञासेंत तीन वृत्तान्त आलेले आहेत - द्वादशलक्षणीत (=अध्यायांत) प्रतिपादन केलेले न्यायसहस्र, त्यांच्या अनुग्रहाने झालेला वाक्यार्थनिर्णय, व अग्निहोत्रादिकर्मे. त्यांत जो प्रथमसूत्रांत "अथ शब्दाच्या ग्रहणाने सूचित, स्वाध्यायाच्या अर्थावबोधांत उपयोगाच्या प्रतिपत्तीला हेतु न्याय व जो औत्पत्तिक सूत्रांत शब्द व अर्थाच्या संबंधाच्या नित्यत्वाने वेदान्तांच्याही अपौरुषेयत्व कारणाने अनपेक्षत्व नामक प्रामाण्याकरितां कारण सांगितले. ते दोन्ही अपेक्षितत्वामुळे येथेही उपयोगाला प्राप्त होवो. इतर न्यायकलापाचा तर ब्रह्मजिज्ञासेंत उपयोग नाही. कारण येथे निरस्त अशेषप्रपंच ब्रह्मात्मैकत्व प्रतिज्ञात आहे. व तेथें याच्या प्रतिपादनांत किंवा याच्या प्रतिपादन सामर्थ्यांत शब्दाचा कोणी न्याय सांगितला नाही. जे पुनः या तंत्रांतही प्रथम तंत्र सिद्ध न्यायांचे उपजीवन आहे. ते सगुणविद्याविषयक आहे. तेथे तर मानसी क्रिया उपासना अनित्यफल अशी विधेय आहे. ती धर्मविशेषच आहे. म्हणून अशा रीतीने तेथील न्यायकलापाचा ब्रह्मविषयांत उपयोग नाही. म्हणून त्याच्या अपेक्षेने अथ शब्द नाही. जे पुनः स्वाध्यायाच्या अर्थावबोधांत उपयोगाविषयी व अनपेक्षत्वाने स्वतः प्रामाण्यसिद्धीविषयी

॥ व्याख्यान ॥

न्यायद्वय सांगितले. त्यांची अपेक्षा असूनही स्वाध्यायाप्रमाणेच केवळ (=पुरेसे) ब्रह्मजिज्ञासा कारण नाही. म्हणून त्याच्या अपेक्षेने अथ शब्द नाही. आतां जो वाक्यार्थनिर्णय तो कोणत्याही रीतीने ब्रह्मजिज्ञासेंत उपयोगी पडत नाही. अन्यविषयक ज्ञान तर अन्यप्रवृत्तीत हेतु नाही. जसें अनुमानादिकांत (धूमज्ञान अग्नीच्या उपयोगी आहे) तसें कदाचित (अन्यविषयक ज्ञान अन्याच्या) ज्ञानांत उपयोगी होईलही. तरी येथे नाही. कारण धर्म व ब्रह्म त्यांच्या संबंधाला निरूपण करिता येत नाही. म्हणून कर्मांचा उपयोग शेष राहतो. तसेंच वृत्तिकारांनी ही लिहिले आहे - "कर्मणा मधिकार परंपरया शुद्धतां संस्कारतया वा यथा विभागं तादर्थ्यावगमात्" असें. येथे हे निरूपण केले जाते की - ही अधिकार परंपरा कोणती? किंवा तादर्थ्य कसे? जशी तर प्रासादावर आरोहण करण्याची इच्छा करणाऱ्यास क्रमशः प्राप्त होणारी सोपानपरंपरा प्रासादाच्या आरोहणाला हेतु असते. तशी येथे ब्रह्मजिज्ञासेची इच्छा करणाऱ्यास सहस्रसंवत्सरपर्यंत केलेली कर्मे लब्धक्षिमेच्या हेतुत्वाने प्रमाणाभावामुळे क्षयित नाहीत पण कामापहत मनस त्याच्या अभिमुख असलेला ब्रह्मजिज्ञासेस अवतीर्ण होत नाही. कर्मांनी तर कामाची शांति झाली असतां त्याच्या उपशमामुळे ब्रह्मजिज्ञासेंत अवतीर्ण होतो. तशीच कर्मे अश्वमेध इत्यादि पापासून उत्तरोत्तर शतगुणा फल्यांत (असत्यफले) अवस्थित असलेल्या ब्रह्मलोकाच्या प्राप्तिपर्यंतच्या कामांना अधिकार परंपरेने प्राप्त करणारी, ब्रह्मलोकाच्या परकाम्यतेच्या अभाव असल्यामुळे व निर्विषय कामाची अनुपपत्ति असल्यामुळे दग्धेन्धनाग्नीप्रमाणे कामाचा उपशम झाला असतां ब्रह्मजिज्ञासा करितो. मग कर्मानुष्ठाना-

च्या आनंतर्य म्हटले पाहिजे. कर्मावबोधाच्या आनंतर्य नव्हे. व कामाची प्राप्ति कामाच्या उपशमाला हेतु कशी? दृष्टान्तसामर्थ्यावरून जसा अग्नि हविने वर्धमान ही सर्व हवींच्या प्रक्षेप झाला असतां सर्वांना दग्ध करून स्वतः शमित होतो. याप्रमाणे विषयेंधन काम विषय असे पर्यंत वर्धमान ही त्यांचा क्षय झाला असतां क्षीण इन्धनाग्नि प्रमाणे स्वतः शमित होतो हें युक्त आहे? युक्त खरें जर हिरण्यगर्भाचा उपभोग क्षीण होणार नाही. परंतु कृतकत्वामुळे व परिच्छिन्नत्वामुळे त्यापुढे क्षीण होतो व त्याचा क्षय असतां पूर्वीप्रमाणे प्राप्त न झालेला व प्राप्त करावयाच्या काम सम्यक् उद्भासित असतातच. म्हणून विषयांच्या क्षयादि दोषदर्शनामुळे हिरण्यगर्भालाही कामाचा उपशम होतो. तसेंच म्हटले आहे– "ज्ञानमप्रतिघं यस्य वैराग्यं च जगत्पतेः। ऐश्वर्यं चैव धर्मश्च सहसिद्धं चतुष्टयम्॥" [ ] असे. म्हणून सर्वत्र विषयदोषदर्शनच कामाच्या उच्छेदाला कारण आहे. निरवयवत्वदर्शनही आहे. कारण "रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते।" [भ.गी. २।५९] अशी स्मृति आहे. (काम 'रस' शब्दाचा अर्थ आहे.) अशा तऱ्हेने गुणांच्या आगम नाही कीं– हिरण्यगर्भाच्या निखिल विषयांची प्राप्ति झाली असतां कामाचा उच्छेद होतो. पण कामाची प्राप्ति झाली असतां स्वस्थहृदय कार्यान्तरांत समर्थ होतो. असे हे सर्वांना स्वसंवेद्य आहे! खरें तें कामाच्या उत्कृष्टतेच्या उपशमामुळे आहे. त्याच्या उत्कृष्टतेचा उपशम नाही. तेव्हां सामर्थ्यहानीमुळे आहे. सामर्थ्य असतां तर स्वच्छंद उपभोग।

संभवतो. जर पुनः अत्यंत निवृत्तकाम होईल तर पुनः त्यांविषयाला आसक्तीने प्राप्त करणार नाही. म्हणून कर्मांना कामाच्या विनाशाच्या द्वाराने ब्रह्मजिज्ञासायोगमता प्रापकत्व नाही. म्हणून
पृ ६०।१८
कर्मावबोधाच्या अपेक्षेनेही 'अथ' शब्द नाही. मग संस्कारांच्या द्वाराने कर्मांना पूर्ववृत्तत्व असो. कारण "यस्यैते (अष्टा) चत्वारिंशत्संस्कारा अष्टौ चात्मगुणाः स ब्रह्मणः सायुज्यं गच्छति" [गौ.स्मृ. अ.८] अशी. "महायज्ञैश्च यज्ञैश्च ब्राह्मीयं क्रियते तनुः" [मनु २।२८] "ज्ञानमुत्पद्यते पुंसां क्षयात्पापस्य कर्मणः। यथाऽऽदर्शतलप्रख्ये पश्यत्यात्मानमात्मनि" [महाभा. शांतिप. २०४।८] अशाही स्मृति आहे. व "तमेतं ...विविदिषन्ति यज्ञेन दानेन तपसाऽनाशकेन" [बृ. ४।४।२२] अशी. "येन केनचन यजेतापि दर्वीहोमेनानुपहतमना एव भवति" [ ] व अशीही श्रुति आहे. सूत्रकारही पुढें सांगणार आहेत– म्हणूनच आश्रमकर्मांची अपेक्षा आहे असे. (विहितत्वाच्चाश्रमकर्मापि [ब्र.सू. ३।४।३२] या सूत्रांत) "सर्वापेक्षा च यज्ञादिश्रुतेरश्ववत्" [ब्र.सू.
पृ. ६१-१
३।४।२६] असेही. असे खरें. जर समानजन्मांत अनुष्ठित कर्म संस्कार करीत ब्रह्मजिज्ञासेच्या योग्यत्वाला हेतु होईल. जे यौगिक फळांस तर कालनियम नसतो. त्याने पूर्वजन्मांत अनुष्ठित कर्मांनी संस्कृत, धर्मजिज्ञासा व त्याच्या अनुष्ठानाला प्राप्त न होणाराच ब्रह्मजिज्ञासेत प्रवृत्त होतो. म्हणून नियमाने त्याची अपेक्षा करण्याकरिता "अथ" शब्द युक्त होत नाही. याने म्हणजे प्रकरणद्वारानेही नियमाने कर्मांचे पूर्ववृत्तत्व निराकृत झाले. तशाच श्रुतिस्मृति आहेत– "यदि वेतरथा ब्रह्मचर्यादेव प्रव्रजेत्"

यथाच हृदयादि अवदानानामानन्तर्यनियमः क्रमस्य विवक्षितत्वा-
न्न तथेह क्रमो विवक्षितः। शेषशेषित्वेऽधिकृताधिकारे वा प्र-

॥ व्याख्यान ॥

[जाबाल०] "तस्याश्रमविकल्पमेके ब्रुवते" [ ] म्हणून 'धर्मजिज्ञासायाः प्रागप्यधीतवेदान्तस्य ब्रह्मजिज्ञासोपपत्तेः' हें योग्य म्हटलें

१७।२

हें ही असो. पण हेतुत्वानें पूर्वी सिद्ध झालेल्या कर्मावबोधाच्या अपेक्षेनें 'अथ' शब्द आम्ही म्हणत नाही. परंतु क्रमाच्या प्रतिपत्तिकरितां म्हणतों. जसें "हृदयस्याग्रेऽवद्यत्यथ जिह्वाया अथ वक्षसः" [तै०सं० ६।३।१०।४] असा. तेथें अवदानाच्या क्रमज्ञानाकरितां 'अथ' शब्द आहे, तसा येथें आहे? तें हें ही न्यायसूत्रांत अमुक आहे. पुनः एककर्तृक अशा पुष्कळ कर्मांच्या युगपत् अनुष्ठानाच्या असंभवामुळें क्रम अवश्यंभावि असतां त्याचा नियम अथ शब्द सांगेल ही. परंतु एककर्तृत्व तर शेषशेषींना (=अंगअंगींना) वा एकशेषीच्या संबंधी बहु शेषांना वा बहुत्या अधिकारानें प्रवृत्तांना वर उपजीवींना असतें. इतरयांना नसतें. धर्म व ब्रह्म जिज्ञासेंना तर त्यांच्यापैकीं एकत्व असण्याविषयीं प्रमाण नाही. तेंहें सांगतात- 'यथाच'- पुनः ज्याप्रमाणें 'हृदयादि अवदानानाम्'= हृदयादि अवदानांच्या 'क्रमस्य विवक्षितत्वात्'= क्रमाच्या विवक्षितत्वामुळें 'आनन्तर्य नियमः'= आनंतर्याचा नियम आहे, 'तथा इह'= तसा येथें= धर्म व ब्रह्मजिज्ञासेत 'क्रमो न विवक्षितः'= क्रम विवक्षित नाही. कारण 'धर्मब्रह्मजिज्ञासयोः' = धर्मब्रह्मजिज्ञासेंच्या 'शेषशेषित्वे'= अंगांगी भावाविषयीं 'वा अधिकृताधिकारे'

प्रमाणाभावात्, धर्मब्रह्मजिज्ञासयोः फलजिज्ञास्यभेदाच्च। अभ्युदय-
फलं धर्मज्ञानम् तच्चानुष्ठानापेक्षम्। निःश्रेयसफलं तु ब्रह्मविज्ञानम्।

॥ व्याख्यान ॥

= किंवा अधिकृताच्या अधिकाराविषयीं 'प्रमाणाभावात्'= प्रमाणाचा अभाव आहे. आतां जसें आग्नेयादि सहा यागांचें एक फल स्वर्गविशेष आहे. तसें धर्म व ब्रह्मजिज्ञासेचें ही एक फल स्वर्ग (मोक्ष) आहे. त्यामुळें क्रमाची अपेक्षा असतां त्याच्या नियमार्थीं 'अथ' शब्द आहे. किंवा जसें चारही लक्षणांनीं (=अध्यायांनी) एक धर्म प्रासंलक्षण अंशान्तर परिशोधनेंसें जिज्ञास्य आहे. किंवा जसें याच तंत्रांत चारही लक्षणांनीं (=अध्यायांनी) एक ब्रह्म जिज्ञास्य आहे व तेथें अंशान्तर परिबोधनानें लक्षणांचा क्रमनियम आहे. तसें तंत्रक्रमानें एक ब्रह्म (वेदार्थ) जिज्ञास्य असून तेथें क्रमनियमार्थ 'अथ' शब्द आहे? अशी आशंका असतां सांगतात- 'फलजिज्ञास्यभेदाच्च'= धर्म व ब्रह्म जिज्ञासेच्या फल व जिज्ञास्यांत भेद असल्यामुळें ही क्रम विवक्षित नाही. असा अनुषंग. त्याच भेदाला सांगतात- 'अभ्युदयफलम्'= अभ्युदय= स्वर्गादि सुख ज्याचें फल आहे. असें 'धर्मज्ञानम्' धर्माचें ज्ञान आहे 'तच्चानुष्ठानापेक्षम्'= व तें ज्याला अनुष्ठानाची अपेक्षा आहे असें आहे. धर्म ज्ञानाचें अभ्युदय फल आहे असें प्रसिद्धच आहे. त्याविषयीं कोणाचा विवाद नाहीं. तरी ज्ञानाचें फल नाहीं परंतु ज्ञेयाचें= धर्माचें आहे. त्याचहीं ज्ञेयत्वामुळें व फल नाहीं. परंतु अनुष्ठेयत्वामुळें आहे. 'निःश्रेयसफलं तु'= मोक्ष ज्याचें फल आहे असें तर 'ब्रह्मविज्ञानम्' ब्रह्माचें विज्ञान आहे.

नचानुष्ठानान्तरापेक्षम्। भव्यश्च धर्मो जिज्ञास्यो, न ज्ञानकालेऽस्ति। पुरुषव्यापारतंत्रत्वात्। इह तु भूतं ब्रह्म जिज्ञास्यम्, नित्यत्वान्न पुरुषव्यापारतंत्रम्। चोदनाप्रवृत्तिभेदाच्च।

॥ व्याख्यान ॥

'नचानुष्ठानान्तरापेक्षम्'- त्याला तर दुसऱ्या अशा अनुष्ठानाची अपेक्षा नाही. ब्रह्मज्ञानाचे फळ मात्र तर नित्यसिद्ध अव्यवहित व स्वसंवेद्य आहे. कारण अविद्यामात्राचा क्षय आहे. व अविद्येला निवृत्त न करीत विद्या उदयाला प्राप्त होत नाही. म्हणून अशा रीतीने अत्यन्त विलक्षणत्वामुळे व प्रस्थानभेदामुळेही[फ्र] फळद्वाराने एकत्र त्यांची प्राप्ति नाही. त्याने तत्र ज्याला क्रमाची आकांक्षा नाही. जिज्ञास्य पुनः अत्यन्त विलक्षण आहे असे सांगतात - 'च'= तसें 'भव्यः धर्मः'= कार्य असा धर्म 'जिज्ञास्यः' प्रथमसूत्रांत जिज्ञासेचे = विचाराचे प्रमेय आहे; 'न ज्ञानकालेऽस्ति'= कारण तो ज्ञानकाळी नसतो. मग तु पुढे आहे? नाही असे सांगतात - 'पुरुषव्यापारतंत्रत्वात्'- कारण तो पुरुषाच्या व्यापाराच्या अनुष्ठानाच्या स्वाधीन आहे. अनुष्ठानाधीनत्वामुळे ज्ञानकाळी त्याचे असत्त्व आहे; ब्रह्म त्यामुळे नाही असा अर्थ. धर्माहून ब्रह्माचे वैलक्षण्य सांगतात - 'इह तु'= येथें उत्तरसूत्रांत तर 'भूतं ब्रह्म जिज्ञास्यम्'= सिद्ध ब्रह्म जिज्ञास्य आहे; 'नित्यत्वात्'= कारण ते नित्य सत्य आहे; 'न पुरुषव्यापारतंत्रम्'= त्यामुळे ते पुरुषाच्या व्यापाराधीन नाही. (पूर्वोत्तरसूत्रांचे यथार्थरूपाने जरी जिज्ञास्यैक्य असले, तरी धर्मब्रह्मांत स्वरूपतः अत्यंत वैलक्षण्य असल्यामुळे धर्म ब्रह्म उपाधीने एकत्र असता त्यांच्यांत जिज्ञास्यैक्य नाही, असा अर्थ.)

फ्र 'प्रस्थानभेदामुळेही'- साधनवैकल्यामुळेही

या हि चोदना धर्मस्य लक्षणं सा स्वविषये नियुञ्जाना एव पुरुष-

॥ व्याख्यान ॥

जिज्ञास्यांत स्वरूपतः भेद सांगून प्रमाणतः भेद सांगतात - 'च'= पुनः 'चोदनाप्रवृत्तिभेदात्'= वेदवाक्यांच्या प्रवृत्तींत = बोधकतेंत भेद असल्यामुळे जिज्ञास्यांत भेद आहे असा अर्थ. अज्ञातज्ञापक वेदवाक्य येथें चोदना शब्दाचा अर्थ आहे; हे दुसरे प्रमाणाच्या उपाधीने प्रमेयाचे वैलक्षण्य आहे; धर्मे चोदना (क्रियेत प्रवर्तक वाक्य तर) पुरुषाला प्रेरित करणारी विषयाचे ज्ञान नसतां प्रेरित करण्यास असमर्थ असलेली विषयालाही बोधित करीते. (स्वविषयांत प्रेरित करीतच बोधित करीते.) ब्रह्मीं (चोदना) प्रमाण तर केवळ बोधितच करीते. अवबोधांत पुरुष प्रेरित केला जात नाही; कारण अवबोध वस्तूच्या अनुसार व प्रमाणाच्या अनुसार उत्पन्न होतो. तो पुरुषाच्या इच्छेलाही अनुसरत नाही. तव्हां तेथें (पुरुष) कसा प्रेरित केला जाईल? जसे इंद्रिय व अर्थांचा सन्निकर्ष झाला असतां त्या सन्निकर्षाने इन्द्रियांनी केलेल्या अर्थज्ञानांत पुरुष नियोजित केला जात नाही त्याप्रमाणे. कारण इच्छा नसतांनाही ते स्वतः उत्पन्न होतें. ब्रह्मांत तर नित्यसिद्धत्वामुळे प्रेरणा संभवत नाही. (त्यामुळे) भाष्यांत 'ब्रह्मचोदना' येथे चोदनाशब्द प्रमाणविवक्षेने प्रयुक्त आहे प्रेरणाविवक्षेने नाही; तेच सांगतात - 'या हि'= 'हि' निश्चयें करून 'या'= जी 'चोदना'= प्रवर्तक श्रुतिवाक्य, 'धर्मस्य लक्षणम्'= धर्माचें लक्षण आहे; 'सा स्वविषये'= ती स्वविषयांत = धर्मांत 'नियुञ्जाना एव'= प्रेरित करीतच 'पुरुषं'

= पुरुषावा -

मवबोधयति। ब्रह्मचोदना तु पुरुषमवबोधयत्येव केवलम्, अवबोधस्य चोदनाऽजन्यत्वान्न पुरुषोऽवबोधे नियुज्यते। यथाऽक्षार्थसन्निकर्षेणार्थावबोधे तद्वत्। तस्मात्किमपि वक्तव्यं यदनन्तरं ब्रह्मजिज्ञासोपदिश्यत इति।

॥ व्याख्यान ॥

'अवबोधयति' = जाणवितें. 'ब्रह्मचोदना तु' = ब्रह्मबोधक वाक्य तर 'पुरुषं अवबोधयत्येव केवलम्' = पुरुषाला केवळ अवबोधितच करितें (प्रेरित करीत नाही) कारण 'अवबोधस्य चोदनाऽजन्यत्वात्' = अवबोधाला ब्रह्मप्रमाण वाक्याकडून प्रवर्तकद्वाराने जन्यत्व नसल्यामुळे 'पुरुषो अवबोधे न नियुज्यते' = पुरुष अवबोधांत प्रेरित केला जात नाही. 'यथाऽक्षार्थसंनिकर्षेण' = जसें इंद्रिय व विषयांच्या सन्निकर्षाने 'अर्थावबोधे तद्वत्' असणाऱ्या होणाऱ्या अर्थावबोधांत (पुरुष नियोजित केला जात नाही) त्याप्रमाणे. म्हणून अशारीतीनें तत्त्वज्ञानाला जिज्ञास्याच्या ऐक्यामुळेही (जिज्ञास्याचे ऐक्य नसल्यामुळेही) क्रमाची अपेक्षा नाही. कीं ज्याने त्याच्या अपेक्षेने अथ शब्दाचे व्याख्यान केले जाईल. उपसंहार करितात – 'तस्मात्' = म्हणून = अशारीतीनें अथ शब्दाला अर्थान्तराच्या असंभव असल्यामुळे आनंतर्यवाचित्व असतां त्याच्या अवधित्वाने 'किमपि' = कांहीतरी पुष्कळ कारण 'वक्तव्यम्' = सांगितलें पाहिजे कीं – 'यदनन्तरम्' = ज्याच्या अनंतर सूत्रकाराकडून 'ब्रह्मजिज्ञासोपदिश्यते' = ब्रह्मजिज्ञासा उपदेशिली जाते. इति

उच्यते – नित्यानित्यवस्तुविवेकः, इहामुत्रार्थफलभोगविरागः, शमदमादिसाधनसंपत्, मुमुक्षुत्वं च।

॥ व्याख्यान ॥

६३।२१

शङ्काप्रश्नाच्या परिसमाप्तिकरितां आह· 'उच्यते' = सांगतो – 'नित्यानित्यवस्तुविवेकः' = आत्मा नित्य असून त्याच्याहून अन्य सर्व अनित्य आहे असा विवेक. 'इहामुत्रार्थफलभोगविरागः' = या लोकांतील व स्वर्गलोकांतील जे विषय त्यांच्यापासून होणारा जो सुखरूपी फलभोग त्यापासून चित्ताची विरक्तता. 'शमदमादिसाधनसंपत्' = शमदम उपरम तितिक्षा श्रद्धा व समाधान ही षट्साधनसंपत्ती. 'मुमुक्षुत्वं च' = व मोक्ष मला व्हावा अशी इच्छा मुमुक्षा तिचा भाव मुमुक्षुत्व.

६२।२२

पूर्वी सांगितलें कीं – 'अथ' शब्दाला अधिकारार्थत्व (= प्रारंभार्थत्व) असतां प्रवृत्तीच्या अभावामुळे शास्त्रारंभाला वैयर्थ्य येतें. प्रवृत्तीच्या अभावाविषयी कारण ही सांगितलें कीं – केली जाणारी ब्रह्मजिज्ञासा हिरण्यगर्भप्राप्तिपर्यंत अखिल भोगापासून निवृत्त करिते. त्याने तिच्यापासून लोकाला उद्वेग प्राप्त होतो. तेव्हां तेथें प्रवृत्ति कोठून? म्हणून जेथपर्यंत या हिरण्यगर्भप्राप्तिपर्यंत भोगाचे उत्पत्ति व परिच्छेदाच्या योगाने विनाशित्वामुळे अनित्यत्व जाणत नाही, वरं नाश होत असेल तरी कूटस्थनित्यवस्तुपर्यंतच नाश होतो. अन्यथा निरुपादानाच्या पुनः उत्पत्तीचा असंभव आहे. म्हणून वर्तमानाचाही असंभवामुळे अभाव होईल. कारण असें निरूपण करितां येतें. (असें जाणून) – जेथपर्यंत नित्यानित्यवस्तुविवेक होत नाही तेथपर्यंत विरक्त होत नाही. यज्ञा·

तेषु हि सत्सु प्रागपि ब्रह्मजिज्ञासाया ऊर्ध्वं च शक्यते ब्रह्मजिज्ञासितुं ज्ञातुं च, न विपर्यये। तस्मादथशब्देन यथोक्तसाधनसंपत्त्यानन्तर्यमुपदिश्यते।

॥ व्याख्यान ॥

प्रमाणे अग्निप्रवेशाकरिता स्रक् चंदन वस्त्र अलंकार भोगांना भोगणाऱ्याच्या अभिमुख व नाश दिसतो त्याप्रमाणे जेथपर्यंत भोगांना भोगणाऱ्याचाही अभिमुख व नाश दिसत असल्यामुळे व भोगार्थ ज्या पापजनित दुःखानुभवामुळेही त्याच्या निमित्ताने सुखलेशही प्राप्त न होणारा भोगापासून विरक्त (न) होऊन तदनंतर विराग ज्याचे साधन आहे अशा शम, दम, उपरम, तितिक्षा, समाधान, श्रद्धेने संपन्न (न) होऊन जेथपर्यंत मुमुक्षुत्वाला आलंबन करीत नाही, तेथपर्यंत ब्रह्मजिज्ञासेला कोण प्राप्त होईल? किंवा कोण्या रीतीने दैववशामुळे किंवा गुरुहठामुळे किंवा बहुश्रुतत्व बुद्धीने प्रवृत्त झाला तरी संशयरहित ब्रह्माला आत्मत्वाने जाणण्याकरिता समर्थ होत नाही. कारण यथोक्त साधनसंपत्तीच्या विरहामुळे अंतर्मुखचित्त नसलेला बाह्य अभिमानवान् असतो. म्हणून वर्णित वस्तुकलापाहून आनंतर्याला अभिप्रेत करून 'अथ' शब्दाला बादरायणाचार्य प्रयोजित करीत असे ते भाष्यकार सांगतात— 'हि' निश्चयार्थक करून 'तेषु सत्सु' ती चार साधने असता 'प्रागपि धर्मजिज्ञासायाः' धर्मजिज्ञासेच्यापूर्वीही 'ऊर्ध्वं च' नंतरही 'ब्रह्मजिज्ञासितुं ज्ञातुं च' ब्रह्मविचार करण्यास व जाणण्यास 'शक्यते' शक्य होते 'न विपर्यये' ती साधने नसतां नाही. 'तस्मादथशब्देन' म्हणून अथ शब्दाने 'यथोक्तसाधनसंपत्त्यानंतर्यम्' = सांगितलेल्या साधनसंपत्तीहून आनंतर्य 'उपदिश्यते' उपदेशिले जाते.

अतः शब्दो हेत्वर्थः। यस्माद्वेद एवाग्निहोत्रादीनां श्रेयःसाधनानामनित्यफलतां दर्शयति— "तद्यथेह कर्मचितो लोकः क्षीयत एवमेवामुत्र पुण्यचितो लोकः

६३।१५ ६३।१५ ॥ व्याख्यान ॥

'अतः शब्दो हेत्वर्थः' 'अतः' म्हणून शब्द हेतूच्या अर्थी आहे. आक्षेपाच्या निरासाकरिता हेतूचा अनुवादक आहे. असा अर्थ. (मध्यस्थ-) कोणता हा आक्षेप? त्यावर सांगतो— हें असो पण कृतकत्व व परिच्छेद अवश्य नाशाला जाणवीत नाहीत कारण यत्प्रमाणे लोक कृतक पाकज लोहित्याला व परिच्छिन्न अशा त्यांनाही नित्यत्व मानलेले आहे. वेदांतही "अक्षय्यं ह वै चातुर्मास्ययाजिनः सुकृतं भवति" [शत.ब्रा.२।६।३।१] "अपाम सोमममृता अभूम" [ ] इत्यादि पुण्यफलाच्या अक्षय्यत्वाचे श्रवण आहे. म्हणून विषयभोगापासून नियमाने निवृत्तांना ही विराग नाही. कूटस्थ[1] नित्य वस्तूच्या संबंधाने मुमुक्षुत्वही नाही. त्यामुळेच शमदमादिकांचा परिग्रह नाही. कारण भोक्त्याला तादात्म्याचा संभव नाही. त्याची प्राप्ति ही पुरुषार्थ नाही. कारण दुःखाच्या अभाव असतां ही सुखभोगाचा अभाव असल्यामुळे निर्दोष पुरुषार्थ नाही. म्हणून अजीर्ण[2] भयामुळे आहाराचा परित्याग नाही. किंवा भिक्षूच्या भयामुळे स्थालीचे चुलीवर न ठेवणे नाही. तर दोषांच्या नाशाविषयीं प्रयत्न करावा असा न्याय आहे. म्हणून साधनचतुष्टयाला ब्रह्मजिज्ञासेत हेतुत्व नसून—

१— अतः अशी आशंका असतां त्याच्या हेतुत्वप्रदर्शनाकरिता 'अतः' शब्द आहे. कसा? ते सांगतात— 'यस्मात्' = ज्याअर्थी 'तद्यथेह कर्मचितो लोकः क्षीयत एवमेवामुत्र पुण्य-

---

॥ टिप्पणी ॥

[1] प्रत्यक्षसंबंधाला असंभावितत्व असल्यामुळे तदर्थीची श्रवणादिकांत प्रवृत्ति नाही असे सांगतो - कूटस्थनित्य [2] सकलसुखरहित अवस्थान प्राप्तीपेक्षा दुःखमिश्रही सुखाची प्राप्ति श्रेष्ठ- कारण लोकांत तसें दिसते असा अर्थ

क्षीयते" [छां०८।१।६] इत्यादिः तथा ब्रह्मविज्ञानादपि परमपुरुषार्थं दर्शयति — "ब्रह्मविदाप्नोति परम्" [तै०२।१] इत्यादिः। तस्माद्यथो-

॥ व्याख्यान ॥

चितो लोकः क्षीयते इत्यादि" — म्हणून जसा या लोकांत कर्मानें संपादन केलेला लोक क्षीण होतो, तसाच परलोकी पुण्याने संपादन केलेला लोक क्षीण होतो इत्यादि. 'वेद एव' = वेदच 'श्रेयः साधनानां अग्निहोत्रादीनाम्' = श्रेयःसाधन अशा अग्निहोत्रादिकांच्या 'अनित्यफलतां दर्शयति' = अनित्यफलता दाखवितो. पण पुण्याला ही अक्षय्य फलत्व वेदच सांगतो! असें सांगितले? नाही कारण वस्तुबलाने प्रवृत्त अनुमानाचा (= अनुमानाने अनुगृहीत श्रुतीचा) विरोध असतां अर्थवाद अशा त्याला नित्यत्व प्रतिपादनाचे सामर्थ्य नाही परमाणु ना व पाकज अशा त्यांच्या लौहित्य गुणाला ही अनित्यत्व[1] आहे. म्हणून विषयभोगांचे अनित्यत्वदर्शन मुमुक्षुत्वाला हेतु होते. जे पुन्हा मुमुक्षुत्वाच्या अभावा विषयीं निमित्त[2] सांगितले त्यावर सांगतात - 'तथा' = तसें 'ब्रह्मविदाप्नोति परमित्यादिः' = ब्रह्मवेत्ता परमपुरुषार्थाला प्राप्त होतो इत्यादि वेद "ब्रह्मज्ञानादपि परमपुरुषार्थं दर्शयति" = ब्रह्मज्ञानापासून परमपुरुषार्थाला ही = दुःखात्यंत निवृत्ति परमानंद प्राप्तीला ही दाखवितो. जीवब्रह्मैक्याच्या अध्यासाला सांगितले असल्यामुळे अन्यत्वाचा संभव सांगितल्याचा असा भाव. 'म्हणून उपसंहार करितात - 'तस्मात्'

॥ टिप्पणी ॥ [छां०८।१।६]

[1] 'अनित्यत्व आहे' कारण "यत्कृतकं तदनित्यम्" "यदल्पं तन्मर्त्यम्" इत्यादि न्याय व श्रुतींचा विरोध असल्यामुळे. हें नैयायिकांच्या मिथ्यात्व मात्राने निरसित आहे असा अर्थ. [2] 'निमित्त सांगितले' = जीवब्रह्माच्या तादात्म्याचा असंभव दाखवी लिपीत असा अर्थ

क्तसाधनसंपत्त्यनन्तरं ब्रह्मजिज्ञासा कर्तव्या। ब्रह्मणो जिज्ञासा ब्रह्मजिज्ञासा। ब्रह्म च वक्ष्यमाणलक्षणं "जन्माद्यस्य यतः" इति [ब्र०सू०१।१।२]

॥ व्याख्यान ॥

= त्यामुळे 'यथोक्तसाधनसंपत्त्यनन्तरम्' = सांगितलेल्या साधनसंपत्तीच्या नंतर 'ब्रह्मजिज्ञासा कर्तव्या' = ब्रह्मज्ञानाकरिता विचार करावा. ज्या अर्थी हेतु परिपूर्ण आहेत अनंतर अवश्य कार्य आरंभ केले जाते त्या अर्थी 'कर्तव्या' अशी आवश्यकता भाष्यकार सांगतात. ज्या अर्थी द्वैताच्या संबंधाने अतितर उद्वेगाला प्राप्त होणाऱ्याने व ब्रह्मात्मत्व हस्तप्राप्तप्रमाणे मानणाऱ्याने ब्रह्मजिज्ञासेत - जसे प्रदीप्त शिराने जलराशींत व अग्रपादस्थ अंगुल्यग्राने सुस्वादु फलाला स्पर्श करणाऱ्याने त्याच्या ग्रहणांत लागणे. प्रवृत्त होणेच योग्य आहे असें असतां सामर्थ्यावरून धर्मजिज्ञासेचे नियमाने पूर्ववृत्तत्व 'अथ' शब्दाने पूर्वोक्त न्यायाने निराकृत केले जाते. 'ब्रह्मणो जिज्ञासा ब्रह्मजिज्ञासा' = ब्रह्माची जिज्ञासा = जाणण्याची इच्छा ती ब्रह्मजिज्ञासा. (प्रकृती कथिता लक्षणेने) अंतर्गत विचारांत अन्वय असतां तर चतुर्थी समास होईल. शब्दाभिधेयांत (= शब्दांनी सांगितलेल्या मुख्य वाच्यार्थांत) नाही. म्हणून अवयवार्थाचा अंगीकार करून षष्ठी ~~समास~~ समास दाखविला. ब्रह्मशब्दाच्या अर्थाच्या निर्देशाचा अवसर प्राप्त असतां त्याला सूचकाच्य पुढें सांगणार आहेत असें सांगतात 'ब्रह्म च' = ब्रह्म तर 'जन्माद्यस्य यतः इति' = ज्याच्यापासून जगाचे जन्मादिक होतात असें 'वक्ष्यमाणलक्षणम्' = पुढें ज्याचे लक्षण सांगितले आहे असें आहे. तर्थे जे अन्य शंका

अत एव न ब्रह्मशब्दस्य जात्याद्यर्थान्तरमाशंकितव्यम्। ब्रह्मण इति कर्मणि षष्ठी न शेषे, जिज्ञास्यापेक्षत्वाज्जिज्ञासायाः। जि-

---

यांनी ब्रह्मशब्दाच्या अर्थान्तराची आशंका करून निरसन केले आहे कीं— निश्चयें करून ब्रह्मशब्दाने येथें ब्राह्मणजाति ग्रहण केली जात नाही. कारण तिला प्रत्यक्षसिद्धत्व असल्यामुळे जिज्ञास्यत्वाच्या अभाव आहे. तिच कर्तृक जिज्ञासा ही नाही कारण त्रैवर्णिकांचा अधिकार आहे. जीवाचा परिग्रहही नाही. कारण त्याला कर्तृत्व असतां विवेकादि विशेषणाला आनर्थक्य येते. कर्मत्व असतां नित्यसिद्धत्व आहे. शब्दराशी (=वेद) चेही ग्रहण नाही. कारण तिचे धर्मजिज्ञासा व औत्पत्तिक सूत्रांनीं अर्थवत्त्व व प्रमाणत्व निरूपित केले आहे. हिरण्यगर्भाचेही नाही. कारण त्याच्या प्राप्तिपासून ही विरक्तता ब्रह्मजिज्ञासेचा उपयोग होतो. तत्कर्तृकताही नाही. कारण ज्ञानवैराग्याचा सहसिद्धत्व आहे — असें तें अर्थान्तरही करू नये. असें सांगतात - 'अत एव' म्हणूनच, (=जगत्कारणत्व प्रतिपादक सूत्राशी असांगत्य प्रसंगामुळेंच) 'ब्रह्मशब्दस्य' = ब्रह्मशब्दाच्या 'जात्याद्यर्थान्तरम्' = जात्यादि अर्थान्तराची 'न आशंकितव्यम्' = आशंका घेऊं नये. ६।२३ 'ब्रह्मण इति कर्मणि षष्ठी' = ब्रह्माची ही कर्मांत षष्ठी आहे, दुसऱ्या वृत्तींत तर ती शेषलक्षणा व्याख्यात आहे। तिचा निरास करितात - 'न शेषे' = संबंधसामान्यांत नाही. त्याविषयी हेतु सांगतात = 'जिज्ञास्यापेक्षत्वाज्जिज्ञासायाः' = कारण जिज्ञासेला जिज्ञास्याची = प्रमेयाची = कर्माची

ज्ञास्यान्तरानिर्देशाच्च। ननु शेषषष्ठीपरिग्रहेऽपि ब्रह्मणो जिज्ञासाकर्मत्वं न विरुध्यते। संबंधसामान्यस्य विशेषनिष्ठत्वात्। एवमपि प्रत्य-

---

अपेक्षा असते. पण अन्य प्रमाणसिद्धकत्वाचे कर्म असो व ब्रह्म शेषितेने (प्रधानतेनें) संबंधाला प्राप्त होणारी ? त्यावर सांगतात- 'जिज्ञास्यान्तरानिर्देशाच्च' = व दुसऱ्या जिज्ञास्याचा तर येथें निर्देश नाही. श्रुतकर्माचा लाभ असतां अश्रुतकल्पना योग्य नाही. असा भाव. पुनः शेषषष्ठीवादी बोलतो- 'ननु शेषषष्ठीपरिग्रहेऽपि' = पण शेषषष्ठीचे ग्रहण असतांही 'ब्रह्मणो जिज्ञासाकर्मत्वं न विरुध्यते' = ब्रह्माला जिज्ञासेचे कर्मत्व विरुद्ध येत नाही 'संबंधसामान्यस्य विशेषनिष्ठत्वात्' = कारण संबंधसामान्याचा विशेषांत निष्ठत्व आहे. जरी "षष्ठी शेषे" [पा. सू. २।३।५०] अशा रीतीने संबंधमात्रांत षष्ठी विहित आहे. तथापि व्यवहार विशेषाचे आलंबन करितो. संबंधविशेषही पृथक आहेत. त्यांत अवश्य एकादा ग्रहण करण्यास योग्य आहे. अन्यथा व्यवहाराची अनुपपत्ति होते. त्यांत प्रकरण व उपपद यांविशेष हेतूचा अभाव असल्यामुळे व सामर्थ्यावरून विशेष क्रियेचे ग्रहण असल्यामुळे कारकत्वानें च क्रियासंबंध आहे. त्यांतही सकर्मक क्रियेचा कर्मकारक अभ्यर्हित असल्यामुळे ब्रह्माला कर्मत्व विरुद्ध येत नाही असा अर्थ. असें असले तरी साधारण शब्दांत अभिप्रेत अर्थाला सोडून दुसऱ्या अर्थाचा ग्रहण करून पुनः त्याच्या द्वाराने अभिप्रेत अर्थाचा ग्रहण करण्याचा व्यर्थ प्रयास आहे. तें सांगतात - 'एवमपि' = असें असले तरी. 'प्रत्यक्षम्' = (जिज्ञासा) सूत्राने वाच्यार्थानें किंवा

स्वं ब्रह्मणः कर्मत्वमुत्सृज्य सामान्यद्वारेण परोक्षं कर्मत्वं कल्पयतो व्यर्थः प्रयासः स्यात्। न व्यर्थः ब्रह्माश्रिताशेषविचारप्रतिज्ञानार्थत्वादिति चेन्न। प्रधानपरिग्रहे तदपेक्षितानामर्थाक्षिप्तत्वात्।

॥ व्याख्यान ॥

प्रथमपक्षाने सांगितलेल्या 'ब्रह्मणः कर्मत्वमुत्सृज्य' = ब्रह्माच्या कर्मत्वाचा त्याग करून 'सामान्यद्वारेण' = प्रथम सामान्य संबंधाची कल्पना करून त्याच्या द्वाराने 'परोक्षम्' = आर्थिक अर्थात् किंवा भागाने अपेक्षेने प्राप्त झालेल्या 'कर्मत्वं कल्पयतः' = कर्मत्वाची कल्पना करणाऱ्यास 'व्यर्थः प्रयासः स्यात्' = व्यर्थ श्रम आहेत. पण व्यर्थ काय म्हणून सामान्याने शेष षष्ठीचे ग्रहण केलें असतां जे किंचित ब्रह्मसंबंधी ज्याच्या ज्याच्या जिज्ञासेवाचून ब्रह्म जिज्ञासित होत नाही. ते सर्व जिज्ञास्यत्वाने प्रतिज्ञात होते म्हणून विशिष्ट संबंध विवक्षित नाही. कारण सामान्यात त्याचाही अंतर्भाव होतो? असें जर (पूर्वपक्षाभिप्रेत) म्हणणे असेल तर सांगतात- 'न व्यर्थः' = व्यर्थ नाही. 'ब्रह्माश्रिताशेषविचारप्रतिज्ञानार्थत्वात्' = कारण त्याला ब्रह्माश्रित अशेष-अशा लक्षणादिकांच्या विचाराच्या प्रतिज्ञानार्थत्व आहे. 'इति चेत्' = असें म्हणाल तर 'न' = नाही. कारण 'प्रधानपरिग्रहे' = सूत्राने प्रत्यक्ष सांगितलेल्या प्रधान = मुख्य ब्रह्माचा विचार करितां स्वीकार केला असतां = प्रतिज्ञा केली असतां 'तदपेक्षितानां' त्याला अपेक्षित अशा उपकरणादिकांच्या विचारांना 'अर्थाक्षिप्तत्वात्' सामर्थ्यावरून आक्षिप्तत्व प्रतिज्ञातत्व आहे. हें संक्षेपाने वस्तुसंग्रह वाक्य आहे. याचाच

'लक्षणादिकांच्या' - येथील आदिशब्दाने प्रमाण युक्ति ज्ञानसाधन व फल यांचे ग्रहण जाणावें.

ब्रह्म हि ज्ञानेनाप्तुमिष्टत्वात् प्रधानम्। तस्मिन्प्रधाने जिज्ञासाकर्मणि परिगृहीते यैर्जिज्ञासितैर्विना ब्रह्म जिज्ञासितं न भवति तान्यर्थाक्षिप्तान्येवेति न पृथक् सूत्रयितव्यानि। यथा राजाऽसौ गच्छतीत्युक्ते

॥ व्याख्यान ॥

सदृष्टान्त विस्तार करितात- 'ब्रह्म हि ज्ञानेनाप्तुमिष्टतमत्वात्प्रधानम्' = ब्रह्म तर ज्ञानाने प्राप्त करण्याकरितां इष्टतम असल्यामुळे प्रधान आहे; 'तस्मिन्प्रधाने जिज्ञासाकर्मणि परिगृहीते' = तें प्रधान ब्रह्म जिज्ञासेचें कर्म ग्रहण केलें असतां "यैर्जिज्ञासितैर्विना ब्रह्म जिज्ञासितं न भवति" = ज्यांची जिज्ञासा केल्यावाचून ब्रह्म जिज्ञासित होत नाही 'तान्यर्थाक्षिप्तान्येव' = ती लक्षणप्रमाणादिक सामर्थ्याने करून आक्षिप्तच आहेत. 'इति न पृथक् सूत्रयितव्यानि' = म्हणून पृथक् सूचित करण्यास योग्य नाहीत. 'यथा राजाऽसौ गच्छतीत्युक्ते' = जसें हा राजा गमन करितो असें म्हटलें असतां 'सपरिवारस्य राज्ञो गमनमुक्तं भवति तद्वत्' = राजाचें परिवारासह गमन सांगितलें असें होतें त्याप्रमाणें. ज्या अर्थी ब्रह्माची प्राप्ति परम पुरुषार्थ आहे. त्यानें तें ज्ञानाने प्राप्त करण्यास इष्टतम आहे. म्हणून त्याच्याकरितां असलेल्या प्रवृत्तीचें ते प्रधान आहे. त्या प्रधानाची जिज्ञासा केली असतां ज्यांची जिज्ञासा केल्यावाचून त्याची जिज्ञासा संपूर्ण होत नाही ते सामर्थ्यावरूनच त्याच्याकरितां जिज्ञासित केले जातात. ते पृथक् सांगण्याचें कांहीं कार्य नाही. जसें 'हा राजा गमन करितो' असें सांगितलें असतां जेवढ्या परिवारावाचून राजाचें गमन संपन्न होत नाही तेवढ्यांचें गमन अ-

सपरिवारस्य राज्ञो गमनमुक्तं भवति तद्वत्। श्रुत्यनुगमाच्च। "यतो वा इमानि भूतानि जायन्ते" [तै. ३।१] इत्याद्याः श्रुतयः "त-

॥ व्याख्यान ॥

[illegible]वरून आक्षिप्त आहे. म्हणून लोकांत पृथक् सांगितले जात नाही. त्याप्रमाणे येथेही स्वरूप (=लक्षण) प्रमाण युक्ति साधन व प्रयोजन (=फल) ब्रह्मज्ञानाच्या परिपूर्णतेकरिता अर्थावरून (=सामर्थ्यावरून) जिज्ञास्य आहेत. म्हणून पृथक् सूचित करणास योग्य नाहीत. पुनः शास्त्रप्रवृत्तीच कर्मांत षष्ठीला जाणविते. कशी? असं-तर शास्त्र आरंभ करणास योग्य आहे. "पुण्यचितो लोकः क्षीयते" इत्यादि श्रुतीवरून व न्यायावरून पुण्याचा क्षय दिसत असल्यामुळे विरक्ताला "ब्रह्मविदाप्नोति परम्" इत्यादि श्रुतीवरून ब्रह्मज्ञानापासून परमपुरुषार्थाची सिद्धि होते म्हणून त्याच्या ज्ञानाची इच्छा करणाऱ्यास "यतो वा इमानि भूतानि जायन्ते" इत्यादि श्रुतीकडून त्याच्या प्रतिपादनपूर्वक "तद्विजिज्ञासस्व" असें साक्षात्च जे ब्रह्माचे कर्मत्वेंच ज्ञेयत्वेन प्रतिपादन आहे तें हें "अथातो ब्रह्मजिज्ञासा" असें सूचित आहे. त्याने कर्मषष्ठीचा परिग्रह केला असता श्रुतीला अपेक्षित न्यायाचा सूचनपर सूत्र तिला अनुगत होते. अन्यथा लक्ष्याला अननुगत असंबद्ध होईल. त्याला सांगतात 'श्रुत्यनुगमाच्च' = श्रुतीच्या अनुसार सूत्र प्रतिपादन करीत असल्यामुळेसुद्धा ही कर्मणि षष्ठी आहे असा संबंध. हें वस्तुसंग्रह वाक्य असून याचाच विस्तार करितात "यतो वा इमानि भूतानि जायन्ते इत्याद्याः श्रुतयः" = निश्चयेकरून

द्विजिज्ञासस्व तद्ब्रह्म" [तै. ३।१] इति प्रत्यक्षमेव ब्रह्मणो जिज्ञासाकर्मत्वं दर्शयन्ति। तच्च कर्मणि षष्ठीपरिग्रहे सूत्रेणानुगतं भवति। तस्माद्ब्रह्मण इति कर्मणि षष्ठी। ज्ञातुमिच्छा जिज्ञासा। अवगतिपर्यंतं ज्ञानं सन्वाच्याया इच्छायाः कर्म। फलविषयत्वा-

॥ व्याख्यान ॥

ज्याच्यापासून ही भूतें उत्पन्न होतात इत्यादिक श्रुति 'तद्विजिज्ञासस्व तद्ब्रह्म इति प्रत्यक्षमेव' = त्याला जाणण्याची इच्छा कर तें ब्रह्म आहे असें प्रत्यक्षच्-शब्देंच 'ब्रह्मणो जिज्ञासाकर्मत्वं दर्शयन्ति' = ब्रह्माला जिज्ञासेचे कर्मत्व दाखवितात. "तच्च कर्मणि षष्ठीपरिग्रहे सूत्रेणानुगतं भवति" = तेंतर कर्मांत षष्ठीचे ग्रहण केलें असतां सूत्राने अनुसरलें असें होतें. 'तस्माद्ब्रह्मण इति ६।१२ कर्मणि षष्ठी' = म्हणून ब्रह्मणः ही कर्मविषयक षष्ठी आहे. 'ज्ञातुमिच्छा जिज्ञासा' = जाणण्याची इच्छा ती जिज्ञासा. अशरीतीने इच्छेला दाखविण्याकरिता जिज्ञासापदाच्या अवयवार्थाला सांगतात. व ~~[illegible]~~ इच्छेचा फलविषयत्व असल्यामुळे वस्तुच्या ज्ञानाचा अवगतिपर्यंतता प्रतीत होते. तें सांगतात - 'अवगतिपर्यंतं ज्ञानम्' = अनुभवपर्यंत ज्ञान (हेंच फल आहे). 'सन्वाच्याया इच्छायाः कर्म' १ = सन्प्रत्ययाच्या इच्छेचें कर्म आहे. 'फलविषयत्वादिच्छायाः' = कारण इच्छेला फलविषयत्व आहे. अवगति शब्दानें साक्षात् अनुभव सांगितला जातो. ज्ञानंतर परोक्ष विषयांत अनुभव अनारूढ होतही संभवते. असंनिहितताही असंभावित विषयांत

टिप्पणी

१ 'ज्ञानंतर' पण प्रथम अवगति उत्पन्न होते ती सांगतात - 'ज्ञानंतर' शब्दावरून परोक्ष सेन कळले असतां अपरोक्ष ज्ञानाची इच्छा केली जाते असा अर्थ. जेंव्हा पुनः शब्दापासून अपरोक्ष ज्ञान उत्पन्न होतें त्यावर सांगतात - 'असंनिहितही' त्या

दिच्छायाः । ज्ञानेन हि प्रमाणेनावगन्तुमिष्टं ब्रह्म । ब्रह्मावगतिर्हि पुरुषार्थः । निःशेषसंसारबीजाद्यनर्थनिबर्हणात् ।

॥ व्याख्यान ॥

तें अनिश्चित रूप असतें असें पूर्वी सांगितलें. तें सांगतात – 'ज्ञानेन हि प्रमाणेन' 'हि' निश्चयेकरून (ज्ञायते अनेन इति ज्ञानं या करण व्युत्पत्तीवरून) ज्ञान = तदाकार वृत्ति या प्रमाणानें 'अवगंतुमिष्टं ब्रह्म' = ब्रह्म साक्षात् करण्याकरितां = अभिव्यक्त करण्याकरितां किंवा निश्चित करण्याकरितां इष्ट आहे. 'ब्रह्मावगतिर्हि पुरुषार्थः' = कारण ब्रह्मस्वरूपाचा साक्षात्कार पुरुषार्थ आहे. "निःशेषसंसारबीजाद्यनर्थनिबर्हणात्" – कारण ती (= ब्रह्मावगति) सकळ संसाराला कारण अशा अविद्येला व तीजन्य अहंकारादि संसारानर्थांना नाश करिते. ९८/१८ तें हें शास्त्राच्या अंतर्भूत सूत्र आहे. व यानें प्रयोजनाच्या (= अधिकाऱ्याच्या) संबंधें जिज्ञासा व मुमुक्षा यांच्यांत ~~स्वतः~~ कारणान्तरानें सिद्ध झालेला (= मुमुक्षेला) प्रवृत्तीनें हेतुत्व (अथ अतः शब्दाच्या) सामर्थ्यावरून ग्रहण केलें. व तिच्या अनंतर तिनें प्रयुक्त दुसरीला (= जिज्ञासेला) कर्तव्यता श्रुतार्थानें सांगितली. तो येथें हा जाणतो कीं – 'मला हें ज्ञान कर्तव्य आहे' परंतु उपाय जाणत नाही. म्हणून त्याला उपाय सांगितला पाहिजे. शास्त्राचीही संबंध अभिधेय (= विषय) प्रयोजनें सांगितलीं पाहिजेत. इतरथा प्रेक्षा (= बुद्धि) इच्छेप्रमाणे सर्व प्रवृत्त होईल. म्हणून या सूत्रानें हेंही सर्व सूचित आहे. असें कथन करण्याकरितां सांगतात–

तस्माद् ब्रह्म विजिज्ञासितव्यम् ।

॥ व्याख्यान ॥

'तस्मात्' = म्हणून = विशिष्ट अधिकाऱ्यादिकांची सिद्धि होत असल्यामुळे मुमुक्षूनें 'ब्रह्म विजिज्ञासितव्यम्' = ब्रह्मज्ञानाकरितां विचार कर्तव्य आहे. येथील 'तव्य' प्रत्ययानें 'सन्' प्रत्ययाला विचाराचें लक्षकत्व सूचित केलें आहे. म्हणून अंतर्गत विचाराच्या विधेयत्वाच्या अंगीकारानें ब्रह्म (ज्ञानाकरितां) मीमांसा करण्यास योग्य आहे, असा अर्थ. येथें हें सांगितलें – ब्रह्मज्ञानकाम्यानें हें शास्त्र श्रवण करण्यास योग्य आहे कारण ब्रह्मज्ञानाला या शास्त्रानें निरूपण केलें आहे. त्यानें प्रयोजनाला (= अधिकाऱ्याला) अभिमत उपाय शास्त्र आहे. म्हणून सामर्थ्यावरून शास्त्राचे संबंध विषय प्रयोजन कथन केलें असें होतें.

॥ असे व्याख्यानांतील तृतीयवर्णक समाप्त झालें ॥

भाष्य

॥ अथ विषयादिकाच्या आक्षेपाच्या परिहाररूपी चतुर्थ वर्णक

भाष्य

॥ अथ विषयादिकाच्या आक्षेपपरिहाररूपी चतुर्थ वर्णक ॥

तत्पुनर्ब्रह्म प्रसिद्धम् अप्रसिद्धं वा स्यात् । यदि प्रसिद्धं न जिज्ञासितव्यम् । अथाप्रसिद्धं[११] नैव शक्यं जिज्ञासितुमिति ।

॥ व्याख्यान ॥ जिज्ञासा=

[५] पुनः ते ब्रह्म प्रसिद्ध आहे? किंवा अप्रसिद्ध? जर प्रसिद्ध आहे तर (विचार) करण्यास योग्य नाही. आतां अप्रसिद्ध आहे तर विचार करणें शक्यच नाही. अशा रीतीनें प्रयोजन विषय संबंधांना आक्षिपित करितो. कसें? प्रसिद्ध शब्दानें प्रतिपन्न (= ज्ञात) सांगितलें जातें. तें जर अन्य कोण्या प्रमाणानें प्रतिपन्न आहे तर या शास्त्राचा विषय नाही. कशामुळे कारण अप्रतिपन्नत्वानें विषयता असते परंतु तें प्रतिपन्न असतां शास्त्र अकिंचित्कर आहे. म्हणून याचा विषय नाही व तें पुनः यानें कळत नसल्यामुळे ब्रह्मावगति याचें प्रयोजन नाही. म्हणून प्रयोजन नाही आक्षिप्त होतें. आतां जर अप्रसिद्ध आहे तर विचार करण्यास शक्यच नाही. कसें? जे कदाचितही बुद्धींत समारूढ विशेष नाही तें कसें प्रतिपादन केलें जाईल? म्हणून प्रतिपादनाच्या अशक्तीमुळे त्याला शास्त्र स्पर्शही करीत नाही. पुनः प्रसिद्धत्वामुळेच जर प्रसिद्ध यानें प्रतिपादन केलें जातें. तर त्या अर्थानें (= त्या प्रतिपादनामुळे) हें निरालंबन (= संबंध रहित) नाही. अप्रसिद्ध असतां तर शास्त्राला आलंबनही राहणार नाही. म्हणून कोण्या अर्थाशी संबद्ध शास्त्र नाही. असा संबंध आक्षिप्त होतो. ×"उच्यते अस्ति तावद्ब्रह्म" इत्यादि भाष्यानें तीन्हींचेही श्री त्यांच्या प्रवृत्तिकरितां समाधान करितात — पण ज्यांच्या विषयी विवाद नाही. अशा

५ पं. पा. पृ. ~~६ पं. ३~~ ४८ पं. ४. × पं. पा. पृ. ६[illegible] पं. १४

॥ व्याख्यान ॥

विचारवंतांकडून शास्त्र प्रणीत आहे. अशा प्रकारचे ते विषयप्रयोजन निर्विषय असंबद्ध आरंभ करीत नाहीत. म्हणून त्यांच्या गौरवाकरता श्रोते प्रवृत्त होतात. या प्रयासाने काय उपयोग? खरं प्रणेतृगौरवामुळे सामान्याने प्रयोजनवत्त्व प्रतीति होते. परंतु तेवढ्यानेच प्रवृत्ति होत नाही. इच्छित प्रयोजनाकरिता तर प्रवृत्त होतात. ते तर निर्देशावाचून कळणे शक्य नाही. पण असे असले तरी प्रयोजनविशेषाचा निर्देश करावा. विषयभावाला प्राप्त न झालेल्या वस्तूचे प्रतिपादन अशक्य आहे. असे तर प्रयोजन नसते. छिदि क्रियेचा विषयच वृक्ष छिद्यते (असा) प्रयोजन असे म्हटले जाते. मृत्तिका ज्यांच्या विषय आहे अशा दंडादिकांचेही घटस्वरूप मृत्तिकाच प्रयोजन आहे. खरे तथापि जसे चिकित्सा ज्ञानाचा चरक सुश्रुत आत्रेय प्रभृति पुष्कळ ग्रंथ आहेत. किंवा जशी, ज्यांचे तंदुल निष्पत्ति ~~तुष्टि आत्मप्रसादि~~ प्रयोजन आहे अशा अवघात, नख निर्भेददलन (अशा) पुष्कळ क्रिया आहेत. तेथे अवघात एकाठिकाणीच प्रवृत्ति नसते तशी येथे दुसऱ्याही प्रमाणाकरून कोण्याही रीतीने ब्रह्मावगति सिद्ध असता अवश्य येथेच प्रवृत्ति होणार नाही. म्हणून अनन्यसाधारण विषय सांगितला पाहिजे. जसे - 'अर्जुनाचा हा विषय आहे' अशी अनन्यसाधारणता प्रतीत होते. त्याने प्रवृत्तीच्या अंगत्वाने अनन्यसाधारणत्वाने विशिष्ट विषयाचा निर्देश करणे योग्य आहे. संबंधही प्रवृत्तीच्या अंगत्वाने वक्तव्य आहे. जसे चांगल्या रीतीने शब्दांचे परिज्ञान व्याकरणारंभाच्या पूर्वी कोणीकडून साधले जात नाही. म्हणून ते [illegible]

॥ व्याख्यान ॥

संबद्ध नाही. म्हणून त्याची इच्छा करणारा कोठे (= अन्यत्र) प्रवृत्त होत नाही. किंवा जशी ओदननिष्पत्ति एका क्रियेने नियत असली तरी ती गमनादि एका क्रियेने साध्य नाही. त्याने तिच्याशी (= ओदननिष्पत्तीशी) इचा (= गमनादि क्रियेचा) संबंध नाही. व त्यामुळे गमनादि क्रियेत ओदनार्थी प्रवृत्त होत नाही. त्याने पुरुषार्थरूपता अनन्यसिद्धता व त्याने प्रतिपाद्यता असे प्रयोजन विषय व संबंध भेदाला प्राप्त होतात. व ते तीनही प्रवृत्तीचे अंग आहेत. विचारवान अपुरुषार्थ अशा काकदंत परीक्षे किंवा तुषकंडनांत प्रवृत्त होत नाही. तसेच पुरुषार्थ चिकित्साज्ञान शुश्रुतादिकांनी सिद्ध असतां (अनन्यसाधारण नसलेल्या) चरकांत नियमाने प्रवृत्त होत नाही. तंदुल दलनाने सिद्ध असतां अवघातांतही. तसेच पुरुषार्थ सम्यक् शब्दज्ञान (व्याकरणाने) अनन्य सिद्ध असतांही त्याचे साधन नसलेल्या (असंबंधि) वैद्यकांत (वैद्यकांत) कोणी प्रवृत्त होत नाही. किंवा ओदनाचे साधन नसलेल्या गमनांत. असे असतां विप्रतिपत्तीने ब्रह्माच्या सर्वत्र प्रसिद्धतेला व अप्रसिद्धतेला निरसित करून शक्य प्रतिपाद्यतेला व अनन्यसिद्धतेला दाखवीत विषय व संबंधाला समर्थित करीत झाले व 'निःश्रेयस प्रयोजनाय प्रस्तूयते' अशा प्रयोजनाला

पण ब्रह्म[५] वेदान्तांचा विषय आहे शास्त्र तर त्यांच्या ब्रह्मप्रतिपादनाला अनुसरणारा उपाय जो न्याय तद्विषयक आहे तेव्हा ते (वेदान्तांचे विषय व संबंध) शास्त्राचे विषय व संबंध कसे होतील? प्रयोजन तर कदाचित् परंपरेने धर्मार्थ-

---

[५] पं.पा. पृ. ६८ पं. १५

व्याख्यान

विषयक शास्त्राच्या काम (भुरन) अक्षीप्रमाणे होईलही. (एकदेशी-) पण स्वर्गफल अशा आग्नेयादिकांना प्रयाजादि इतिकर्तव्यते प्रमाणे अर्थाला अवबोधित करणाऱ्या वेदान्तांनाही मीमांसा इतिकर्तव्यता आहे. त्याने तिला अर्थावबोधांत वेदान्तांना उपकारकत्व असल्यामुळे शास्त्रही तद्विषयक आहे. अंकुराला उत्पन्न करणाऱ्या शालिबीजाच्या सहकारी जलादिकांचे अंकुर कार्य नाही असे नाही. त्याने जरी वेदान्त ब्रह्मावबोधांत कारण आहेत व मीमांसा इतिकर्तव्यताभागाला पूरित करिते. तथापि ती ब्रह्मविषयकच आहे. छेद करणाऱ्याचा उद्यमन निपातन लक्षण व्यापार परशुविषयक आहे वृक्षविषयक नाही असें तर नाही कारण त्याला तदर्थत्व (वृक्षाच्या छेदनार्थत्व) आहे यकरणाला द्वारत्व आहे. अन्यथा अन्यत्र कर्तृव्यापार व अन्यत्र फल असें वैयधिकरण्य येईल.

(पूर्ववादी-) सांगतो- विषम उपन्यास आहे. जेथें उपाच्या उपकारावांचून फलोत्पत्तीच सिद्ध होत नाही. त्यालाही तद्विषयत्व युक्त आहे. येथें तर मीमांसेवाचूनही संबंधग्रहण व त्याच्या अनुस्मरण बुद्धि सन्निधान मात्राने उपकृत वाक्य अर्थाला बोधित करिते. दुसऱ्याची अपेक्षा करीत नाही. पण (विचाराला) संशयविपर्यास निरासाच्या द्वाराने निर्णय हेतुत्व असल्यामुळे व निर्णयाला निर्णयप्रधानत्व असल्यामुळे निर्णय वस्तु निर्णयहेतूचा विषय आहे यांत सार नाही. जेथें तर अनेक कोविज्ञान- वाक्यश्रवण असतां मीमांसेच्या

---

४ पं॰ पा॰ ६८ पं॰ १

॥ व्याख्यान ॥

निरपेक्षत्व उत्पन्न होते; तेथें एक वाक्यजन्य असेल कारण वाक्याचा एकाग्रभागांत कार्यनियतत्व आहे. इतरतर सामान्यतो दृष्ट निबंधन आहेत. तेथें लोकप्रसिद्ध शब्दशक्त्यनुसारी मीमांसेने- हे शब्दजनित ज्ञान आहे म्हणून त्याचे आलंबन वेदार्थ आहे असें जाणून अन्यांना उपेक्षित करिते. शास्त्राचा तर निर्णयज्ञानोत्पत्तींत व्यापार नाही. जसा नेत्र कोणत्यातरी निमित्तामुळे अर्थाशी संबंध झाला असतांही स्थाणू आहे किंवा पुरुष? असे संशयात्मक किंवा पुरुषच अशा विपर्ययस्वरूप ज्ञानाला उत्पन्न करून पुनः निमित्तान्तराने अनुगृहीत झाला असतां निर्णयात्मक किंवा सम्यक्रूप ज्ञानाला उत्पन्न करितो. याप्रमाणे शब्द मीमांसेच्या पूर्वी संशयित किंवा विपर्यस्त ज्ञानाला उत्पन्न करून पुनः तिच्या अनुग्रहावरून निर्णयात्मक किंवा सम्यक् ज्ञानाला उत्पन्न करीत नाही. परंतु मीमांसेच्या अनुग्रहानंतर पूर्वीच स्वसामर्थ्यजन्य ज्ञानाला उत्पन्न करितो५. म्हणून शास्त्र ब्रह्मविषयक नाही.
५

(सिद्धान्ती-) यावर सांगतो- जरी वाक्यार्थज्ञान शास्त्रानुग्रहाच्या पूर्वीच उत्पन्न होते तथापि आपल्या उत्पत्तीच्या समकाली उत्पन्न झालेल्या सामान्यतोदृष्ट निबंधन अशा अर्थान्तर निवेशी समकक्षाभिमत ज्ञानाने विरोधामुळे उन्मज्जन (उत्पन्न झाल्यासारखे) निमज्जना प्रमाणे (अनुत्पन्नाप्रमाणे) अनुभवाला येऊन स्थित राहते. या अवस्थेंत संशयज्ञानकोटींत निक्षिप्त असलेले मीमांसेने शब्दशक्तीचे अनुसरण केले असतां प्रतिपन्न ज्ञानाची अनुत्पत्ति अस-

---

५ पं॰ पा॰ पृ॰ ६९ पं॰ १६

॥ व्याख्यान ॥

निमज्जनाभावामुळे निश्चळ निर्णयज्ञाना प्रमाण होते. म्हणून मीमांसेने निर्णय केला जातो असे लक्षणेने म्हटले जाते. साक्षात् निर्णयज्ञान हेतुत्वामुळे तर नव्हे. म्हणून भगवशक्तीने ब्रह्मविषयक वेदान्तांना लक्षणेने सहकारीकारण मीमांसा आहे. म्हणून ब्रह्मज्ञानविषयक शास्त्र म्हटले जाते व म्हणून हे त्रय ही प्रयोजन विषय व संबंध शास्त्रारंभीं श्रोत्यांच्या प्रवृत्तीच्या अंगत्वाने अवश्य सांगितले पाहिजे. जरी प्रणेत्याच्या गौरवामुळेच शास्त्राला सप्रयोजनत्व आहे. तथापि प्रयोजन विशेषाची सिद्धि त्याच्या ज्ञानमात्राने निर्देशावाचून होत नाही. म्हणून ते निर्देश करण्यास योग्य आहे. त्याचा निर्देश केला असतां ही त्याच्या अशक्य प्रतिपादनतेला मानणारा विरतश्रद्धत्वाने प्रवृत्त होणार नाही म्हणून तो साध्य जसा (संबंध) निर्देश करण्यास योग्य आहे. शक्य प्रतिपादन केले तरी दुसरीकडून सिद्ध होणाऱ्या अर्थांत येथे निर्दिष्ट असतां अवश्य प्रवृत्ति होणार नाही म्हणून अनन्य साध्य (=विषय) ही निर्देश करण्यास योग्य आहे. म्हणून हे त्रय एकत्र समवेत वाचिभक्त ही (वेदान्तांत) उपलब्ध होते. आतां अतिविस्तार पुरे.

'अस्ति तावद्ब्रह्म'[१] इत्यादि भाष्याने प्रसिद्धत्वाच्या प्रदर्शनाने अप्रसिद्धतेचा निराकरण करीत शक्य प्रतिपाद्यतेने संबंधाला समर्थित करितात. कसें? ब्रह्मशब्द तर जाति, जीव, कमलासन, शब्दराशी = वेद यांच्यातील एकाच्या अभिप्रायाने सूत्रांत अनुपपत्तीमुळे सूत्रांत प्रयुक्त नाही. असें सांगितले. म्हणून निश्चये-

[१] पं. पा. ७० पं. ५

॥ व्याख्यान ॥

करून दुसऱ्या कोण्या अभिधेयाच्या अभिप्रायाने हा प्रयुक्त आहे असें कळते. त्यानें पदप्रयोगावरूनच स्वर्ग, अपूर्व (धर्म) देवतादि अर्थ प्रमाण कोणी यांच्या अर्थ आहे असें निश्चित केले जाते. यांत सार नाही. पद तर चक्षुरादिकां प्रमाणे पूर्वी अप्रतीतच अर्थात त्वरेने विज्ञान उत्पन्न करीत नाही. की ज्याने अपूर्व दुसऱ्या प्रमाणाने असिद्ध अर्थाला पदप्रयोगावरूनच आपण जाणू. स्वर्गादि अर्थही पदप्रयोगावरूनच सिद्ध होत नाही? यावर सांगतो – ज्या वाक्यांत एका पदाला सोडून इतर पदांच्या अर्थ सिद्ध आहे. तो काय एका पदाच्या अज्ञानापराधाने सोडावा? किंवा बहु पदांच्या प्रसिद्धि बळाने अप्रसिद्ध हे कोणत्या रीतीने जाणावा? तसें अशा प्रकारच्या पदार्थज्ञानाचा हेतु निगमनिरुक्त व्याकरणांनी विद्यमानत्व असल्यामुळे त्यांच्या बळाने अर्थ जाणून वाक्यार्थाची अवगति युक्त आहे. एकाच्या अप्रसिद्धीने तर प्रसिद्ध पदार्थांचा संसर्ग त्यागणे युक्त नाही. प्रसिद्धी तर अप्रसिद्धीने त्यागली जात नाही. कारण प्रसिद्धत्वाने अप्रसिद्ध हे कल्पिले जाते असा न्याय आहे. पण निगमादि बळाने अर्थाला अनुसरल्यास सर्वांगत्व कोण्या रीतीने अर्था~~[illegible]~~च्या अन्यमाला जाणणे शक्य असल्यामुळे अव्यवस्थित पदार्थ होईल. त्यामुळे वाक्यार्थाचे अवधारण केल्या जाणार नाही. तर मग निगमादिकांना अर्थवत्ता नाही? आहे अर्थवत्ता. जेथें स्वार्थाहून अन्य अर्थांत ही विनियोगामुळे प्रयोग होतो तेथें त्या अर्थाला (पद) कसें सांगेल? अशी अपेक्षा असतां त्यांच्यातील (=पदातील) य अवयवार्थाच्या 卐 अन्वयलेशाच्या निगमादिकज्ञानेने अनुगमामुळे (अनुसरणज्ञानामुळे.) असें आहे तर

卐 'अन्वयलेशाच्या अनुगमामुळे' = निगमादिकज्ञानें अर्थाला धारण करीत असल्यामुळे.

॥ व्याख्यान ॥

एकार्थ नियमाकरिता प्रयोग (=रूढी) परतंत्रता शोधिली जाते. म्हणून प्रयोगा (रूढी) वाचूनही एका अर्थाच्या नियमांतच कोण्या रीतीने निगमादि व्यापार करितात. म्हणून कोणी दोष नाही.

म्हणून येथें ब्रह्म शब्द व्युत्पाद्यमान असतां वृध्द्यर्थक अशा 'बृहति' ('बृहि वृध्दौ' धा-सू. धातुपाठ नं.) धातूच्या अर्थावरूनच प्रयोगावरून (=रूढीवरून) अनुगमन सत्ता शिष्टार्थ अशा आपेक्षिक महत्ताच्या अपरिग्रहामुळे सर्वांकडून निरवग्रह (निरवच्छिन्न) महत्व संपन्न वस्तु वाक्यार्थान्वयी ब्रह्म शब्दापासून अनुज्ञात होते. व त्यामुळे काल कृत अवच्छेद निमित्तक अल्पत्वाचा अभाव असल्यामुळे सर्व सत्तामुळे नित्य किंचित् वस्तु ब्रह्मपदापासून प्रतीत होते. तसेच रूपान्तराचा अभाव असतां त्या रूपाने विकलत्वामुळे त्याच्या अवच्छेदनें देश अल्पत्व येईल. तेंही ब्रह्मपदानेंच निरसित केले जाते. म्हणून एकस्व अद्वैत वस्तु ब्रह्मपदापासून प्रतीत होते. यानें देशकृत हीं परिच्छेद निराकृत जाणावा. दुसऱ्या वस्तूचा अभाव असतांतर तिच्या अपेक्षेने तिच्याहून पृथक् इतर वस्त्वादेशांत सद्भाव आहे या व्याहून पलीकडे नाही. असें होईल. त्याच्या पासून तीन्याहून असल्यामुळे तिच्या (दुसऱ्या वस्तूचा) अभाव असतां परिच्छिन्न अनुद्धि होत नाही. शुध्दत्व ही 'बृहति' अर्थाच्या अन्वयावरूनच कळते. कसे? अरे घालम वस्तु तर भोग्य असते म्हणून आत्म्याप्रत दोषपत्वामुळे निकृष्ट आहे. चेतन तर कोणाच्या गुण-

उच्यते । अस्ति तावद्ब्रह्म नित्य शुध्दबुध्द मुक्तस्वभावं सर्वज्ञं सर्व शक्ति समन्वितम् । ब्रह्मशब्दस्य हि व्युत्पा-

॥ व्याख्यान ॥

भानाला प्राप्त होत नाही. त्याने सर्वांहून उत्कृष्ट किंचित् शुध्द स्वरूप असे 'बृंहति' अर्थाच्या अन्वयावरूनच कळते. मुक्तत्वही त्यावरूनच कळते. कारण अविद्या काम कर्मांनी परतंत्र त्यांनी पशुप्रमाणे इकडून तिकडून नीयमान निकृष्ट होतो. ब्रह्म शब्द तर स्वार्थाच्या प्रक्षेपाने किंचित् वाच्य वस्तु जाणवीत सदैव अविद्यादि संसार बीजांनी अनाकलित तेने सिद्धे उत्कृष्ट महत्व जाणवितो. तो सर्वज्ञ व सर्व शक्ति समन्वित आहे असें ब्रह्म शब्दावरूनच कळते. कसें? जर त्याच्या (ब्रह्म) कडून कांही अविदित आहे. किंवा कोण्या कार्यापासून त्याची शक्ति निवृत्त होते. तेव्हां त्याच्या उत्कर्ष आपेक्षिक होईल. तो दुसरीकडून असिध्द वस्तूची पद प्रयोगावरूनच प्रतिपत्ति असतां युक्त होत नाही. कारण सिध्द वस्तूंत प्रयोग असतां त्याचे यथासिध्दच महत्व सांगितले जाते. शब्दावरूनच त्याच्या अर्थाच्या अन्वयाची प्रतीति असतां निरंकुशच अर्थ मानला पाहिजे. व असें असतां जर सर्व याच्या साक्षात्कज्ञानाचा विषय व वशांत असेल तर 'बृहति' चा अर्थ परिपूर्ण होतो. ते हें सांगतात- 'उच्यते' = सांगतो 'ब्रह्म तावत्' = ब्रह्म तर 'नित्य' = काल वस्तु देश परिच्छेद रहित 'शुध्द' = अविद्यादि दोष रहित 'बुध्द' = चैतन्यस्वरूप 'मुक्तस्वभावम्' = बंधावस्थेंत ही स्वतः बंध रहित 'सर्वज्ञम्' = सर्वांना जाणणारे.

घमानस्य नित्यशुध्दत्वादयो अर्थाः प्रतीयन्ते, बृहतेर्धातोरर्थानुगमात् । सर्वस्यात्मत्वाच्च ब्रह्मास्तित्वप्रसिध्दिः । सर्वो हि आत्मास्ति-

---

॥ व्याख्यान ॥

'सर्वशक्तिसमन्वितम्' = सर्वकार्य शक्तींनी युक्त 'अस्ति' = प्रसिध्द आहे. कारण 'अस्ति' सर्वस्य अप्रकृतत्वामुळे 'अस्ति' पदाला प्रसिध्दपरत्व आहे. 'हि' = कारण 'व्युत्पाद्यमानस्य ब्रह्मशब्दस्य' = ज्याचे व्युत्पादन केले जाते अशा ब्रह्म शब्दाचे 'बृहतेर्धातोरर्थानुगमात्' = 'बृहि वृध्दौ' [पा.सु. धातुपाठ भ्वादि ७५] या बृहि धातूच्या अर्थज्ञानावरून निगम (=शब्दैकदेश) सामर्थ्यावरून 'नित्यशुध्दत्वादयो अर्थाः प्रतीयन्ते' = नित्यशुध्दत्वादिक अर्थ प्रतीत होतात.

५ पण असे असले तरी व्युत्पत्तीच्या अनुसरणाने अशा स्वरूपाच्या वस्तूंत प्रतीति असेच तरी एवढ्यानेच तिची सिध्दि होत नाही. कारण पदमात्राला अप्रमाणत्व आहे. असे म्हणूनच लोकावगत प्रमाणाभासाने सिध्द धर्माप्रमाणे तिची जिज्ञासा आहे.

हे दुसरे — ब्रह्मशब्दार्थाच्या सिध्दीविषयी साध्यत्वाच्या (=जिज्ञास्यत्वाच्या) सिध्दीकरिता — कारण सांगितले जाते. 'सर्वस्यात्मत्वाच्च ब्रह्मास्तित्वप्रसिध्दिः' = सर्वांच्या प्रत्यगात्मत्वामुळे ही (सर्वदा) ब्रह्माच्या अस्तित्वाची प्रसिध्दि आहे. सर्व लोकांचा जो हा आत्मा त्याच्याशी अभेदामुळे ब्रह्माच्या अस्तित्वाची प्रसिध्दि आहे असा अर्थ. त्यालाच (=कारणालाच) किंवा प्रसिध्दीलाच दाखवितात — 'सर्वो हि आत्मास्तित्वं प्रत्येति' = निश्चयेंकरून सर्व लोक आत्म्याच्या अस्तित्वाविषयी प्रत्यय

---

५ पं.पा. पृ. ७ पं. २०

त्वं प्रत्येति । न नाहमस्मीति । यदि हि नात्मास्तित्वप्रसिध्दिः स्यात् सर्वो लोको नाहमस्मीति प्रतीयात् । आत्मा च ब्रह्म । यदि

॥ व्याख्यान ॥

घेतो. प्रत्ययालाच सांगतात — 'न नाहमस्मीति' — 'अहं नास्मीति न प्रत्येति किंतु अहमस्मीति प्रत्येति' = मी नाही असा प्रत्यय घेत नाही. परंतु मी आहे असा प्रत्यय घेतो असा अर्थ. किंवा 'अहमस्मीति न प्रत्येतीति इति न किंतु प्रत्येत्येव' = मी आहे असा प्रत्यय घेत नाही असे नाही तर घेतोच. हीच सत्य आत्म्याची प्रसिध्दि होय असा अर्थ. पण शून्य हा आत्मा भासतो. तेव्हा आत्म्याच्या अस्तित्वाची सिध्दि कशी? अशी शून्यवाद्याची आशंका असतां सांगतात — 'यदि हि नात्मास्तित्वप्रसिध्दिः स्यात्' = निश्चयेकरून जर आत्म्याची अस्तित्वप्रसिध्दि नसेल तर = आत्म्याची शून्यप्रतीति असतां 'सर्वो लोको नाहमस्मीति प्रतीयात्' = सर्व लोक मी नाही असे जाणेल. परंतु 'मी आहे' असे जाणतो. म्हणून आत्म्याची अस्तित्व प्रसिध्दि आहे असा अर्थ. पण आत्म्याची प्रसिध्दि असतांही ब्रह्माला काय प्राप्त झाले? त्यावर सांगतात — 'आत्मा च ब्रह्म' = व आत्मा ब्रह्म आहे. पण आत्मा ब्रह्म कसा? वेदान्तांत आत्म्यांत ब्रह्मशब्दाचा प्रयोग असल्यामुळे व आत्मवाच्य लोक 'मी' असा व्यपदेश करितात म्हणून. म्हणून अशा रीतीनें अहंप्रत्ययांतच ब्रह्माला प्रसिध्दत्व असल्यामुळे अप्रसिध्दीची शंका नाही.

प्रसिध्दि पक्षांत सांगितलेल्या दोषाला पूर्वपक्षी स्मरण करवितो — 'यदि'

तर्हि लोके ब्रह्मात्मत्वेन प्रसिद्धमस्ति ततो ज्ञातमेवेत्यजिज्ञास्यत्वं पुनरापन्नम्। न तद्विशेषं प्रति विप्रतिपत्तेः।

॥ व्याख्यान ॥

'यदि तर्हि' = जर असं आहे तर 'लोके ब्रह्मात्मत्वेन प्रसिद्धमस्ति' = लोकांत ब्रह्म आत्मत्वाने प्रसिद्ध आहे 'ततो ज्ञातमेव' = त्यामुळे ज्ञातच आहे. 'इति' = म्हणून 'अजिज्ञास्यत्वं पुनरापन्नम्' = पुनः अजिज्ञास्यत्व प्राप्त झाले. अशा रीतीने विषयाचा आक्षेप करितो. असिद्ध वस्तु साध्यमान अशी विषय असते, सिद्ध तर पुनः साधित केली जात नाही म्हणून ब्रह्म या शास्त्राचा विषय नाही.' 'न तद्विशेषं प्रति विप्रतिपत्तेः' = नाही कारण त्याच्या विशेष स्वरूपाविषयीं विवाद आहे. असे विषय व संबंधाचे समर्थन करितात. खरं आहे 'अहं' असा आत्म्यांत प्रत्यय आहे. व आत्मा ब्रह्म आहे. परंतु त्याविषयींच हा आत्मा हा आत्मा अशा विप्रतिपत्ति आहेत. वस्तुतः ब्रह्मपदार्थविषयकच आहेत; कारण ब्रह्मशब्दाला आत्म्याशी एकार्थत्व आहे. त्यामुळे सामान्यतः ब्रह्म सिद्ध असले तरी विशेषतः असिद्धीमुळे, असिद्ध कल्पच आहे. म्हणून विशेषाच्या सिद्धीचा हेतु अशा या शास्त्राचा तो विषय होतो. सामान्यतः सिद्ध असल्यामुळे ते विशेष करून प्रतिपादन करण्यास अशक्य आहे म्हणून त्याचे शास्त्र साधन आहे असा संबंधही समर्थित होतो. विप्रतिपत्तीला दाखवितात- 'देहमात्रं इत्यादि' तेथ अशी- व्यक्ति, आकृति, जाति, क्रिया, गुण, सत्त्वादि अनेक अर्थी संनिध असतां योजल्या जाणाऱ्या गोशब्दाचे कोणाकडून जाति, कोणाकडून व्यक्ति इ-

5 पं. पा. ७२ पं. ७

देहमात्रं चैतन्यविशिष्टमात्मेति प्राकृता जना लौकायतिकाश्च प्रतिपन्नाः। इन्द्रियाण्येव चेतनान्यात्मेत्यपरे। मन इत्यन्ये।

त्यादि अभिधेय जाणले जाते. याप्रमाणे चैतन्य कार्यकारणसंघात सन्निध असतां उत्पन्न होणाऱ्या अहं प्रत्ययाचे कोणाकडून किंचित कोणते आलंबन जाणले जाते त्याचा सांगतात- 'देहमात्रं चैतन्यविशिष्टमात्मेति' = चैतन्यविशिष्ट देहमात्र आत्मा आहे असे 'प्राकृता जनाः' = प्राकृत जन 'लौकायतिकाश्च' = चार्वाक 'प्रतिपन्नाः' = जाणतात. ते असे- 'मी मनुष्य आहे' असा आत्म्यांत मनुष्यत्वाभिमान व गमन करितो' असा गंतृत्वाभिमान अहं प्रत्ययाला देहविषयत्व असतां उपपन्न होतो. हे अनेक सशरीरक पिंडाच्या अभिप्रायाने जाणावे. 'मात्र' शब्दाने देहाशिवाय स्वतंत्र चैतन्य नाही. किंवा अन्य ज्याचे विशेषण आहे असेही नाही. परंतु देहाकार परिणत भूतचतुष्टयाच्या अंतर्भूतच आहे असे दाखवितात- 'आत्मा' = अहं प्रत्ययालंबन असा अर्थ. 'प्राकृताः' = प्राकृत शास्त्रोपदेशाने असंस्कृत मति, दृष्टमात्रानेच कल्पित ज्यांचा व्यवहार होतो असे असा अर्थ. 'लौकायतिकाः' = भूतचतुष्टयतत्त्ववादी प्रसिद्ध आहेत. याप्रमाणे 'इन्द्रियाण्येव चेतनान्यात्मेत्यपरे' = चेतन इंद्रियेच आत्मा आहे असे दुसरे लौकायतिक एकदेशी मानतात- चक्षुरादि मनःपर्यंत इंद्रियांत एकेक नसतांही शरीरात स्वपाई ज्ञानाचा अभाव असे त्यामुळे व्यस्त (पृथक्) अशा त्यांनाच चेतनत्व व अहं प्रत्यय विषयत्व व क्रमाने भोग दगोष्ठी (वरात्यांसंघ) प्रमाणे इतरेतरांना इतरांच्या गुणभावामुळे ते मानतात. तसे इंद्रियधर्मांचे सामानाधिकरण्य अहं प्रत्ययाला दिसते 'मी काणा मुका आहे' इत्यादि. 'मन इत्यन्ये'

5 पं. पा. पृ. ७२ पं. २१

विज्ञानमात्रं क्षणिकमित्येके । शून्यमित्यपरे ।
अस्ति देहादिव्यतिरिक्तः संसारी कर्ता भोक्तेत्यपरे ।

॥ व्याख्यान ॥

मनच चेतन अहंप्रत्ययमात्राविषय आत्मा आहे असे दुसरे लोकायतिक एकदेशी मानतात. तें म्हणणें असत्याचें दिसतें तें कीं - स्वप्नांत इन्द्रियदर्शकांच्या उपरम झाला असतांही मनालाच 'मी' असे सर्वव्यवहाराचें आस्पदत्व (=आधारत्व) आहे. असे 'विज्ञानमात्रं क्षणिकम्' = क्षणिक विज्ञानमात्र आत्मा आहे 'इत्येके' असे एक विज्ञानवादी बौद्ध म्हणतात. मात्र ग्रहणानें अहं असें अकारादि वर्ण-भया (विधेयांशाला)हून अतिरिक्त (त्याचे आश्रय असे) किंचित् भासत नाही कोणी अहंप्रत्ययाचा विषय कल्पिला जाईल. त्यानें विज्ञानच स्वरसभंगुर (=स्वभावानें क्षणिक) अविरतोदय (निरंतर उत्पन्न होणारे) असेल केवळ याचा आश्रय. अनुभवभङ्ग पक्षान्तर - अहं असें ~~अनुभव~~ होते. असे ते मानतात. 'शून्यमित्यपरे' शून्य आत्मा आहे असे दुसरे शून्यवादी माध्यमिक बौद्ध मानतात. सुषुप्तींत विज्ञानलेशाचाही अभाव असल्यामुळे अकस्मातच अहं असा सम्यक् उदय दिसत असल्यामुळे, अकारण अशा कादाचित्काला परमार्थवस्तुत्वाच्या अभावामुळे असत् भवधामच अहंकार आहे. असें ते म्हणतात - 'अस्ति देहादिव्यतिरिक्तः संसारी कर्ता भोक्तेत्यपरे' = देहादिकाहून अतिरिक्त संसारी कर्ता भोक्ता आत्मा आहे. असे दुसरे तार्किक शाखाकर्तादि म्हणतात - अहंपुढें सर्व शून्य भोक्तृत्व दिसत नसल्यामुळे-

१ पं. पा. पृ. ७३ पं. १ × पं. पा. पृ. ७३ पं. ७

॥ व्याख्यान ॥

व अहं वा प्रत्यभिज्ञानावरून स्थिरत्व सिद्ध होत असल्यामुळे व स्थिराला अबाधित हेतु उपलब्ध होत नाही म्हणून नित्यत्व आहे. व निर्विकाराला भोगाचा असंभव असल्यामुळे सविकाराला क्रियाफलत्व असल्यामुळे व कर्तृत्वाला क्रियावेशात्मकत्व असल्यामुळे व संसारित्वाला असें स्वरूपत्व असल्यामुळे व बुद्धिपर्यंत देहादिकाला भोक्तृत्वाची अनुपपत्ति आहे म्हणून त्यांच्याहून व्यतिरिक्त संसारी कर्ता भोक्ता अहंप्रत्ययमात्राविषय आत्मा आहे असे दुसरे म्हणतात

ऽ पण त्यांच्याहून व्यतिरिक्त कसें मानतात? त्याला भोक्तृत्वाची अनुपपत्ति आहे म्हणून असें वर सांगितलें. पण त्याला भोक्तृत्वाची अनुपपत्ति कशी? सांगतो - भूतसंघात तर शरीर आहे. त्यांत व्यस्तांना (एकेकांना) किंवा समस्तांना युगपत् (एकदम) किंवा क्रमानें भोग कल्पिला जाईल. परन्तु सर्वथाही त्याचा असंभव आहे. जर व्यस्तांना युगपत् कल्पिला जाईल तर प्रत्येकाला स्वार्थप्रयुक्तत्व असल्यामुळे अंगांगी भाव कल्पिला जाणार नाही. अंगांगीभावावाचून तर संघात उत्पन्न होत नाही. म्हणून व्यस्तांस युगपत् भोग नाही. मग विरोधामुळे वर गोष्टीप्रमाणे क्रमानें असो? हें असें युक्त नाही कारण तेथें भोग्याला असाधारणत्व असून असाधारणत्वं तर प्रतिपुरुष नियमामुळे आहे. येथें पुनः विपरीत आहे. कारण पुरुषांच्या संनिधीला व साधारण भोग्य असतां प्रतिनियत भोगव्यवस्थेचे हेतूचा असंभव आहे. मग प्रत्येकाला युगपत् किंवा क्रमानें नसो परंतु समुदायाला असो. कारण तिळांच्या ज्वालेप्रमाणें चेतनत्व समन्वयानें उपपत्ति होते.

ऽ पं. पा. पृ. ७३ पं. १३

॥ व्याख्यान ॥

हें असे नाही कारण भोगांत समूहाचा असंभव आहे. कसा असंभव? भोक्त्याला भोगाप्रत प्राधान्य आहे म्हणून. पण भोगांत हा समूह दिसतो. असा जो कुणी म्हणेल. त्यांत सार नाही. कारण समूहाला भोग आहे? किंवा त्याच्याहून व्यतिरिक्ताला? असे येथें भोगाला संदिग्धत्व आहे. ते व ज्याला विपरीत आहे. कारण तेथें समूहकामांत समूहींच्या गुणभाव उपपन्न होतो. मग एकाला नियत भोग असा नाही कारण तेथेंही कोणत्या एकाला? असे अवधारण होत नाही. पण अवधारणाने कार्य: त्याच्या भावावाचूनही विवक्षिताच्याची (व्यतिरिक्त भोक्त्याच्या अभावाची) उपपत्ति होते. असें आहे तर कार्यात्मक समान भूतांत कोणांच्या गुणभावाची अनुपपत्ति असल्यामुळे हा पक्ष अयुक्त आहे. अशा कारणात्मक भूतांतही समान चर्चा आहे. कारण भूतस्वाभाव्याचा अविशेष आहे. तशी उभयात्मक (कार्यकारणात्मक) समूहांतही आहे. म्हणून देहादिव्यतिरिक्त अहं प्रत्ययाचा विषय आत्मा आहे असें ते मानतात. 'भोक्तैव केवलं न कर्तेत्येके' = केवळ भोक्ताच आहे कर्ता नाही असे एक सांख्य मानतात. पूर्वोक्त[ऽ] देहादिव्यतिरिक्त आत्म्याला कर्तृत्व त्याचा स्वभाव नाही असे मानणारे भोक्ताच केवळ अहं प्रत्ययाचा विषय आहे असे ते म्हणतात.

'मी करितों, जाणतों, भोगतों,' असा याच्या सर्वदा अहं प्रत्ययाशी अनुषंग = संबंध नाही. त्याने हा (कर्तृत्वादि धर्म) याचा विषय नाही. जर असेल तर त्याच्या उल्लेखावाचून हा उदयाला प्राप्त होणार नाही. पण मग हा भोक्ताही नाही. कारण त्याच्या उल्लेखाचा अभाव आहे? हें असें नाही. कारण 'मी' असा चेतनत्वाचा समुल्लेख आहे. व सर्वांना तद् दृष्टच आहे.

[ऽ] पं. पा. पृ. ७४ पं. ५

भोक्तैव केवलं न कर्तेत्येके। अस्ति तद्व्यतिरिक्त ईश्वरः सर्वज्ञः सर्वशक्तिरिति केचित्। आत्मा स भोक्तुरित्यपरे। एवं बहवो

॥ व्याख्यान ॥

व तत्स्वरूपच भोक्तृत्व आहे. म्हणून भोक्ताच केवळ आहे असे योग्य मानतात.

'तद्व्यतिरिक्तः'[ऽ] = त्या देहादिकाहून व्यतिरिक्त अशा अहं प्रत्यय विषय आत्म्याहूनही अन्य 'ईश्वरः' = सर्वांचे नियमन करणारा, 'सर्वज्ञः' = त्यामुळेच नियम्याला सर्वरूपाने जाणणारा 'सर्वशक्तिः' = सर्वांच्या नियमन शक्तीने संपन्न. शरीरांना मनाच्या योगानेही अचिंत्यस्वरूप अशा, प्रेक्षावानांच्या कर्तृत्वावाचून असंभाव्यमान अशा, शरीर व भुवनाच्या विरचनकार्यावरून घटादिकार्यावरून ज्याप्रमाणे कुंभारादि त्याप्रमाणे कळणारा सातिशयांची मर्यादा प्राप्त असा, परिमाणाला जाणणारा, ज्ञानही सातिशय आहे म्हणून क्वचित् मर्यादेला प्राप्त झालेले, किंवा सर्वविषयक आहे म्हणून सर्ववित्, सर्वदा सिद्ध ईश्वर कळणारा, ब्रह्मशब्दाचा अर्थ आहे असे 'केचित्' = कोणी (वैशेषिक, योगी व नैयायिक) जाणतात.

पण 'मी'[×] अशा रीतीने सर्वलोक आत्म्याचा प्रत्यय घेतो. व आत्मा ब्रह्म आहे म्हणून अहं प्रत्ययाचा विषय अशा आत्म्याच्या ब्रह्मत्वाने त्याची (= आत्म्याची) विप्रतिपत्ति असतां ब्रह्माच्या विप्रतिपत्तीला दाखविण्याकरिता आरंभ केला. तर अहं प्रत्ययाचा विषय नसलेल्या अनात्म्या ईश्वरांत ब्रह्मत्वाची विप्रतिपत्ति कशी दाखविली जाते? सांगतों — कारण ब्रह्मांत विप्रतिपत्तीच्या प्रदर्शनाला प्रक्रान्तत्व आहे. व अहं प्रत्यय विषयाच्या विप्रतिपत्तीनेही

[ऽ] पं. पा. पृ. ७४ पं. ११. [×] पं. पा. पृ. ७४ पं. १८

विप्रतिपन्ना युक्तिवाक्यतदाभाससमाश्रयाः सन्तः ।

॥ व्याख्यान ॥

परंपरेने ब्रह्माची विप्रतिपत्तीच दाखविली जाते. कारण अहंविषयाच्या विप्रतिपत्ति-प्रदर्शनाने कांही कृत्य नाही. म्हणून हे (=अनात्म ईश्वरांत ब्रह्मत्वाच्या विप्रतिपत्तीचे प्रदर्शन) योग्य आहे.

भेदकोटीला सांगुन सिध्दान्तकोटीला सांगतात – 'सः' = जो योग्यांच्या मतांत प्रसिध्द ईश्वर तो 'भोक्तुः' [=अविद्योपाधीने] भोक्त्या वस्तुतः अभोक्त्या अकर्त्या अशा साक्षी जीवाचा 'आत्मा' = स्वरूप आहे. 'इति अपरे' = असे दुसरे वेदान्ती म्हणतात – ऽजो हा 'मी' अशा रीतीने डोळ्यापुढे भासणारा चेतन भोक्ता (= द्रष्टा) तो ब्रह्म आहे असे वेदान्त्यांकडून जाणला जातो. त्याला अहंप्रत्ययाने सिध्द जो भोक्तृत्वादि भास तो मिथ्याच अनिर्वचनीय अनादि अविद्येने विलसित आहे. परमार्थतः तर जो सर्वज्ञ ईश्वर अहंप्रत्ययांत अंतर्भूत नसलेला व प्रमाणान्तराने कळत नसलेला तोच आत्मस्वरूप आहे. असे असता हा ईश्वर 'बृहति' अर्थान्वयामुळे ब्रह्मशब्दाच्या नामतेला प्राप्त होतो. उतरत्या सद्रूप (=जीवरूप) विकल्पाला निरंकुश बृहत्त्व नाही. म्हणून तो ब्रह्मशब्दाभिधेय असणार नाही. उपसंहार करितात – 'एवं' = अशा रीतीने 'बहवः' = पुष्कळ वादी व प्रतिवादी 'युक्तिवाक्यतदाभाससमाश्रयाः सन्तः' = सिध्दान्ती युक्ति व वाक्यांनी आश्रय करणारे व प्रतिवादी युक्त्याभास व वाक्याभासांना आश्रय करणारे 'विप्रतिपन्नाः' = विरुध्द विरुध्द अर्थाला जाणतात व बोलतात.

ऽ पंच्पा- पृ. ७५ पं. १

तत्र विचार्य यत्किंचित्प्रतिपद्यमानो निःश्रेयसात् प्रतिहन्-

॥ व्याख्यान ॥

ऽअशा रीतीने सांगितलेल्या प्रकाराने कोणी कांही (=शरीरादि) वस्तु (=प्रत्यगात्मा आहे असे मानतात. काय असे मनोरथमात्रानेच ते मानतात? नाही. प्रमाणांना स्वविषयाच्या निश्चयांत अनुग्राहक तर्क या पर्याय युक्तीला व प्रतिवेदान्तातील यथार्थ ब्रह्मस्वरूपाला प्रतिपादन करणाऱ्या वाक्यांना आलोचन करणारे मानतात. त्यांत तो त्यांच्या मताला आहे असे युक्ति व वाक्यांच्या योगांनी अन्त्य पक्षाला सम्यक्दर्शी निश्चित करितात. इतर तर युक्तींप्रमाणे भासतात ते युक्त्याभास परमार्थतः युक्ति नव्हेत त्यांना आश्रय करून व वाक्यांप्रमाणे भासतात ते वाक्याभास वाक्ये नव्हेत म्हणून त्यांना अतत्त्वरत्व आहे. त्यांना ग्रहण करून पक्षान्तरात विप्रतिपन्न आहेत. देहादि व्यतिरिक्त आत्मपक्षाला रक्षिणाऱ्यांनी देहादि आत्मवादांचे युक्त्याभासत्व लेशाने दाखविलेच आहे. इतरांचे ही युक्त्याभास सिध्दत्व त्या अवसरी दाखवू. लेशाने तर उत्तरोत्तर पक्ष ग्रहण कारण प्रदर्शनाने दाखविलेच आहे. वाक्याभासत्व तर त्या त्या अधिकरणांत सिध्दान्त-पक्ष सांगत असतांना दाखवू.

'तत्र' = असे ×असता मुमुक्षु ब्रह्मज्ञानाने परं निःश्रेयसाच्या प्राप्तीची इच्छा करणारा 'अविचार्य' = मोक्षशास्त्राचे श्रवण न करून प्रवृत्त होणारा 'यत्किंचित्' = अंत्यपक्षाहून अर्वाचीन कोणत्या पक्षाला 'प्रतिपद्यमानः' म्हणून करील तर मोक्षाला सम्यक्ज्ञान फलत्व असल्यामुळे व त्याला सम्यक्ज्ञानत्व नसल्यामुळे 'निःश्रेयसा-

---

ऽ पं. पा. पृ. ७५ पं. ८ . × पं. पा. पृ. ७५ पं. १८

न्येतानर्थं चेयात्। तस्माद्ब्रह्मजिज्ञासोपन्यासमुखेन वेदान्तवाक्यमीमांसा तदविरोधितर्कोपकरणा निःश्रेयसप्रयोजना प्रस्तूयते।

॥ व्याख्यान ॥

त = मोक्षफळापासून 'प्रतिहन्येत' = नाशाला प्राप्त होईल. मोक्षफळाला प्राप्त होणार नाही असा अर्थ. 'अनर्थं च इयात्' = व अनर्थाला प्राप्त होईल. कारण "अंधं तमः प्रविशन्ति" [ईश १२] "ये के चात्महनो जनाः" [ई. ३] अशी श्रुति आहे. अनात्मदर्शनाने (आत्म्याच्या अदर्शनाने) आत्म्याला असत्कल्पत्वाचे आपादन आत्म येथे आत्महनन होय. व अशा रूपाचे आत्महनन त्याने केलेले आहे. कारण दुसऱ्या प्रकाराने आत्महननाचा असंभव असून प्राणत्यागाच्या प्रकृत प्रकरणांत उपयोग नाही. म्हणून 'अनर्थाला' = संसारान्धतमाला असा अर्थ.

५५।२३

सूत्र वाक्यार्थाचा उपसंहार करितात - 'तस्मात्' = म्हणून = ग्रंथाच्या अध्यस्तत्वाने विषय प्रयोजनांचा सद्भाव असल्यामुळे, अगतार्थत्वामुळे, अधिकाऱ्याच्या लाभामुळे, आपात प्रसिद्धीने विषयादिकांच्या संभवामुळे असा अर्थ. 'ब्रह्मजिज्ञासोपन्यासमुखेन' = ब्रह्माच्या जिज्ञासेच्या[१] = ज्ञानेच्छेच्या उपन्यासाच्या मिषाने = उक्तीच्या द्वाराने. जिज्ञासा पदाने अंतर्णीत अशी 'वेदान्तवाक्यमीमांसा' = वेदान्तवाक्यांची पूजित विचारणा 'प्रस्तूयते' = आरंभ केली जाते. अथवा ब्रह्मज्ञान कर्तव्यतेने उपदिष्ट असता त्याच्या ज्ञानाकरिता प्रवृत्तांकरिता सामर्थ्यावरूनच त्याचे (त्याचे साधन अशा विचारांचे) प्रतिपादन प्रतिज्ञात होते म्हणून त्याच्या करिता वेदान्तमीमांसा आरंभ केली जाते. पण तिचे प्रयोजन काय? व उपकरण काय? त्यावर सांगतात 'तदविरोधितर्कोपकरणा' = त्या वेदान्ताशी अविरोधि तर्क = युक्ति = उपकरण = इतिकर्तव्यता = सहकारी कारण आहे जिचे अशी. अथवा वेदान्ताशी अविरोधि तर्क = अनुमान ते अर्थ प्रतीतीच्या दृढत्व हेतुतेने उपकरण आहे जिचे अशी. 'निःश्रेयसप्रयोजना' = मोक्ष = सकार्य अज्ञान निवृत्ति व परमानंद प्राप्ति फळ आहे जिचे अशी. असा अर्थ.

॥ असें भाष्यव्याख्यानातील चतुर्थवर्णक व प्रथमसूत्र समाप्त झाले ॥

---

[१] पं.पा.पृ.७८ पं.२.

॥ अथ ब्रह्माच्या लक्षण व उपलक्षणाला प्रतिपादन करणारे पंचमवर्णक भाष्य ॥

भाष्य

॥ अथ ब्रह्माच्या लक्षण व उपलक्षणाला प्रतिपादन करणारे पञ्चमवर्णक ॥

॥ भाष्य ॥

ब्रह्मविजिज्ञासितव्यमित्युक्तम्। किंलक्षणं पुनस्तद्ब्रह्मेत्यत आह भगवान्सूत्रकारः —

जन्माद्यस्य यतः ॥२॥

जन्मोत्पत्तिरादिरस्येति तद्गुणसंविज्ञानो बहुव्रीहिः। जन्मस्थिति-

---

॥ व्याख्यान ॥

'ब्रह्मविजिज्ञासितव्यमिति उक्तम्' = ब्रह्मज्ञानाची इच्छा करणाऱ्यानें या शास्त्राचें श्रवण (= विचार) करावे असें सांगितले असा अर्थ. जेंव्हां हें असें सांगितलें तेंव्हांच ब्रह्माचे लक्षण प्रमाण युक्ति साधन प्रयोजन असे सर्व व्याख्येयत्वाने प्रतिज्ञात आहे. त्यांत स्वरूपाचा अभ्यर्हितत्व (= सर्वतः श्रेष्ठत्व) असल्यामुळे ते प्रथम निर्देश करण्यास योग्य आहे. (मग) 'किंलक्षणं पुनः तद्ब्रह्म' = त्या ब्रह्माचे पुनः काय लक्षण आहे? 'किं' शब्द आक्षेपार्थी आहे. त्याला लक्षण नाहींच असा अर्थ. 'इत्यत आह भगवान् सूत्रकारः' = असा आक्षेप आहे म्हणून भगवान्सूत्रकार (लक्षणाला) सांगतात - 'जन्माद्यस्य यतः इति' युक्तीही लक्षणनिर्णयांत सामर्थ्यावरून सूचित आहेच. 'जन्मोत्पत्तिरादिरस्येति तद्गुणसंविज्ञानो बहुव्रीहिः' जन्म = उत्पत्ति आदि आहे ज्या (उत्पत्तिस्थितिभंगा) ला ते जन्मादि असा येथें तद्गुणसंविज्ञान[1] बहुव्रीहि समास आहे. असे याने पदच्छेद पदाचा अर्थ व पदविग्रह असे हें नित्यरीत्या व्याख्यानांग संपादन करितात. तद्गुणसंविज्ञानविषयी प्रयोजन

॥ टिप्पणी ॥

[1] 'तद्गुणसंविज्ञान' = विशेष्याचा एकदेशच विशेषण करून समास असणे असा अर्थ.

5 पं.पा. पृ. २५ पं. ७३

भंगं समासार्थः । जन्मनश्चादित्वं श्रुतिनिर्देशापक्षं वस्तुवृत्तापेक्षं च । श्रुतिनिर्देशस्तावत् "यतो वा इमानि भूतानि जायन्ते" [तै. ३.१] इत्यस्मिन्वाक्ये जन्मस्थितिप्रलयानां क्रमदर्शनात् । वस्तुवृत्तमपि जन्मना लब्धसत्ताकस्य धर्मिणः स्थितिप्रलयसंभवात् ।

॥ व्याख्यान ॥

सांगतात- 'जन्मस्थितिभंगं समासार्थः' = जन्म स्थिति व नाश समासाचा अर्थ आहे. द्वितीय (नपुंसक) लिंग एकवचनाचा निर्देश करून संहति प्रधान समासाचा अर्थ आहे. पण आदि पूर्वकाळ कोणी मानलेला असतो. (अनादि) प्रपंचाला (प्रपंचाच्या जन्माला) त्याचा अभाव असतां आदि नामक कोणतेही (जन्मोत्पत्त्यांना आदित्व कसें?) अशी आशंका असतां सांगतात- 'जन्मनश्चादित्वं श्रुतिनिर्देशपक्षम्' = जन्माला आदित्व तर श्रुतीतील निर्देशाच्या अपेक्षेने आहे. 'वस्तुवृत्तापेक्षं च' = व वस्तुस्वभावाच्या अपेक्षेनेही आहे. जे या सूत्राने लक्षित ब्रह्म त्याच्या स्वरूपाच्या कथनपर श्रुतिवाक्य आहे. त्यांत प्रारंभी जन्म सांगितला आहे. म्हणून त्याला आदित्व आहे असा अर्थ. त्यालाच सांगतात- 'श्रुतिनिर्देशस्तावत्' = कारण श्रुतीच्या निर्देशांत - 'यतो वा इमानि भूतानि जायन्ते' इति = ज्याच्यापासून निश्चयें करून हीं भूतें उत्पन्न होतात, इत्यादि आहे. व 'अस्मिन्वाक्ये' वाक्यांत 'जन्मस्थितिप्रलयानां क्रमदर्शनात्' = जन्म स्थिति प्रलयांचा क्रम दिसतो त्यांत आदित्व वस्तुस्वभावाच्या अपेक्षेनेही आहे. त्याला सांगतात- 'वस्तुवृत्तमपि' = वस्तूचा (उत्पन्न होऊन स्थित होऊन नाश होणे) असा स्वभावही जन्माच्या आदित्वाला निमित्त आहे असा अर्थ. 'जन्मना लब्धसत्ताकस्य धर्मिणः स्थितिप्रलयसंभवात्' = कारण

अस्येति प्रत्यक्षादिसन्निधापितस्य धर्मिण इदमा निर्देशः । षष्ठी जन्मादिधर्मसंबंधार्था । यत इति कारणनिर्देशः ।

॥ व्याख्यान ॥

जन्माच्या योगाने सत्ता प्राप्त झालेल्या धर्मीला स्थिति व प्रलय संभवतात. वस्तु तर प्रलयाला प्राप्त होऊन स्थिर होत नाहीत किंवा राहून उत्पन्न होत नाहीत व उत्पन्न होऊन नंतर प्रलीन होत नाहीत. कारण क्षणिकत्वाचे निराकरण केलेले आहे. म्हणून उत्पन्न होऊन स्थित होऊन प्रलीन होतो असा हा (क्रमाने) अनादि प्रपंच आहे. 'अस्येति' = येथे असा 'इदमा' = अस्य याच्यासोबत 'इदं' हेने 'प्रत्यक्षादिसन्निधापितस्य धर्मिणः' = प्रत्यक्षादिकांनी प्रतीत होणाऱ्या धर्मीचा = आकाशादि या जगताचा 'निर्देशः' = निर्देश आहे. 'अस्य' इत्यादि भाष्यांत 'अस्य' पदाचा भाग 'इदम्' या प्रातिपदिकमात्राच्या अर्थाचा निर्देश आहे. तसेंच सर्वत्र सर्वनाम उपक्रमादि कारणान्तर बळाने कोणाच्या अभिधेयपर असते. त्याचा अभाव असतां आपल्या महिम्याने प्रमाणाच्या विषयमात्राला (= सर्वाला) अभिधायक असते. त्याने सांगितले 'प्रत्यक्षादि' येथील 'आदि' पदानें अनुमानादि प्रमाणें जाणावीत. 'षष्ठी जन्मादिधर्मसंबंधार्था' = षष्ठी जन्मादि धर्मांच्या धर्मी जगताशी संबंधाकरिता आहे. येथे जगताच्या जन्मादिकांशी सर्वच (उत्पत्ति स्थिति लयात्मक) संबंध संभवतो. त्याचा विशेष आदरणीय नाही असा अर्थ. 'यतः' इति कारणनिर्देशः' = ज्याच्यापासून असा कारणाचा निर्देश आहे. प्रकृतित्व (उपादानकारणत्व) संबंधाकरिता पंचमी आहे. दुसऱ्या (कारणाहून अन्य) संबंधाकरिता नाही. असे येथे दाखविले आहे.

॥ टिप्पणी ॥

'प्रकृतित्वसंबंधाकरिता' = हें निमित्तत्वाचेंही उपलक्षण आहे. कारण येथें [illegible] पंचमीचें विधान आहे. [illegible] एक प्रकृति तर अनुमानाने केलेले. कारण ब्रह्मवस्तु एकमेवाद्वितीय [illegible].

अस्यजगतो नामरूपाभ्यां व्याकृतस्यानेककर्तृभोक्तृसंयुक्तस्य प्रति

॥ व्याख्यान ।

ब्रह्म[१] वस्तूचे स्वरूप लक्षण सांगण्याकरिता उपक्रम करितात – 'अस्यजगतः' इत्यादि. दोन प्रकारचे तर लक्षण आहे. उपलक्षण व विशेषलक्षण. त्यांत हे लक्षण प्रपंचाच्या धर्मत्वामुळे पृथक्भूतच कारणाला उपलक्षित करिते. विशेषणत्वाने नव्हे. म्हणून (यतःशब्दाने) पृथक् ('सत्यंज्ञानमनंतं' 'आनंदो') असे स्वरूपलक्षणाचे कथन आहे. सूत्रातील पदार्थाला सांगून पूर्वसूत्रस्थ ब्रह्मपदाच्या अनुषंगाने व 'तत्' शब्दाच्या अध्याहाराने सूत्रवाक्यार्थाला सांगतात – 'अस्यजगतः' या जगताचे. कारणाच्या सर्वज्ञत्वादिकांच्या संभावनेकरिता जगताच्या विशेषणांना सांगतात – 'नामरूपाभ्यां व्याकृतस्य' = नामरूपांशी सह प्रगट केल्या गेलेल्या. कार्यप्रपंचाला स्वप्रक्रियेच्या अनुसार कोणी कोण्या रीतीने विभाग करितात. त्यांच्या निरासाकरिता प्रसिद्धार्थानुवादक श्रुतिबलाने द्वैराश्य करून सांगण्याकरिता 'नामरूपाभ्यां' असे म्हटले. हा इत्थंभावांत तृतीया आहे. त्यांच्याशी अभिन्नतेने असा अर्थ. प्रगट केली जाणारी वस्तु तर अभिधेयाचे स्वरूप व त्याचे नाम मनांत असतां त्या विकल्पपूर्वकच प्रगट केली जाते. असेंहे स्वसंवेद्य आहे असा अर्थ. हिरण्यगर्भादि जीव जन्यत्वाच्या निरासाकरिता – 'अनेककर्तृभोक्तृसंयुक्तस्य' = अनेक कर्ता भोक्त्यांनी संयुक्त अशा. श्राद्ध वैश्वानर इष्ट्यादिकांत कर्ता व भोक्ता अशा पिता पुत्रादिकांचा भेद असल्यामुळे येथें कर्ते व भोक्त्यांची पृथक् उक्ती आहे. यानें कर्तृत्व भोक्तृत्वही नामरूपात्मक असल्यामुळे ते प्रपंचरूप आहे म्हणून त्या उपाधीने युक्त जीवही तदन्तःपाति असल्यामुळे त्यांना जगत्कारणत्व नाही असे दाखविले.

[१] पं. पा. पृ. ७७ पं. ७

नियत देशकालनिमित्त क्रियाफलाश्रयस्य मनसाप्यचिन्त्यरचनारूपस्य जन्मस्थितिभंगं यतः सर्वज्ञात्सर्वशक्तेः कारणाद्भवति तद्ब्रह्मेति वाक्यशेषः।

॥ व्याख्यान ॥

कारणाचा सर्वज्ञत्वाची संभावना करितात – 'प्रतिनियत' 'प्रतिनियतानि' = व्यवस्थित आहेत 'देशकाल निमित्तानि येषां क्रियाफलानां तदाश्रयस्य' = देशकालनिमित्ते ज्या क्रियाफलांची त्यांच्या आश्रय अशा. ऐहिक कर्मफलाच्या उपभोगांत निश्चित देश, स्वर्गफलाला मेरुपृष्ठ, ग्रामादिफलाला भूमंडळ, कालही स्वर्गफलाला देहपाताच्या नंतरचा, पुत्रफलाला बालभावाच्या नंतरचा, निमित्तही कर्मफलाकरिता मरणाला उत्तरायणादि. याप्रमाणे राजसेवाफल ग्रामादि देशादिकांची व्यवस्था जाणावी. या राजसेवा दृष्टान्तावरून येथे सर्वज्ञत्वाची संभावना केली जाते. सर्वशक्तित्वाची संभावना करितात – 'मनसाप्यचिन्त्यरचनारूपस्य' = मनाने ही अचिन्त्य आहे रचनारूप ज्याचे अशा. अल्पज्ञ तर कधीच बहिर्भागाच्या संनिवेश प्रकाराला व अध्यात्म अशा प्रतिनियत अर्थक्रियासमर्थ अवयव शिराजाल संनिवेशाला (= शरीराला) वा निरूपण करण्याकरिताही समर्थ नाही. तेव्हां निर्मित करण्याकरिता समर्थ नाही हें काय सांगावे? असा अर्थ. 'जन्मस्थितिभंगम्' = (या जगताचे) जन्मस्थिति नाश. येथें 'जन्मस्थितिभंगम्' असें एकवचन देण्याचे कारण हे तीन्ही कारणे मिळूनच हें लक्षण आहे असे सूचित करणे हे आहे. हे पूर्वी दाखविले. 'यतः सर्वज्ञात् सर्वशक्तेः कारणात् भवति' = ज्या सर्वज्ञ सर्वशक्ति कारणापासून होते = होतात. 'तद्ब्रह्मेति वाक्यशेषः' = ते ब्रह्म आहे असा येथें वाक्याचा शेष जाणावा. यानें साकांक्ष सूत्रवाक्याला आकांक्षित 'ते ब्रह्म आहे' अशा पदांनी पूर्ण केले. व उपलक्षित ब्रह्माचे स्वरूप व लक्षण दाखविले. सूचविलेले 'यत्' शब्दाने 'सत्यंज्ञानमनंतंब्रह्म' [तै. २।१] "आनंदो ब्रह्म" [तै. ३।६] अशा रीतीने

अन्येषामपि भावविकाराणां त्रिष्वेवान्तर्भाव इति जन्मस्थितिनाशानामिह ग्रहणम्। यास्कपरिपठितानां तु 'जायतेऽस्ति' इत्यादीनां ग्रहणे तेषां जगतः स्थितिकाले संभाव्यमानत्वान्मूलकारणादुत्पत्ति

सत्य ज्ञान अनंत आनंदरूप वस्तु सांगितली जाते. कारण "आनंदाध्येव खल्विमानि भूतानि जायन्ते" [तै. ३।६] असा निर्णय केलेला आहे. व तसें असतां स्वरूपलक्षणाची ही सिद्धि होते.

ऽ पण अन्यही परिणामादिक भावविकार आहेत ते सूत्रातील जन्मादि यधील आदि पदाने काय म्हणून ग्रहण केले जात नाहीत? त्यावर सांगतात– "अन्येषामपि भावविकाराणां" = अन्यही भावविकारांच्या = वृद्धि परिणाम व अपक्षयांच्या 'त्रिष्वेव' = तीनमध्येंच = वृद्धि व परिणामाचा जन्मांत व अपक्षयाचा नाशांत 'अंतर्भावः इति' = अंतर्भाव होत असल्यामुळे 'जन्मस्थितिनाशानामिह ग्रहणम्' = जन्मस्थितिनाशांचे येथें ग्रहण आहे. वस्तूचा कोणी अवस्थाविशेष (= जन्मादि) विनाशरहित नसतो. तसेंच उत्पन्न न झालेला आस्थित स्वभावाचा विनाश होत नाही. म्हणून जन्म स्थिति नाशांचेच येथें ग्रहण आहे. इतरांचा तीनमध्येंच अंतर्भाव होत असल्यामुळे त्यांचा पृथक् उपन्यास नाही. असा अर्थ. पण 'जायतेऽस्ति वर्धते विपरिणमते अपक्षीयते विनश्यति" [निरुक्त निघंटु १।२।८] असे सहा भावविकार आहेत असें निरुक्तात सांगितलें आहे. त्यांचे ग्रहण असतां अंतर्भावाच्या उक्तीच्या प्रयासावाचून परिहार होतो! अशी आशंका असतां सांगतात– 'यास्कपरिपठितानां तु' = यास्कमुनीने परिपठित तर 'जायतेऽस्ति इत्यादीनां ग्रहणे' = जायतेऽस्ति इत्यादिकांचे ग्रहण असतां 'तेषां जगतः स्थितिकाले संभाव्यमानत्वात्' = त्यांना जगताच्या स्थितिकाळी संभाव्यमानत्व असल्यामुळे

ऽ पं. पा. पृ. ८८ पं. २६

स्थितिनाशा जगतो न गृहीतास्युरित्याशक्येत तन्माशंकीति योत्पत्तिर्ब्रह्मणः तत्रैव स्थितिप्रलयश्च तएव गृह्यन्ते।

'मूलकारणादुत्पत्तिस्थितिनाशा जगतो न गृहीताः स्युः' = मूळकारणापासून जगताचे उत्पत्ति-स्थितिनाश ग्रहण केले नाहीत? 'इत्याशंक्येत' = अशी आशंका घेतली जाईल. 'तन्माशंकीति' ती घेतली जाऊं नये म्हणून 'योत्पत्तिर्ब्रह्मणः' = ब्रह्मापासून जगताची जी 'तत्रैव स्थिति-प्रलयश्च' = तेथेंच जे त्याचे स्थिति व प्रलय 'त एव गृह्यन्ते' = ते (येथें ब्रह्म लक्षण वाक्यांत सूत्रांत) ग्रहण केले जातात. पृथिवी आप तेज जगताच्या रचनारूपानें स्थित असतां तन्मयभावांच्या उत्पत्त्यादिकांची त्यांच्यापासूनच संभावना केली जाते. म्हणून त्या उत्पत्त्यादिकांचे ग्रहण असतां त्यापासून त्याचे ब्रह्मत्वाने लक्षित त्याची शंका येईल. परंतु ती युक्त नाही. म्हणून सूत्राच्या अर्थवत्त्वाकरितां (= ब्रह्माच्या लक्षितत्वाकरितां) श्रुतिनिर्दिष्टच उत्पत्ति स्थिति लय ग्रहण केले जातात. कारण सूत्रांना श्रुत्यर्थ निर्णयार्थत्व आहे. म्हणून ज्याच्या आधारावर सर्व प्रपंच विवर्तावकाश होतो तेंच मूळकारण ब्रह्म आहे. असा सूत्राचा अर्थ. पण [illegible] जन्मच गृहीत असो कारण तेवढ्यानेंच अर्थ सिद्ध होतो? नाही कारण केवळ निमित्तकारणत्वाच्या शंकेच्या निरासाकरितां स्थितिप्रलय आहेत. अनुपादानद्रव्य निमित्तांत तर 'स्थितिप्रलय' संभवत नाहीत. अशा भावाने 'तत्रैव स्थितिप्रलय' असें म्हटलें (विवरण प्रमेयसंग्रह)

ऽ पण श्रुतीने निर्दिष्टाचे ग्रहण असतां सूत्र अर्थशून्य होईल. या पृथिवीला तर उत्पन्न झालेली आम्ही पाहत नाही. आपाला नाही. तेजाला नाही. तेव्हां सिद्ध असल्याप्रमाणे त्यांचे उत्पत्त्यादि.

ऽ पं. पा. पृ. ८८ पं. ९

न यथोक्तविशेषणस्य जगतो यथोक्तविशेषणमीश्वरं मुक्त्वाऽन्यतः
प्रधानादचेतनादणुभ्योऽभावात्संसारिणो वा उत्पत्त्यादि संभावयितुं

॥ व्याख्यान ॥

लक्षणत्वानें कसें ग्रहण केलें जाते? सांगतो - तेजाच्या तर अरणीनिर्मन्थनादिकांत जन्म दिसतो. इंधनाचा क्षय असतां नाश दिसतो. जलाचाही चंद्रकांतादिकांत जन्म दिसतो व क्रमाने शोष दिसतो. पृथिवीचाही अवयवांचा संयोग विभाग दिसत असल्यामुळे त्यांच्या निमित्ताने जन्मविनाशांचे अनुमान केले जाते. अवयवांच्या संयोग विभागाने केवळ पृथिवीच्या एकदेशाचे जन्मविनाश संप्रत दिसतात तरी. वायु आकाश काळ दिशांचेही "यावद्विकारं तु विभागो लोकवत्" [ब्र.सू.२।३।७] या वक्ष्यमाण न्यायाने जन्मविनाश आहेतच.

श्रुतीही ब्रह्मस्वरूपनिर्णयाकरिता याच सूत्राने तंत्राने किंवा 'यतः अस्य जन्मादि संभवति' अशा आवृत्तीने सूचित आहे, असें दाखवितात - 'यथोक्तविशेषणस्य' 'नामरूपाभ्यां व्याकृतस्य' इत्यादि सांगितलेली चार विशेषणे ज्याला आहेत अशा 'जगतः' = जगताचे 'यथोक्तविशेषणं ईश्वरं मुक्त्वा' = सांगितलेली सर्वज्ञ सर्वशक्ति विशेषणे ज्याला आहेत अशा ईश्वराला सोडून 'अन्यतः' = दुसऱ्याने परिकल्पित अन्य अशा 'अचेतनात्प्रधानात्' = अचेतन प्रधानापासून 'अणुभ्यः' = अणुपासून 'अभावात्' अभावापासून 'संसारिणो वा' = किंवा चेतन अशा परिच्छिन्न ज्ञानक्रियाशक्ति संसारी हिरण्यगर्भादि जीवापासून 'उत्पत्त्यादि' उत्पत्ति स्थिति लय 'संभावयितुं न शक्यम्' = संभावित करण्यास शक्य नाहीत. अचेतनापासून तर अचेतनत्वामुळेच अनुपपन्न आहे. चेतनापासूनही परिच्छिन्न ज्ञानक्रिया शक्तित्वामुळे (उत्पत्त्यादि) अनुपपन्न आहे. अभावापासून तर

१ पं.भा.पृ.७८ पं.१६ [illegible] पं.पा.वि.७८ पं.२१

शक्यम् । न च स्वभावतः विशिष्टदेशकालनिमित्तानामिहोपादानात् । ए-
तदेवानुमानं संसारिव्यतिरिक्तेश्वरास्तित्वादिसाधनं मन्यन्ते ईश्वर-

॥ व्याख्यान ॥

केवळ अचेतनत्वामुळेच अनुपपत्ति नाही. परंतु निरुपाख्यत्वामुळे अतीतकल्पातील संस्काराच्या अभावामुळे पूर्वकल्पाशी एकरूप वर्तमानही कल्प आहे अशा प्रमाणाचा अभाव आहे म्हणून सर्वच व्यवहार यादृच्छिक आहे त्यामुळे कोठे कोणी नियम होणार नाही. स्वभावापासूनच विचित्र जगत् उत्पन्न होते असे लोकायत म्हणतो. त्याचे निरास करितात - 'न च स्वभावतः' स्वभावापासून ही नाही कारण 'इह' = येथे = कार्योत्पत्तीत 'विशिष्टदेशकालनिमित्तानामुपादानात्' = विशिष्ट देशकाल निमित्तांचे ग्रहण केले जाते. स्वभाव = अन्याची अपेक्षा नसणारा. त्याने अपेक्षाच अनुपपन्न आहे. तसेच नियमाचा संभव कसा असणार? परंतु नियम तर दिसतो असा अर्थ. म्हणून श्रुतीनेही प्रधानादि वस्त्वंतराच्या कारणत्व संभावनेच्या निराकरणाने परिशेषावरून पूर्वोक्तविशेषण ईश्वरच कारण आहे असें सिद्ध होते. 'एतदेव' = हेच = यथोक्त विशेषण ईश्वराला सोडून दुसऱ्यापासून जगताचे जन्मादिक संभवत नाहीत. अशी जी ही युक्ति सांगितली - हेच 'अनुमानम्' = स्वतंत्र अनुमान 'संसारिव्यतिरिक्त' = संसारी हिरण्यगर्भादि जीवाहून भिन्न 'ईश्वरास्तित्वादि साधनम्' = ईश्वराच्या अस्तित्वाच्या सिद्धीकरिता व सर्वज्ञत्व व सर्वशक्तित्वाच्या सिद्धीकरिता प्रमाण आहे वेदवाक्यांनी काही असें 'ईश्वरकारणिनः' = ईश्वराला कारण मानणारे काणादप्रभृति 'मन्यन्ते' मानतात. कारण जन्मादि सूत्राने लक्षित ही "यतो वा इमानि भूतानि जायन्ते" [तै.३।१] इत्यादि वाक्यें परार्थानुमानवाक्य समान दिसतात. असें ते म्हणतात. परंतु तें युक्त नाही कारण अतीन्द्रिय

१ पं.भा.पृ.७९ पं.[illegible] पं.पा.वि.७९ पं.२

कारणिनः। नन्विहापि तदेवोपन्यस्तं जन्मादिसूत्रे। न। वेदान्तवाक्यकुसुमग्रथनार्थत्वात्सूत्राणाम्। वेदान्तवाक्यानि हि सूत्रैरुदाहृत्य विचार्यन्ते। वाक्यार्थविचारणाध्यवसाननिर्वृत्ता हि ब्रह्मावगति-

---

॥ व्याख्यान ॥

अर्थात श्रुतीच प्रमाण आहे. व श्रुत्यर्थाच्या संभावनार्थत्वानें अनुमान युक्ति मान्य आहे. स्वतंत्र नाही) असा भाव. यावर वैशेषिक शंका घेतो- 'नन्विहापि'= पण येथेंही 'जन्मादिसूत्रे'= जन्मादिसूत्रांत 'तदेवोपन्यस्तम्'= तें अनुमानच पुढें ठेवलें आहे? जसें धूम विशेषाला अगरु अग्निसंभवत्व आहे, तसें प्रपंच सन्निवेश विशेषाला सर्वज्ञत्वादि गुण कारणत्व आहे- असें. खरें तेंच उपाकरणत्वानें उपन्यस्त आहे. तरी सूत्राचें तात्पर्य नाही. सूत्राचें तात्पर्य तर वेदान्तवाक्यग्रथनांत आहे असें सांगतात- 'न'= नाही. 'वेदान्तवाक्यकुसुमग्रथनार्थत्वात् सूत्राणाम्'= कारण सूत्रांना वेदान्त वाक्य पुष्पग्रथन प्रयोजनत्व आहे. त्याचाच प्रपंच (करितात)- 'हि'= निश्चयेंकरून 'सूत्रैः'= सूत्रांनी 'वेदान्तवाक्यानि'= वेदान्तवाक्यें 'उदाहृत्य विचार्यन्ते'= उदाहरण घेऊन विचार केलीं जातात. पुनः मुमुक्षुला ब्रह्मावगति अभीष्ट आहे कीं जिच्या करितां शास्त्राचा आरंभ आहे. ती तर अनुमानापासून सिद्ध होत नाही. कारण "तं त्वौपनिषदं पुरुषं" [बृ ३।९।२६] अशी श्रुति आहे म्हणून अनुमान विचार्य नाही. असें सांगतात. 'हि'= निश्चयेंकरून 'वाक्यार्थविचारणाध्यवसाननिर्वृत्ता'= समन्वय सूत्र प्रमुखांनीं ग्रहण केलेल्या शब्दशास्त्रानुसार 'वाक्यार्थविचारणारूप न्यायापासून वाक्यार्थ प्रत्नांत तात्पर्य आहे असा 'अध्यवसानाचे = निश्चयानें सिद्ध होणारी 'ब्रह्मावगतिः' ब्रह्माची अपरोक्षता आहे.

र्नानुमानादिप्रमाणान्तरनिर्वृत्ता। सत्सु हि वेदान्तवाक्येषु जन्मादिकारणवादिषु तदर्थग्रहणदार्ढ्यायानुमानमपि वेदान्तवाक्याविरोधि प्रमाणं भवन्न निवार्यते। श्रुत्यैव च सहायत्वेन तर्कस्याभ्युपेतत्वात्। तथा हि 'श्रोतव्यो मन्तव्यः" [बृ २।४।५] इति श्रुतिः। 'पण्डितो मेधावी गंधारानेवोपसंपद्येतैवमेवेहाचार्यवान् पुरुषो वेद' [छां ६।१४।२] इति च पुरुषबुद्धिसाहाय्यमात्मनो दर्शयति

॥ व्याख्यान ॥

'नानुमानादिप्रमाणान्तरनिर्वृत्ता'= अनुमानादि दुसऱ्या प्रमाणांनीं सिद्ध होणारी नाही. पण मग काय अनुमान उपेक्षितच आहे? नाही असें सांगतात- 'सत्सु' 'जगज्जन्मादिकारणवादिषु'= जगताच्या जन्मादिकारणाला सांगणारीं 'वेदान्तवाक्येषु सत्सु'= वेदान्तवाक्यें असतांना 'तदर्थग्रहणदार्ढ्याय'= त्या अर्थग्रहणाच्या दृढतेकरितां 'अनुमानमपि'= अनुमानही 'वेदान्तवाक्याविरोधि'= वेदान्तवाक्यांच्या अविरोधि 'प्रमाणं भवन्न निवार्यते'= प्रमाण होणारें निवारण केलें जात नाही. कारण 'श्रुत्यैव च सहायत्वेन'= श्रुतीनेंच सहायत्वानें 'तर्कस्याभ्युपेतत्वात्'= तर्काला स्वीकारलें आहे. 'तथा हि'= तशीच 'श्रोतव्यो मन्तव्यः' श्रवण करावें मनन करावें' इति श्रुतिः'= अशी श्रुति आहे. श्रुतीनें जसें श्रवण ब्रह्मज्ञानाचा हेतु अनुभवाला अनुसरून सांगितलें आहे. तसें मनन (श्रुत्यनुग्राहीतर्क) ही सिद्ध असल्या प्रमाण अनुसरून सांगितलें आहे. असाच अर्थ 'पण्डितो'= सांगितलेल्या अर्थाला ग्रहण करण्यास समर्थ 'मेधावी'= स्वतः तर्ककुशल 'गंधारानेवोपसंपद्येत'= जसा गंधार स्वदेशालाच प्राप्त होईल (होतो) 'एवमेव'= याप्रमाणेच 'इह'= या संसारांत 'आचार्यवान्पुरुषो वेद'= आचार्यवान् पुरुष ब्रह्माला जाणतो' इति च'= अशा रीतीनें दुसरी श्रुतीही 'पुरुषबुद्धिसाहाय्यमात्मनो दर्शयति'

न धर्मजिज्ञासायामिव श्रुत्यादय एव प्रमाणं ब्रह्मजिज्ञासायाम्। किन्तु श्रुत्यादयोऽनुभवादयश्च यथासंभवमिह प्रमाणम्। अनुभवावसानत्वाद्भूतवस्तुविषयत्वाच्च ब्रह्मज्ञानस्य। कर्तव्ये हि विषये नानुभवापेक्षाऽस्तीति

॥ व्याख्यान ॥

= आपल्यावा पुरुषमतिरूप तर्काची अपेक्षा दाखविते. जें श्रुत्यनुसारी आचार्याने स्फटिकादि दृष्टांताने शिष्यांना प्रत्यय दार्ढ्य प्राप्त करणें 'तें 'आचार्यवान् पुरुषो वेद' असें अनुवाद करून सांगते. (पण वेदार्थत्वामुळे धर्मा प्रमाणे ब्रह्मालाही मननादिकांची अपेक्षा युक्त नाही परंतु श्रुति लिङ्ग फ वाक्यादिकच अपेक्षित आहेत? अशी आशंका असतां) श्रुति सहायांच्या अपेक्षे विषयीं कारण सांगतात- 'न' इत्यादि. 'धर्मजिज्ञासायामिव' = धर्मजिज्ञासेंत = जिज्ञास्य जो धर्म त्यांत ज्याप्रमाणे त्याप्रमाणे 'ब्रह्मजिज्ञासायाम्' = ब्रह्मजिज्ञासेंत = जिज्ञास्य जें ब्रह्म त्यांत 'श्रुत्यादय एव न प्रमाणम्' = श्रुत्यादिकच प्रमाण नाहींत. आदि शब्दाने लिङ्गवाक्यादिक शब्द प्रकार ग्रहण केले जातात. 'किंतु' = परंतु 'श्रुत्यादयोऽनुभवादयश्च' = श्रुत्यादिक व अनुभवादिक. 'यथासंभवमिह प्रमाणम्' = जसा संभव असेल त्याप्रमाणे येथे-जिज्ञास्य ब्रह्मांत प्रमाण आहेत. 'अनुभव' = ब्रह्मसाक्षात्काररूपी विद्वदनुभव. आदि-
६ पं. पा. पृ. ७८ पं. २२
पदानें मनन निदिध्यासनांचे ग्रहण जाणावें. ~~तेंच ब्रह्मांत प्रमाण नाहींत~~ परंतु अनुभवादिकही आहेत या विषयीं हेतु सांगतात- 'कारण' 'ब्रह्मज्ञानस्य' शाब्द ब्रह्मज्ञानाला 'अनुभवावसानत्वात्' = मुख्यार्थ अनुभव पर्यंतत्व आहे. 'भूतवस्तुविषयत्वाच्च' = व भूतवस्तुविषयत्व आहे. ज्या अर्थी सिद्ध वस्तूंत अनुभव संभवतो व अनुभवापर्यंत आकांक्षा निवृत्ति आहे. त्या अर्थी (मननादिकांची अपेक्षा युक्त आहे) असा अर्थ. पण धर्मजिज्ञासेंत अनुभवा

फ 'लिङ्गवाक्यादिकम्' - तसेंच अध्वे ओळखो. 'श्रुतिलिङ्गवाक्यप्रकरणस्थानसमाख्यानां समवाये पारदौर्बल्यमर्थविप्रकर्षात्' [जैसू-३।३।१४]

श्रुत्यादीनामेव प्रामाण्यं स्यात्। पुरुषाधीनात्मलाभत्वाच्च कर्तव्यस्य। कर्तुमकर्तुमन्यथा वा कर्तुं शक्यं लौकिकं वैदिकं च कर्म, यथाश्वेन गच्छति पद्भ्यामन्यथा वा न वा गच्छतीति। तथा 'अतिरात्रे षोडशिनं

॥ व्याख्यान ॥

वाचूनही शब्दशक्तीच्या अनुसरणमात्रानेच निराकांक्ष फलपर्यंत ज्ञान होते. तर्कांच्या गंधमात्राचीही अपेक्षा नसते तसें येथेंही होईल कारण वेदान्तवाक्यांना प्रमाणत्व समान आहे? अशी आशंका असतां विशेषाला सांगतात- 'कर्तव्ये हि विषये' इत्यादि 'ब्रह्मज्ञानमपि वस्तुतन्त्रमेव भूतवस्तुविषयत्वात्' इत्यन्त भाष्याने.. ~~कशी? (अपेक्षा करीत नाहीं?) निवा (अनपेक्षता) सांगतात~~ - 'हि' = निश्चय-करून 'कर्तव्ये विषये' = कर्तव्य विषयांत 'नानुभवापेक्षास्तीति' अनुभवाची अपेक्षा नसते (कारण तेथें अनुष्ठानमात्राने पुरुषार्थाची सिद्धि होते व अनुष्ठानाची ज्ञानमात्राने सिद्धि होते) म्हणून. 'श्रुत्यादीनामेव प्रामाण्यं स्यात्' श्रुत्यादिकांनाच प्रामाण्य आहे. 'कर्तव्यस्य' कर्तव्याचा 'पुरुषाधीनात्मलाभत्वाच्च' = कर्तव्याचा पुरुषाधीन स्वरूपलाभ होणें असल्यामुळे हि (त्याला
वानिरपेक्षत्व असल्यामुळे
साध्यत्व असल्यामुळे तेथे अनुभवाचा असंभव आहे. म्हणूनही) तेथे श्रुत्यादिकांनाच प्रामाण्य आहे असा अन्वय. धर्माचे पुरुषाधीनत्व लौकिक कर्मांच्या दृष्टान्ताने स्पष्ट करितात- 'लौकिकं वैदिकं च कर्म' = लौकिक कर्मा प्रमाणे वैदिक कर्मही 'कर्तुमकर्तुमन्यथा वा कर्तुं शक्यम्' करणे न करणे किंवा अन्यथा करणे शक्य आहे. दृष्टान्ताचे स्पष्टीकरण करितात- 'यथाश्वेन गच्छति पद्भ्यामन्यथा वा न वा गच्छतीति' जसे अश्वानें गमन करितो किंवा पायांनीं किंवा दुसऱ्या साधनाने किंवा गमन करीत नाही. दार्ष्टान्तिकाला सांगतात- 'तथा' तसें 'अतिरात्रे षोडशिनं गृह्णाति' = अतिरात्र यागांत षोडशी पात्र ग्रहण करितो 'नाति-

१५/२१४ १८/२१२

गृह्णाति नातिरात्रे शोडषिनं गृह्णाति" "उदिते जुहोति अनुदिते जुहोतीति।
विधिप्रतिषेधाश्चात्रार्थवन्तः स्युः विकल्पोत्सर्गापवादाश्च। न तु वस्त्वेवं
नैवमस्ति नास्तीति वा विकल्प्यते। विकल्पनास्तु पुरुषबुद्ध्यपेक्षाः। न

॥ व्याख्यान ॥

रात्रे षोडशिनं गृह्णाति = अतिरात्र यागांत शोडषीचा ग्रहण करीत नाही. अशा रितीने धर्मा-
ला करण्याकरिता व न करण्याकरिता शक्यत्व सांगुन अन्यथा करण्याकरिता शक्यत्व सांगतात-
'उदिते जुहोति अनुदिते जुहोति' = सूर्योदय झाला असतां हवन करितो. सूर्योदय न झाला अ-
सतां हवन करितो. 'इति' असें धर्माचा साध्यत्वाचे उपपादन करून तेथें विध्यादियोग्यतेला
सांगतात - 'विधिप्रतिषेधाश्च' = विधिप्रतिषेध ही 'अत्र' = येथें [illegible] 'अर्थवन्तः
स्युः' = जे साध्य धर्मांत अर्थवान = सावकाश आहेत ते अर्थवान् होतात असा अर्थ. येथील 'च'
काराने पुरुषाधीनत्वाचे ग्रहण जाणावे. 'विकल्पोत्सर्गापवादाश्च' = विकल्प उत्सर्ग अप-
वादही अर्थवान् होतील असा अन्वय. ते ब्रह्मांत होतील अशा येथें इष्टापत्तीचे वारण करितात
'वस्तु तु' = वस्तु तर 'एवम्' = अशी आहे 'नैवम्' अशी नाही 'अस्ति नास्ति इति वा' = किंवा
आहे नाही अशी. 'न विकल्प्यते' = विकल्पित होत नाही. पण आत्मादि वस्तूंतही वाद्यांचे आहे
नाही इत्यादि विकल्प दिसतात? त्यावर सांगतात - 'विकल्पनास्तु' = (संशयविपर्ययरूप)
विकल्प तर 'पुरुषबुद्ध्यपेक्षाः' = पुरुषबुद्धीच्या अपेक्षेने आहेत. प्रमारूप नाहीत.
असा अर्थ. हा भाव - धर्म तर जसा जसा जाणला जातो. तसा तसा करण्यास शक्य आहे. म्हणून
तेथें यथाशास्त्र पुरुषबुद्धीच्या अपेक्षेनी असलेले सर्व विकल्प प्रमारूपच होतात. त्यांचे साम्य
असतां वस्त्वांतही सर्व विकल्प यथार्थ होतील. तेथेंही दोष असें म्हणणाऱ्याप्रत सांगतात-

पंचमवर्णक

१५/२१३ १६/२१६

वस्तुयाथात्म्यज्ञानं पुरुषबुद्ध्यपेक्षम्। किं तर्हि वस्तुतन्त्रमेव तत्। न
हि स्थाणावेकस्मिन् स्थाणुर्वा पुरुषोऽन्यो वेति तत्वज्ञानं भवति। तत्र
पुरुषोन्योवेति मिथ्याज्ञानम्। स्थाणुरेवेति तत्वज्ञानं वस्तुतन्त्रत्वात्।
एवंभूतविषयाणां प्रामाण्यं वस्तुतन्त्रम्। तत्रैवं सति ब्रह्मज्ञानमपि वस्तुतन्त्रमेव

॥ व्याख्यान ॥

न वस्तुयाथात्म्यज्ञानं पुरुषबुद्ध्यपेक्षम् = वस्तूचें याथात्म्यज्ञान पुरुषबुद्धीच्या अपेक्षे-
नी नसतें. जर सिद्ध वस्तु ज्ञानही साध्यज्ञानाप्रमाणे पुरुषबुद्धीच्या अपेक्षेनी उत्पन्न होईल
तर सिद्धांत विकल्प यथार्थ होतील. परंतु सिद्ध वस्तुज्ञान पुरुषबुद्धीच्या अपेक्षेनी नाही.
'किं तर्हि' = मग कसें? 'वस्तुतन्त्रमेव तत्' = ते (प्रमाणव) वस्तुजन्यच आहे व
तसें असतां ~~[illegible]~~ वस्तूला एकरूपत्व असल्यामुळे एकच ज्ञान प्रमा आहे. अन्य विकल्प अ-
यथार्थच आहेत असा अर्थ. याविषयी दृष्टान्त सांगतात - 'स्थाणौ एकस्मिन्' = एका स्था-
णूत 'स्थाणुर्वा पुरुषोन्योवेति तत्वज्ञानं न हि भवति' = स्थाणु किंवा अन्य पुरुष आहे
असें तत्वज्ञान होत नसतें. (कारण एकाला उभयत्वाचा अयोग आहे.) स्थाणुच असें अवधारण
सिद्ध होत असतां सर्व विकल्प यथार्थ होत नाहीत असा अर्थ. तेथें जें वस्तुतंत्र ज्ञान ते यथार्थ आहे
जे पुरुषतंत्र ते मिथ्या आहे असा विभाग करितात - 'तत्र' = तेथें स्थाणूत 'पुरुषोन्योवेति
मिथ्याज्ञानम्' = किंवा अन्य पुरुष हे मिथ्याज्ञान आहे. 'स्थाणुरेवेति तत्वज्ञानम्' = स्थाणूच
आहे असें तत्वज्ञान आहे 'वस्तुतंत्रत्वात्' कारण त्याला वस्तुतन्त्रत्व आहे. स्थाणूंत सांगित-
ले त्या न्यायाचा धर्मादिकांत अतिदेश करितात - 'एवंभूतविषयाणां प्रामाण्यं वस्तुतन्त्रम्' =
याप्रमाणे भूतवस्तुविषयांचें प्रामाण्य वस्तुतंत्र आहे. प्रकृताला सांगतात - 'तत्रैवं सति ब्रह्म

व्याख्यान

ज्ञानमपि वस्तुतंत्रमेव भूतवस्तुविषयत्वात्' = 'तत्रैवं सति' = तसेंच असें असतां ब्रह्मज्ञानही वस्तुजन्यच आहे कारण त्याला भूतवस्तुविषयत्व आहे. सिद्ध अर्थात ज्ञानप्रमात्याला वस्त्वधीनत्व असतां ब्रह्मज्ञानही वस्तुजन्यच यथार्थ आहे पुरुषतंत्र नाही कारण त्याला भूतार्थ विषयत्व आहे. स्थाणुज्ञाना प्रमाणें असा अर्थ. म्हणून साध्य अर्थात सर्वविकल्प पुरुषतंत्र आहेत सिद्ध अर्थात नाही. अशा वैलक्षण्यामुळे ब्रह्माला धर्मजिज्ञासाम्य नाही म्हणून मननादिकांची अपेक्षा सिद्ध होते. असा भाव.

'कर्तव्यविषयांत तर अनुभवाची अपेक्षा नाही' इत्यादिकाचा हा सारांश- कारण कर्तव्य तर कर्तव्यत्वामुळेच असिद्धस्वभाव असलेले अनुभव करण्यास शक्य नाही म्हणून (कर्तव्याचे अनुष्ठान द्वारा पुरुषार्थ साधनत्व असून अनुष्ठानाची ज्ञानमात्राने सिद्धि होत असल्यामुळे) त्याला अनुभवाची आकांक्षा नाही. येथें तर (ब्रह्मांत) साक्षात्कारानें विपर्यासानें गृहीत सिद्धांच्या सम्यक् ज्ञानानें साक्षात्करणावांचून मिथ्या ज्ञानाच्या उदयाची निवृत्ति होत नाही. कारण द्विचंद्रादिकांत तसें दिसते. प्रमाणत्व साम्यामुळे तर कर्तव्य वा सिद्धार्थ निष्ठ वाक्यांच्या बोधन प्रकारांतही साम्य नाही. जर असेल तर (ब्रह्मालाही) पुरुषेच्छावशानें निष्पाद्यत्व होईल. त्यामुळे विधि प्रतिषेध विकल्प समुच्चय उत्सर्ग अपवाद बाध अभ्युच्चय व्यवस्थित विकल्पादिक ही प्राप्त होतील. वस्तुतत्त्व हें युक्त नाही. कारण निःस्वभावत्व प्रसंग येतो. ~~[illegible]~~ तसेच एकाच वस्तूत स्थाणु किंवा पुरुष असा विकल्प वैकल्पिक द्वयात्मक ज्ञानाप्रमाणे सम्यक् ज्ञान होत नाही. कारण स्थाणूच आहे अशी निश्चित ज्ञप्तिता परमार्थ आहे. वस्तुस्वभाव परतंत्र सिद्ध वस्तूचे ज्ञान आहे. ज्ञानपरतंत्र वस्तु नाही. जर असेल तर तशी श्रुति रज्जूतही होईल. कर्तव्य ज्ञानांतर वैपरीत्यांतही सम्यक्त्व

भूतवस्तुविषयत्वात् । ननु भूतवस्तुत्वे ब्रह्मणः प्रमाणान्तरविषयत्वमेवेति वेदान्तवाक्यविचारणाऽनर्थिकैव प्राप्ता । न इन्द्रियाविषयत्वेन संबंधाग्रहणात् । स्वभावतो विषयविषयाणीन्द्रियाणि न ब्रह्मविषयाणि ।

॥ व्याख्यान ॥

असते. कारण "योवाग्नौतमाग्निः" इत्यादिकांत तसें दिसते. तेव्हां असें असतां ब्रह्मज्ञानही वस्तुतंत्रच आहे. कारण त्याला भूतवस्तुविषयत्व आहे. म्हणून येथें युक्तीचा अनुप्रवेश व अनुभवाची अपेक्षा युक्त आहे. इतरत्र नाही - असा.

5 येथें दुसरा (तार्किक) शंका घेतो- 'ननु भूतवस्तुत्वे ब्रह्मणः' = पण ब्रह्माला भूत (सिद्ध) वस्तुत्व असतां 'प्रमाणान्तरविषयत्वमेव' = त्याला प्रमाणान्तराचें (अनुमानाचें) विषयत्वच असो 'इति' = म्हणून 'वेदान्तवाक्यविचारणानर्थिकैव प्राप्ता' = वेदान्तवाक्यांचा विचार अनर्थकच प्राप्त झाला. हा अभिप्राय - भूतत्वामुळे जर ब्रह्मांत युक्तीचाही अनुप्रवेश आहे तर तसें असतां वेदान्तवाक्यांच्या विचाराचा काय उपयोग? जसे ईश्वरकारणवादी अनुमानाने ईश्वराचा विचार करितात तसा येथें (सूत्रांत) अनुमानाने ब्रह्माचा विचार असो. पूर्वसूत्रांत* (जगत्कारणत्वाने ब्रह्माच्या विचारण्या) प्रतिज्ञेचा निर्देश असून या सूत्राने (जगताला कार्यत्व असल्यामुळे आहे) म्हणून अविधान आहे. — असा. उत्तर सांगतात- 'न' नाही. 'इन्द्रियाविषयत्वेन संबंधाग्रहणात्' कारण इन्द्रियांच्या अविषयत्वानें ब्रह्माशी प्रपंचाच्या संबंधाचें ग्रहण होत नाही. ब्रह्माच्या, इंद्रियांनी अग्राह्यत्व विषयीं हेतु सांगतात - 'स्वभावतो विषयविषयाणीन्द्रियाणि न ब्रह्मविषयाणि' = इंद्रियें स्वभावतः विषयविषयक आहेत ब्रह्मविषयक नाहीत. संबंधाच्या ग्रहणा-

---

* 'जगत्कारणत्वाने ब्रह्माच्या' = 'जगत् ब्रह्मकारण आहे त्याला कार्यत्व असल्यामुळे' असा येथें प्रयोग जाणावा.

पा.पा.पृ.-८०५-१५

सति हीन्द्रियविषयत्वे ब्रह्मणः इदं ब्रह्मणा संबद्धं कार्यमिति गृह्येत । कार्यमात्रमेव तु गृह्यमाणं किं ब्रह्मणा संबद्धं किमन्येन केनचिद्वा संबद्धमिति न शक्यं निश्चेतुम् । तस्माज्जन्मादिसूत्रं नानुमानोपन्यासार्थं किं तर्हि वेदान्तवाक्यप्रदर्शनार्थम् ।

॥ व्याख्यान ॥

वाचून संबंधाचें ग्रहण होत नाही असें सांगतात – 'सति हि इन्द्रियविषयत्वे ब्रह्मणः' = ब्रह्माला इंद्रियांचें विषयत्व असतांच 'इदं ब्रह्मणा संबद्धं कार्यम्' = हें जगत्कार्य ब्रह्माशी संबद्ध आहे 'इति गृह्येत' = असें ग्रहण केलें जाईल. परंतु तसें नाही असा शेष. इंद्रियें प्रपंचमात्राचें ग्रहण करितात. त्याच्या कारणाचें नाही. जर कारणाचेंही ग्रहण होईल तर अनुमानाच्या उपन्यासाचें काय कृत्य आहे? असा अर्थ. सामान्यतो दृष्ट अनुमानही अतीन्द्रिय ब्रह्मांत प्रमाण नाही असें सांगतात– 'कार्यमात्रमेव तु गृह्यमाणं' = ग्रहण केलें जाणारें कार्यमात्रच तर 'किं ब्रह्मणा संबद्धं किमन्येन केनचिद्वा संबद्धम्' = काय ब्रह्माशी संबद्ध आहे किंवा अन्य कोणाशी संबद्ध आहे? 'इति न शक्यं निश्चेतुम्' = असें श्रुतीवाचून निश्चित करणें शक्य नाही. उपसंहार करितात. 'तस्माज्जन्मादिसूत्रम्' = म्हणून जन्मादिसूत्र 'न अनुमानोपन्यासार्थं' = अनुमानाच्या उपन्यासा(=सांगण्या)करितां नाही. 'किं तर्हि' = मग काय करितां आहे? 'वेदान्तवाक्यप्रदर्शनार्थम्' = वेदान्तवाक्यांच्या प्रदर्शनाकरितां आहे.

अर्थाचा अनुभव जिचें प्रयोजन आहे. अशा युक्तीलाही वाक्याच्या उपकरणान्तर्भूतत्व असल्यामुळें सूत्र सुचवितें असें सांगितलें.[5] पण असें असतां युक्ति अब्रह्मविषयक असेल की ब्रह्मविषयक वाक्यांचें उपकरण कशी होते? सांगतो– ब्रह्मपरवाक्यांत मृदादिदृष्टान्तांनी युक्तींचा

---

[5] पं. पा. पृष्ठ ८१ पं. १

किं पुनस्तद्वेदान्तवाक्यं यत् सूत्रेणेह लिलक्षयिषितम्? । "भृगुर्वै वारुणिः वरुणं पितरमुपससार अधीहि भगवो ब्रह्मेति" [तै ३।१] इत्युपक्रम्याह– "यतो वा इमानि भूतानि जायन्ते येन जातानि जीवन्ति यत्प्रयन्त्य

॥ व्याख्यान ॥

उपन्यास केल्या जातो. त्यानंतर विधिप्रतिषेधवाक्यांच्या प्रवर्तकत्वनिवर्तकत्वाची आकांक्षित श्रुतिनिर्दिष्ट वादाप्रमाणें ब्रह्मस्वरूपवाक्यांच्या फळपर्यंततेला अपेक्षित संभावनेच्या अर्थवाद तेव्हां ग्राह्य होणाऱ्या तेथें श्रुतीच्या सहाय्यांत वर्तन करितात असें स्पष्ट होतें.

पण ब्रह्मपदाचा अप्रसिद्धत्व असल्यामुळें सर्वच वेदान्तवाक्यांत ते आपल्या स्वार्थाला विशेष्यत्वानें किंवा विशेषणत्वानें वाक्यार्थांत समर्पण करण्याकरितां समर्थ नाही? असा आक्षेप घेतो. किंवा सूत्राच्या विषयवाक्याला विचारतो– 'किं पुनस्तद्वेदान्तवाक्यम्' = पुनः तें वेदान्तवाक्य कोणतें? 'यत् सूत्रेण इह लिलक्षयिषितम्' = की जें या सूत्रानें ब्रह्माविषयी लक्षणानें विचार करण्यास इष्ट आहे. ज्या वेदान्तवाक्यांचा स्वाध्यायपाठांत ज्या सन्निवेशक्रमानें ब्रह्मप्रतिपादनांत समन्वय स्थित आहे (सूत्रद्वयाच्या त्याच क्रमापुळें) सूत्रद्वय त्याचें लक्षण करितां आहेत. म्हणून तसेंच उदाहरण सांगतात– 'भृगुर्वै वारुणिः वरुणं पितरमुपससार' = वरुणाचा पुत्र भृगु वरुण पित्याला शरण गेला व म्हणाला 'अधीहि भगवो ब्रह्मेति' = भगवन् मला ब्रह्माचा उपदेश करा. हें अथ शब्दानें ग्रहण केलेल्या न्यायानें (विशिष्ट अधिकाऱ्यानें ब्रह्मविचार करावा असें) प्रथम सूत्राचें उदाहरण आहे. 'इत्युपक्रम्य' = असा उपक्रम करून 'आह' = गुरुमुखानें श्रुति सांगते– "यतो वा इमानि भूतानि जायन्ते" ज्या कारणापासून निश्चयेंकरून हीं आकाशादि भूतें उत्पन्न होतात. 'येन जातानि जीवन्ति' = उत्पन्न झालेलीं ज्याच्या योगानें जीवन्त स्थित राहतात

भिसंविशन्ति। तद्विजिज्ञासस्व तद्ब्रह्मेति" तस्यच निर्णयवाक्यं "आनंदाध्येव खल्विमानि भूतानि जायन्ते, आनंदेन जातानि जीवन्ति आनंदं प्रयन्त्यभिसंविशन्तीति" [तै ३।६] अन्यान्यप्येवं जातीयकानि

॥ व्याख्यान ॥

'यत्प्रयन्त्यभिसंविशन्ति' नाशाला प्राप्त होणारी ज्यांत सर्व लीन होतात. 'तद्विजिज्ञासस्व' = त्याला जाणण्याची इच्छा कर = त्याचा विचार कर 'तद्ब्रह्मेति' = ते ब्रह्म आहे असे. हे जन्मादिसूत्राचे उदाहरणवाक्य आहे. कसे? पूर्वोक्त न्यायाने पृथिव्यादिकांना जन्मादि दिसत असल्यामुळे त्याच्या कारणांत एकत्व नानात्वामध्ये अन्यतराच्या ज्ञानाकरिता प्रमाणाचा अभाव आहे म्हणून बुद्धिमत् कारणतामात्र कळले असतां "यतो वा इमानि" अशा कारणाला एकवचन निर्देश असल्यामुळे त्या अर्थमात्रालाच सांगण्याची इच्छा आहे म्हणून सामर्थ्यावरून सर्वज्ञ सर्वशक्ति (एक) जगत्कारण असा कारण विशेष वाक्यावरून कळतो. पुनः "तद्विजिज्ञासस्व"? ते जाणण्याची इच्छा कर. असा अनुवाद करून 'तद्ब्रह्म' = ते ब्रह्म. अशा तऱ्हेने ब्रह्मशब्दाच्या प्रयोगावरून बृहति अर्थाच्या अन्वयाने सर्वाहून अनवच्छिन्न स्वभाव जगत्कारण ब्रह्म शब्दाचा अर्थ आहे असे कळते. 'तस्यच'[५] = त्याचे तर 'निर्णयवाक्यम्' = निर्णयवाक्य - 'खलु' = निश्चयेकरून 'हि' = प्रसिद्धपणाने अशा 'आनंदादेव' = आनंदापासूनच 'इमानि भूतानि जायन्ते' = हे भूतें उत्पन्न होतात. 'आनंदेन जातानि जीवन्ति' = उत्पन्न झालेली आनंदाने जीवन्त = सत्तावान् राहतात. 'आनंदं प्रयन्त्यभिसंविशन्ति' = नाश होणारी आनंदात प्रलीन होतात. 'इति' = असें आहे. अशा रीतीने प्रसिद्ध जाणविणाऱ्या 'हि' शब्दाने संयुक्त हें वाक्य आनंदाला जाणविण्यांत उपपन्न होते.

---

[५] पं. पा. पृ. ८१ पं. १५

वाक्यानि नित्य शुद्ध बुद्ध मुक्त स्वभाव सर्वज्ञ स्वरूप कारणविषयाण्युदाहर्तव्यानि ॥२॥

॥ व्याख्यान ॥

कारण अनानंदात्मक जगत्कारणांत ब्रह्मशब्दप्रयोग युक्त होत नाही. कारण उपक्रमणीय विषय अशा त्यांत ब्रह्मशब्दाच्या बृहति स्वार्थ प्रसंगाने समंजस होत नाही. म्हणून ब्रह्मपद वाक्यांत जन्मादि धर्मजाताला उपलक्षणत्व असल्यामुळे ब्रह्मसंस्पर्शी मात्राचा अभाव आहे म्हणून सर्वज्ञ सर्वशक्तिसमन्वित परमानंद ब्रह्म आहे असे जन्मादिसूत्राने ब्रह्मस्वरूप कळविले आहे असें सिद्ध झाले. तसेंच "यः सर्वज्ञः सर्ववित् यस्य ज्ञानमयं तपः। तस्मादेतद्ब्रह्म नामरूपमन्नं च जायते॥" [मु १।१।१०] इत्यादि शाखान्तरीय वाक्यें ही याच विषयाची आहेत असें सांगतात - 'अन्यान्यप्येवं जातीयकानि वाक्यानि' इतर ही अशा जातीची वाक्यें. अशा जातीयत्वालाच सांगतात - 'नित्यशुद्धबुद्ध मुक्त स्वभाव सर्वज्ञ स्वरूप कारणविषयाणि उदाहर्तव्यानि' नित्यशुद्ध बुद्ध मुक्त स्वभाव सर्वज्ञ स्वरूप कारण विषयक येथें उदाहरण म्हणून जाणावीत.

॥ असे व्याख्यानातील पंचमवर्णक व द्वितीय सूत्र समाप्त झाले ॥

।। इति ब्रह्माच्या लक्षण व उपलक्षणाचा प्रतिपादन-

-करणारे

पंचम वर्णक ।।

।। अथ वेदाच्या उपादानतेने ब्रह्माचे

सर्वज्ञत्व साधणारे

षष्ठ वर्णक ।।

॥ अथ वेदाच्या उपादानतेने ब्रह्माला सर्वज्ञत्व साधणारे षष्ठवर्णक ॥

३ शास्त्रयोनित्वाधिकरण

जगत्कारणत्वप्रदर्शनेन सर्वज्ञं ब्रह्मेत्युपक्षिप्तम् । तदेव द्रढयन्नाह—

शास्त्रयोनित्वात् ॥ ३ ॥

॥ व्याख्यान ॥

'जगत्कारणत्वप्रदर्शनेन' = जगताच्या कारणत्वाच्या प्रदर्शनाने 'सर्वज्ञं ब्रह्मेति' = सर्वज्ञ ब्रह्म आहे असे 'उपक्षिप्तम्' = मागील सूत्रांत सांगितले. 'तदेव द्रढयन्नाह' = त्याला दृढ करण्याकरितां सांगतात— 5 पं.पां पृ.८२ पं.१ 'शास्त्रयोनित्वात्' = प्रथमच कारण ब्रह्माच्या सर्वज्ञत्वाविषयीं हा 卐 दुसरा हेतु आहे असा अर्थ. अनेक नानाविध विषय ज्यांत आहेत अशा x विद्यास्थानांनीं ~~उपबृंहित- विस्तारित~~

卐 ब्रह्माचा शब्दोपादानत्व असल्यामुळे ध्वनींत ज्या विषयांना प्रकाशित करणाऱ्या शक्ति आहेत त्या प्रत्यक्षातीलच आहेत जशी दीपातील विषयाला प्रकाशित करण्याची शक्ति अतीतीच आहे; तसेंच द्रष्ट्याला जी ज्ञानशक्ति आहे ती करणता नाही. परंतु दीपप्रभा जशी संयुक्त वस्तूंना प्रकाशित करिते तशीच ज्ञानशक्तिही प्रसिद्ध आहे असे येथें (या सूत्रांत) पुनः दुसऱ्या प्रकाराने सर्वज्ञत्व साधिले जाते असे जाणावे.

卐 ब्रह्माच्या लक्षणद्वयाला सांगणाऱ्या ही पूर्वसूत्रांत सर्वज्ञत्व प्रधानादि कारणाहून वेगळेपणा त्यासिद्धीकरितां व जगदादि रचनेच्या उपपत्तीकरितां श्रुतियुक्तींच्या योजनाने प्राधान्याने दाखविले. त्यावाच प्राधान्यामुळे हेत्वन्तराने साधतात; अथवा सर्वजगत्कारणत्वाने सर्वज्ञत्व संभवत नाही कारण त्याला वेदांचे अकर्तृत्व आहे (कारण वेद हा नित्य आहे) अशी आशंका (आक्षेप) असता आक्षेपाच्या निरासरूप संबंध सांगतात— 'प्रपंचकारण ब्रह्माच्या'— हा दुसरा

x 'विद्यास्थाने'— पुराण न्याय मीमांसा व धर्मशास्त्रें हीं चार व शिक्षा कल्प व्याकरण निरुक्त छंद ज्योतिष हीं सहा वेदाङ्गें; अशी चौदा विद्यास्थाने वेदार्थ ज्ञानाचा हेतु आहेत.

महतः ऋग्वेदादेः शास्त्रस्यानेकविद्यास्थानोपबृंहितस्य प्रदीपवत्सर्वार्थावद्योतिनः सर्वज्ञकल्पस्य योनिः कारणं ब्रह्म। नहीदृशस्य शास्त्रस्यर्ग्वेदादिलक्षणस्य सर्वज्ञगुणान्वितस्य सर्वज्ञादन्यतः संभवोऽस्ति। यद्यद्विस्तरार्थं

॥ व्याख्यान ॥

उपबृंहित = विस्तारित वेदाख्यही शास्त्राचा प्रपंचान्तःपातित्व असल्यामुळे ब्रह्मापासूनच त्याचा जन्म आहे व वेदानें अविषयीकृताच्या सद्भावाविषयीं तर प्रमाण नाहीं. म्हणून सर्वविषयत्वामुळे वेदरूपी शास्त्र सर्वज्ञ आहे असें सांगतात – 'महतः' = ग्रंथानें व अर्थानें मोठ्या अशा. 'अनेकविद्यास्थानोपबृंहितस्य' = अनेकविद्यास्थानांनीं ज्याचें व्याख्यान केलें आहे अशा. याने व्यास मन्वादिकांनीं परिगृहीतत्वामुळे वेदाचें प्रामाण्य सूचित केलें आहे. बोधकत्वामुळेही प्रामाण्य सांगतात – 'प्रदीपवत्सर्वार्थावद्योतिनः' = प्रदीपाप्रमाणें सर्व अर्थाला प्रकाशित करणाऱ्या अशा। 'सर्वज्ञकल्पस्य' = सर्वज्ञकल्प (सदृश) अशा. भाष्यांत कल्प प्रत्ययाचा प्रयोग सर्वार्थप्रकाशनशक्तिमत्व असतांही अचेतनत्वानें बोधृत्वाभावामुळे सर्वज्ञापेक्षा किंचित् न्यूनतेच्या अपेक्षेनें आहे. 'ऋग्वेदादेः' = ऋग्वेदादिक अशा। 'शास्त्रस्य' = हितशासन अशा शास्त्राचें 'योनिः कारणम्' = योनि = कारण उपादान व कर्तृ 'ब्रह्म' = ब्रह्म आहे. उपादानात सर्वशक्ती वाचून कार्यास तिचा अयोग असल्यामुळे वेदोपादानाला सर्वज्ञता आहे. किंवा याच्याहून त्याचें कारण (कर्ता) अधिकतर म्हणून समर्थ केलें. सांप्रतही शास्त्रकारांना असा भाव दिसतो. म्हणून ब्रह्माला सर्वज्ञत्व आहे असें सांगतात. 'नहि' 'हि' = निश्चयें करून 'ईदृशस्य सर्वज्ञगुणान्वितस्य' = अशा प्रकारच्या

शास्त्रं यस्मात्पुरुषविशेषात्संभवति, यथा व्याकरणादि पाणिन्यादेर्ज्ञेयैकदेशार्थमपि स ततोऽप्यधिकतरविज्ञान इति प्रसिद्धं लोके. किमु वक्तव्यमनेकशाखाभेदभिन्नस्य देवतिर्यङ्मनुष्यवर्णाश्रमादिप्रविभागहेतोः ऋग्वेदाद्याख्यस्य सर्वज्ञानाकरस्याप्रयत्नेनैव लीलान्यायेन पुरुष-

---

॥ व्याख्यान ॥

पुरुषार्थपर्यन्त वाक्यें असोत. वेदांत तर विधिरहितांना पुरुषार्थपर्यन्तता नाही. म्हणून जरी सिध्द साध्य विषयत्वाने धर्म व ब्रह्म जिज्ञासेंत जिज्ञास्याचें वैलक्षण्य आहे. तथापि "सोऽन्वेष्टव्यः स विजिज्ञासितव्यः" [छां. ८।७।१] इत्यादि विधींत तो आला कोणता? अशी आकांक्षा असतां सर्वत्र ब्रह्मस्वरूपपर पदसमन्वय त्याच्या समर्पकत्वानें उपयुक्त आहे. स्वतंत्र ब्रह्माचें प्रतिपादन करण्याकरितां सामर्थ्य नाहीं म्हणून विधीयमान ज्ञानाच्या कर्मकारकत्वानेंच ब्रह्म शास्त्राकडून प्रतिपादन केलें जातें. असें अभ्युपगन्तव्यम्' इत्यन्त पूर्वपक्षभाष्याचा तात्पर्यार्थ.

विधिपरवाक्यापासून त्याच्या शेषाच्या लाभाविषयीं दृष्टान्त सांगतात— 'यथा'=जसें "अलौकिकान्यपि यूपाहवनीयादीनि"—अलौकिक असे यूप आहवनीयादिक 'विधिशेषतया शास्त्रेण समर्प्यन्ते'=विधीच्या शेषतेनें शास्त्राकडून समर्पण केले जातात=सांगितले जातात. 'तद्वत्'=त्याप्रमाणे ब्रह्म असा अर्थ. पण सांगितलेल्या वेद विधिलिङांनीं तात्पर्याचा विषय असा ब्रह्माला विधिशेषत्व कशावरून? अशी शंका घेतात 'कुतः एतत्'=हें कशावरून? वृद्धव्यवहारानें तर शास्त्राच्या तात्पर्याचा निश्चय होतो. वृद्धव्यवहारांत तर श्रोत्यांच्या प्रवृत्ति निवृत्तीला उद्देशित करून आज्ञा प्रयोग दिसतो. म्हणून शास्त्राचें त्याच प्रयोजन आहेत. त्या कार्यज्ञानजन्य आहेत. म्हणून शास्त्राला कार्यपरत्व आहे. त्यामुळे ब्रह्माला कार्यशेषत्व आहे असें सांगतात— 'प्रवृत्तिनिवृत्ति-

च्छास्त्रस्य। तथा हि शास्त्रतात्पर्यविद आहुः—"दृष्टो हि तस्यार्थः कर्मावबोधनमिति" [पू.मी.भा.१।१।१] "चोदनेति क्रियायाः प्रवर्तकं वचनम्" [पू.मी.भा.१।१।२] "तस्य ज्ञानमुपदेशः" [जै.सू.१।१।५] "तद्भूतानां क्रियार्थेन समाम्नायः" [जै.सू.१।१।२५] "आम्नायस्य क्रियार्थत्वा

प्रयोजनत्वाच्छास्त्रस्य'=कारण शास्त्राचा प्रवृत्ति निवृत्ति प्रयोजनत्व आहे. शास्त्राच्या नियोग=कार्यपरत्वाविषयीं वृद्धांची संमति सांगतात 'तथाहि शास्त्रतात्पर्यविद आहुः'=तसेंच शास्त्र तात्पर्यवेत्ते बोलतात— वेदार्थ कोणता? अशी आकांक्षा असतां शबर भाष्यकारांनी सांगितलें आहे— 'दृष्टो हि तस्यार्थः कर्मावबोधनमिति'=वेदाचा दृष्ट अर्थ तर कार्याला जाणविणे आहे. असें. कार्य वेदार्थ आहे याविषयीं चोदनासूत्रावरील भाष्य सांगतात— "चोदनेति क्रियायाः प्रवर्तकं वचनम्"= चोदना म्हणजे क्रियेचें प्रवर्तक वचन, क्रियेचें=नियोगाचें ज्ञानद्वारा प्रवर्तक-वाक्य चोदना म्हटलें जातें असा अर्थ. शबरस्वामींची संमति सांगून जैमिनींची संमति सांगतात "तस्य ज्ञानमुपदेशः"=तस्य=धर्माचें, ज्ञानं=ज्ञापक 'उपदेशः'=अपौरुषेय विधिवाक्य आहे. कारण त्याचा धर्माशीं अव्यतिरेक=(अभेद) आहे. पदांची क्रियेशीं अन्वित अर्थात शक्ति आहे याविषयीं सूत्राला पठन करितात 'तद्भूतानां क्रियार्थेन समाम्नायः'=तत्=तत्र=वेदांत 'भूतानां'=सिद्धार्थबोधक पदांचें "क्रियार्थेन"=क्रियावाची लिङादि पदाशीं" 'समाम्नायः'=सह उच्चारण करावें. (अर्थस्य तन्निमित्तत्वात्) कारण पदार्थ ज्ञानाला वाक्यार्थरूप कार्य ज्ञानाचें निमित्तत्व आहे. असा अर्थ. अन्यान्वित अर्थांत शक्त असलेलीं पदें कार्यवाची पदांशीं सह पदार्थ स्मृति द्वारा कार्यच वाक्यार्थाला

दानर्थक्यमतदर्थानाम्" [पू॰मी॰ १।२।१] इति च । अतः पुरुषं क्वचिद्विषयविशेषे प्रवर्तयत् कुतश्चिद्विषयविशेषान्निवर्तयच्चार्थवच्छास्त्रम् । तच्छेषतया चान्यदुपयुक्तम् । तत्सामान्याद्वेदान्तानामपि तथैवार्थवत्त्वं स्यात् । सति च विधिपरत्वे यथा स्वर्गादिकामस्याग्निहोत्रादि साधनं विधीयत एवममृतत्वकामस्य ब्रह्मज्ञानं विधीयत इति युक्तम् ।

॥ व्याख्यान ॥

बोधित करितात. असा भाव. "आम्नायस्य क्रियार्थत्वादानर्थक्यमतदर्थानाम्" = वेदाला क्रियार्थत्व असल्यामुळे त्या अर्थाला न सांगणाऱ्या वाक्यांना आनर्थक्य आहे. 'इति च' = असेही फलितार्थ सांगतात— 'अतः' = म्हणून ज्या अर्थी वृद्ध असें सांगतात त्या अर्थी विधिनिषेधवाक्यपरच शास्त्र आहे असें सांगतात— 'पुरुषं क्वचिद्विषयविशेषे प्रवर्तयत्' पुरुषाला कार्यरूपी धर्म या विषयविशेषांत प्रवृत्त करीत 'कुतश्चिद्विषयविशेषान्निवर्तयच्च' व अधर्म या विषयविशेषापासून निवृत्त करीत 'अर्थवत् शास्त्रम्' = प्रयोजनवान् शास्त्र आहे. 'अन्यच्च' = दुसरे अर्थवादादिक तर 'तच्छेषतया उपयुक्तम्' त्याच्या = कार्याच्या शेषत्वाने उपयुक्त आहेत. 'तत्सामान्यात्' = त्याच्याशी = कर्मशास्त्राशी समान जे शास्त्रत्व. त्यामुळे 'वेदान्तानामपि' = वेदान्तांनाही 'तथैव' = कर्मशास्त्राप्रमाणे कार्यपरत्वानेच 'अर्थवत्त्वं स्यात्' = अर्थवत्त्व आहे. पण वेदान्तांत नियोज्य व विधेय दिसत नसल्यामुळे तेथें काय बुद्धि करावी? त्यावर सांगतो— 'सति च विधिपरत्वे' = कार्यपरत्व असतां तर 'यथा स्वर्गादिकामस्य' = जसे स्वर्गादिकाम्याला 'अग्निहोत्रादि साधनं विधीयते' = अग्निहोत्रादि साधनाचें विधान

नन्विह जिज्ञास्यवैलक्षण्यमुक्तम् कर्मकाण्डे भव्यो धर्मो जिज्ञास्यः इह तु भूतं नित्यनिर्वृत्तं ब्रह्म जिज्ञास्यमिति । तत्र धर्मज्ञानफलादनुष्ठानापेक्षाद्विलक्षणं ब्रह्मज्ञानफलं भवितुमर्हति । नार्ह-

---

केलें जातें 'एवममृतत्वकामस्य' = याप्रमाणे अमृतत्वकाम्याला 'ब्रह्मज्ञानं विधीयते' ब्रह्माच्या उपासनेचें विधान केलें जातें 'इति युक्तम्' = हें युक्त आहे. पण धर्म व ब्रह्मजिज्ञासासूत्रकारांनीं येथें (कर्म व ज्ञान) कांडद्वयांत भेद सांगितला. कारण एककार्यार्थत्व असतां शास्त्रभेदाची अनुपपत्ति येते. तसेंच कांडद्वयांत जिज्ञास्याचा भेद असतां फलाचें वैलक्षण्य सांगितलें पाहिजे. व तसें असतां नित्यमुक्तिफलाकरितां ज्ञानाला विधेयता नाहीं. कारण मुक्तीला विधेयक्रियाजन्यत्व असतां तिला कार्य (अनित्य) फलाहून अविशेष प्रसंग येतो. व अविशेष असतां जिज्ञास्यभेदाची असिद्धि होते. म्हणून नित्यसिद्ध मुक्तीला कर्मफलाहून विलक्षणत्व असल्यामुळे तिला अभिव्यक्त करणाऱ्या ज्ञानाचा विधि अयुक्त आहे! अशी शंका घेतात— 'नन्विह जिज्ञास्यवैलक्षण्यमुक्तम्' = पण येथें (पूर्वोत्तर तंत्रांत) जिज्ञास्याचें वैलक्षण्य सांगितलें. 'कर्मकाण्डे भव्यो धर्मो जिज्ञास्यः' = कर्मकाण्डांत पुढें सिद्ध होणारा धर्म = साध्य धर्म जिज्ञास्य असून 'इह तु' = येथें ज्ञानकांडांत तर 'भूतं नित्यनिर्वृत्तं ब्रह्म जिज्ञास्यम्' = असलेलें नित्यसिद्ध ब्रह्म जिज्ञास्य आहे. 'इति' = असें. 'तत्र' = असें असतां 'अनुष्ठानापेक्षाद्धर्मज्ञानफलात्' = अनुष्ठानाची अपेक्षा असलेल्या धर्मज्ञानाच्या फलाहून 'विलक्षणं ब्रह्मज्ञानफलं भवितुमर्हति' = विलक्षण ब्रह्मज्ञानाचें फल असणें योग्य-

त्येवं भवितुम् । कार्यविधिप्रयुक्तस्यैव ब्रह्मणः प्रतिपाद्यमानत्वात् । “आत्मा वाऽरे द्रष्टव्यः” [बृ. २।४।५] “य आत्माऽपहतपाप्मा --- सोऽन्वेष्टव्यः स विजिज्ञासितव्यः” [छां. ८।७।१] “आत्मेत्येवोपासीत” [बृ. १।४।७] “आत्मानमेव लोकमुपासीत” [बृ. १।४।१५] “ब्रह्म वेद ब्रह्मैव भवति” [मुं. ३।२।९] इत्यादिविधानेषु सत्सु कोसावात्मा? किं तद्ब्रह्म? इत्याकां-

---

॥ व्याख्यान ॥

आहे. यावर - मुक्तीला कर्मफलाहून वैलक्षण्य (= नित्यसिद्धत्व) असिद्ध आहे. म्हणून तिच्याकरिता ज्ञान (= उपासना) विधेय आहे. मग सफल कार्यच वेदान्तांतही जिज्ञास्य आहे म्हणून त्याच्याभेदाची सिद्धि होत नाही असेही म्हणतां येणार नाही कारण ती इष्ट आहे. ब्रह्माला जिज्ञास्यत्व सांगणाऱ्या सूत्राचा विरोधही नाही. कारण ज्ञानविधिशेषत्वानें सूत्रकाराने ब्रह्माला प्रतिपादन केलेले आहे. असा पक्ष उपस्थित केला - 'नार्हत्येवं भवितुम्' = अशारीरतीनें विलक्षण फल असणे युक्त नाही. जिज्ञासासूत्राचा विरोधही नाही. “कार्यविधिप्रयुक्तस्यैव ब्रह्मणः प्रतिपाद्यमानत्वात्” = कारण कार्यविधीनें प्रयुक्त असलेल्याच ब्रह्माचे प्रतिपादन केलेले आहे. ब्रह्माच्या विधिप्रयुक्तत्वाला स्पष्ट करितो - “आत्मा वाऽरे द्रष्टव्यः” = हे मैत्रेयी निश्चयें करून आत्मादर्शन (= उपासना) करण्यास योग्य आहे. “य आत्माऽपहतपाप्मा” = जो आत्मा पापरहित आहे. 'सोऽन्वेष्टव्यः स विजिज्ञासितव्यः' = तो शोध करण्यास, तो जाणण्यास उपासना करण्यास योग्य आहे. 'आत्मेत्येवोपासीत' = आत्मा असेच उपासना करावी. “आत्मानमेव लोकमुपासीत” = आत्म्याच्या लोकाची = ज्ञानस्वरूपाची उपासना करावी.

क्षायां तत्स्वरूपसमर्पणेन सर्वे वेदान्ता उपयुक्ताः - नित्यः सर्वज्ञः सर्वगतो नित्यतृप्तो नित्यशुद्धबुद्धमुक्तस्वभावो विज्ञानमानन्दं ब्रह्म इत्येवमादयः । तदुपासनाच्च शास्त्रदृष्टोऽदृष्टो मोक्षः फलं भविष्यति । कर्तव्यविध्यननुप्रवेशे हि वस्तुमात्रकथने

॥ व्याख्यान ॥

'ब्रह्म वेद ब्रह्मैव भवति' = ब्रह्माला जाणणारा = उपासना करणारा ब्रह्मच होतो. 'ब्रह्म वेद' येथें ब्रह्मभावाची इच्छा करणारा ब्रह्माचे ज्ञान = उपासना करो असा विधि परिणामाला प्राप्त होतो असे जाणावे. 'इत्यादिविधानेषु सत्सु' = इत्यादि विधाने असतां 'कोसावात्मा किं तद्ब्रह्म' = हा आत्मा कोणता? ते ब्रह्म कोणते? 'इति आकांक्षायाम्' = अशी आकांक्षा असतां 'तत्स्वरूपसमर्पणेन सर्वे वेदान्ता उपयुक्ताः' = त्याच्या = ब्रह्मात्मैक्यस्वरूपाच्या समर्पणानें सर्व वेदान्त उपयुक्त आहेत. वेदान्तांतच अर्थ स्पष्ट करून दाखवितो - 'नित्यः सर्वज्ञः सर्वगतो नित्यशुद्धबुद्धमुक्तस्वभावो विज्ञानमानंदं ब्रह्म इत्येवमादयः' = नित्य सर्वज्ञ सर्वगत नित्यतृप्त नित्य शुद्ध बुद्ध मुक्त स्वभाव विज्ञान आनन्द ब्रह्म असे इत्यादि सर्व वेदान्त - ब्रह्मात्मस्वरूपाच्या समर्पणाने उपयुक्त आहेत असा अन्वय. पण विधीचे फल कोणते ते सांगतो - 'तदुपासनाच्च शास्त्रदृष्टोऽदृष्टो मोक्षः फलं भविष्यति' = त्याच्या = प्रत्यक् ब्रह्माच्या उपासनेपासून “ब्रह्मविदाप्नोति परम्” [तै. २।१] असा शास्त्रोक्त मोक्ष स्वर्गाप्रमाणे लोकांत अप्रसिद्ध असलेला फल होईल. ब्रह्माला कर्तव्योपासनाविषयक विधिशेषत्वाच्या अनंगीकार असतां बाधक सांगतो - 'कर्तव्य

हानोपादानासंभवात् सप्तद्वीपा वसुमती राजाऽसौ गच्छति' इत्यादि वाक्यवत् वेदान्तानामानर्थक्यमेव स्यात् । ननु वस्तुमात्रकथनेऽपि रज्जुरियं नायं सर्प इत्यादौ भ्रान्तिजनितभीतिनिवर्तनेनार्थवत्वं दृष्टम् । तथेहाप्यसंसार्यात्मवस्तुकथनेन संसारित्वभ्रान्तिनिवर्तनेनार्थवत्वं स्यात् । स्यादेतदेवं यदि रज्जु-

---

॥ व्याख्यान ॥

विध्यननुप्रवेशे तु'= कर्तव्यविधींत ब्रह्माचा अनुप्रवेश नसतां तर 'वस्तुमात्रकथने'= वस्तुमात्राचे कथन असतां 'हानोपादानासंभवात्'= त्यागव ग्रहणाच्या असंभव असल्यामुळे 'सप्तद्वीपा वसुमती'= सप्तद्वीप पृथिवी आहे. 'राजासौ गच्छति'= हा राजा गमन करितो. 'इत्यादि वाक्यवद्वेदान्तानामानर्थक्यमेव स्यात्'= इत्यादि वाक्याप्रमाणे वेदान्तांना आनर्थक्यच येईल. विधीशी असंबध्द सिध्दवस्तूचा बोध असतां प्रवृत्त्यादि फलाच्या अभावामुळे वेदान्तांना आनर्थक्य येईल असा अर्थ. वैफ त्याविषयीं वेदान्ती शंका घेतात- 'ननु वस्तुमात्र कथनेऽपि'= पण वस्तुमात्राचे कथन असतांही 'रज्जुरियं नायंसर्पइत्यादौ'= ही रज्जु आहे सर्प नाही इत्यादिकांत जसे 'भ्रान्तिजनितभीतिनिवर्तनेनार्थवत्वं दृष्टम्'= भ्रान्तीपासून उत्पन्न झालेल्या भीतीच्या निवर्तनाने अर्थवत्व दृष्ट आहे. 'तथा इहापि'= तसे येथें वेदान्तांतही 'असंसारि आत्मवस्तुकथनेन'= असंसारि ब्रह्मात्मवस्तूच्या कथनाने संसारित्वभ्रान्तिनिवर्तनेनार्थवत्वंस्यात्'= जीवाला संसारित्व भ्रान्तीच्या निवर्तनाने अर्थवत्व येईल. दृष्टान्ताच्या वैषम्याने परिहार करितो- 'स्यादेतदेवम्'

स्वरूपश्रवण इव सर्पभ्रान्तिः, संसारित्वभ्रान्तिर्ब्रह्मस्वरूपश्रवणमात्रेण निवर्तेत, न तु निवर्तते । श्रुतब्रह्मणोऽपि यथापूर्वं सुखदुःखादि संसारित्वधर्मदर्शनात् । "श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः" [बृ. २।४।५] इति च श्रवणोत्तरकालयोर्मनननिदिध्यासनयोर्विधिदर्शनात् । तस्मात्प्रतिपत्तिविधिविषयतयैव शास्त्रप्रमाणकं ब्रह्म अभ्युपगन्तव्यमिति ।

॥ व्याख्यान ॥

हे अर्थवत्व असे येईल. 'यदि'= जर 'रज्जुस्वरूपश्रवण इव सर्पभ्रान्तिः'= रज्जुस्वरूपाचे श्रवण असतां जशी सर्पभ्रान्ति निवृत होते. तशी 'ब्रह्मस्वरूपश्रवणमात्रेण संसारित्वभ्रान्तिर्निवर्तेत'= ब्रह्मस्वरूपाच्या श्रवणमात्राने जीवाची संसारित्वभ्रान्ति निवृत होईल. 'न तु निवर्तते'= परंतु निवृत होत नाही. 'श्रुतब्रह्मणोऽपि यथापूर्वं सुखदुःखादि संसारित्वधर्मदर्शनात्'= कारण ब्रह्माचे श्रवण केल्यानंतरही पूर्वीप्रमाणेच सुखदुःखादि संसारित्व धर्म दिसतो. म्हणून वेदान्तांना विधिसंस्पर्शावाचून अर्थवत्व नाही असा अर्थ. पुनः जर ज्ञानापासूनच मुक्ति होईल तर श्रवणापासून उत्पन्न झालेल्या ज्ञानानंतर मननादिकांचा विधि असणार नाही. त्याअर्थी विधि आहे म्हणून कार्य साध्य मुक्ति आहे. असे सांगतो- 'श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः इति च'= श्रवण करावे, मनन करावे, निदिध्यासन करावे असा तर 'श्रवणोत्तरकालयोर्मनननिदिध्यासनयोः'= श्रवणाच्या उत्तरकाली असलेल्या, मनन व निदिध्यासनांचा 'विधिदर्शनात्'= विधि दिसतो. म्हणून कार्य साध्यच फळ आहे. असा

॥ व्याख्यान ॥

अर्थ· शब्दांची कार्ययुक्त अर्थांत शक्ति असल्यामुळे प्रवृत्त्यादि फलवत्वाला शास्त्रत्व असल्यामुळे सिद्धार्थांत फलाचा अभाव असल्यामुळे व मननादिकांच्या विधि असल्यामुळे, कार्यपर वेदान्त आहेत असा पूर्वपक्षाचा उपसंहार करितो– 'तस्मात् प्रतिपत्तिविधिविषयतयैव' – म्हणून उपासनाविधिविषयत्वानेच 'शास्त्रप्रमाणकं ब्रह्म अभ्युपगंतव्यमिति' – शास्त्रापासून ब्रह्म कळते असे मानले पाहिजे· 'इति' शब्द पूर्वपक्षाच्या समाप्ती करिता आहे. भाष्यातील या पूर्वपक्ष व उपसंहारातील प्रतिपत्ति शब्द, जो सर्वच मनाच्या व्यापार प्रमाणात्मक किंवा इतर कोणाकडून कोणत्या रीतीने विधिसंस्पर्शित्वाने विधेय कल्पित आहे त्या सर्वांच्या संग्रहाकरिता आहे असे जाणावे.

यावर आम्ही सांगतो – ज्याचे विधान केले जाते ते हे ब्रह्मकर्मक ज्ञान कोणते? शब्दजन्य तर नाही. कारण स्वाध्याय पाठापासूनच त्याची सिद्धि होते. आता शब्दजन्यच ज्ञानाच्या अभ्यासाचे विधान केले जाते? तर त्याचे आम्ही प्रयोजन पहात नाही· पण कारण दृष्ट विषयाच्या ज्ञानसंतानाला सुखसंतानाचे हेतुत्व दिसते! जर असे आहे तर त्याच्या प्रमाणेच येथेंही विधीचा आनर्थक्य आहे. आतां पुनः साक्षात्करणाकरिता ज्ञानसंतानाचा विधि सांगितला जातो तर हे युक्त नाही कारण दृष्टाधिकार विधि असंभावित दृष्टफल होत नाही. लैङ्गिक (अनुमेय) अर्थ तर लिङ्ग (अनुमाना) पासूनच उत्पन्न झालेल्या सहस्रशः ही अभ्यस्यमान ज्ञानाने साक्षात केल्या जात नाही पण अभ्यस्यमान शब्दज्ञानापा-

॥ व्याख्यान ॥

सूनच साक्षात्भाव होतो. त्याच्यापासून उत्पन्न झालेल्या दुसऱ्या ज्ञानापासून होईल? अशा भावाविषयीं तर प्रमाण नाही. मग शब्दापासून प्रतिपन्नाच्या प्रतिपत्तीच्या अनुसार ध्याननामक मनोव्यापाराचे विधान असो! मग त्याचे विधान कशाकरिता? ध्येयाच्या साक्षात्काराकरिता तर त्याचा संभव नाही. कारण परोक्ष ध्यायमान हो साक्षात् भावाला प्राप्त होत असल्याचे दिसत नाही. पण कामादिकांच्या उद्रेक असतां ध्यायमान परोक्ष ही साक्षात्भावाला प्राप्त झाल्याचे दिसते? असे नाही. ते ध्यायमान नव्हे. परंतु अविद्यात्मक आहे. अन्यथा बाध होणार नाही.

पण "द्रष्टव्यः" असा दर्शनाचा अनुवाद करून 'निदिध्यासितव्यः" असे दर्शनफलाकरिता ध्यानाचे विधान केले आहे. मग दृष्टाधिकार विधि असंभावित दृष्टफल होत नाही असे हे पूर्वी सांगितले. ध्यान तर ध्येयाच्या साक्षात्भावाला हेतु कोठें दिसत नाही. असें असतांही ध्यानापासून ध्येयाच्या साक्षात्भाव होवो! ध्येयाच्या याथार्थ्याविषयीं काय प्रमाण आहे? शब्द तर साक्षात्करणाच्या उपाय अशा उपासनाविधीत पर्यवसित त्याच्या ~~साक्षा~~ सद्भावाविषयी प्रमाण नाही· खरें आहे तथापि पुढील देवताविग्रहवत्वन्यायाने तत्व सिद्ध होते? हा विषम उपन्यास आहे. तेथे (देवताविग्रहवत्वन्यायांत) तर तथात्वाविषयीं साधक किंवा बाधक नाही. म्हणून प्रतीतिशरणांकडून तथात्व मानले जाते. तसे येथें नाही कारण सर्वांच्या आत्मत्वाविषयीं प्रत्यक्षादिकांचा विरोध आहे. आरोपित रूपानेंही ध्यानाची उपपत्ति होते. पूर्वोक्त असे ज्ञान (स्मृतिसंतान) विधिपक्षांत याच दिशेने वस्तुतथाभावसिद्धीचे नि-

अत्राभिधीयते । न । कर्म ब्रह्मविद्याफलयोर्वैलक्षण्यात् ।

~~प्रकरण करावे~~

॥ व्याख्यान ॥

प्रकरण करावे. जे पुनः कोणाकडून सांगितले जाते कीं — शब्दज्ञानाहून दुसऱ्या अलौकिक ज्ञानान्तराचे वेदान्तांत कर्तव्यत्वाने विधान केले जाते. त्यावर आम्ही विचारतो कीं — त्याचे पुनः काय साधन? व कोणते कर्म आहे? हें सांगितले पाहिजे. ज्याचे कर्म ज्ञात नाहीं अशा ज्ञानाचे विधान करणे तर शक्य नाहीं. कर्म ज्ञात असतां तर विधानाला आनर्थक्य आहे. साधनही विहित नाहीं. त्याच्यावाचून साकांक्ष वचन अनर्थक होते "तमेतं वेदानुवचनेन ब्राह्मणा विविदिषन्ति" [बृ. ४।४।२२] इत्यादि वचनाने वेदानुवचनादि साधन विहितच आहे? असें असेल तर मग प्रमाणान्तराचे प्रमाण शब्द आहे. आत्मतत्त्वज्ञानाचे नाहीं हें तर उपपन्न होत नाहीं. कारण कार्यगम्यच प्रामाण्य आहे. विधिगम्य नाहीं. तसें म्हटले आहे कीं — "गुणाद्वाप्यभिधानं स्यात्संबंधस्य ~~संबंधस्या संबंधस्य~~ शास्त्रहेतुत्वात्" [पू.मी ३।२।७] असे, म्हणून अशा रीतीने विधीत समन्वय असतां ब्रह्माला शास्त्रप्रमाणत्व आहे हें (म्हणणे) अयुक्त आहे.

पण तरी "अथ यदतः परो दिवो ज्योतिः" [छां. ३।१३।७] अशा रीतीने प्रपंचातिरिक्त ब्रह्माचा अंगीकार असतां देवताविग्रहवत्त्वन्यायाचा संभव असल्यामुळे मोक्षकाम्याला ब्रह्माच्या उपासनेचे विधान केले जाते. तसेच "विद्यया तदारोहन्ति" [ ] अशी श्रुति आहे. साध्यत्व असतांही अंतवत्त्वही नाहीं. कारण "न च पुनरावर्तते" [छां. ८।१५।१] अशारीतीने अना-

शारीरं वाचिकं मानसं च कर्म श्रुतिस्मृतिसिद्धं धर्माख्यं, यद्विषया जिज्ञासा "अथातो धर्मजिज्ञासा" [जै.सू. १।१।१] इति सूत्रिता । अधर्मोऽपि हिंसादिः प्रतिषेधचोदनालक्षणत्वात् जिज्ञास्यः परिहाराय ।

॥ व्याख्यान ॥

इतका शब्दगम्यत्व आहे. हा मोक्ष तर्कगम्य तर नाहीं कीं ज्याने याचे तत्त्व तर्काने व्यवस्थापित केले जाईल. शब्दगम्याचा तर तत्त्वाची व्यवस्था शब्दानुसारानेच होते. असे मतन्यास भाष्यकार उत्तर सांगतात — 'अत्राभिधीयते' = यावर सांगितले जाते — 'न' = नाहीं. 'कर्मब्रह्मविद्याफलयोर्वैलक्षण्यात्' = कारण कर्माच्या व ब्रह्मविद्येच्या फलांत वैलक्षण्य आहे. 'मोक्ष विधिजन्य नाहीं त्याला कर्मफलविलक्षणत्व असल्यामुळे आत्म्याप्रमाणे' असा अर्थ. हें वस्तुसंग्रह वाक्य आहे. याचाच विस्तार "अतो न कर्तव्यशेषत्वेन ब्रह्मोपदेशो युक्तः" येथपर्यंतचे भाष्य आहे. सांगितलेल्या हेतूच्या ज्ञानाकरिता कर्म व त्याच्या फलाचा विस्तार करितात — 'शारीरं' इत्यादि 'वर्णितं संसाररूपमनुवदति' इत्यन्त ग्रंथाने. 'शारीरं' = शरीराने केले जाणारे 'वाचिकं मानसं च कर्म' = वाणीने व मनाने केले जाणारे कर्म 'श्रुतिस्मृतिसिद्धम्' = श्रुतिस्मृतीवरून सिद्ध 'धर्माख्यं' = धर्म नामक आहे. 'यद्विषया जिज्ञासा' = कीं ज्याच्या विषयीं विचार "अथातो धर्मजिज्ञासा इति सूत्रिता" = "अथातो धर्मजिज्ञासा" = अशी सूत्रित आहे. 'अथ' = वेदाध्ययनानंतर 'अतः' = वेदाला फलवत् अर्थावबोधकत्व असल्यामुळे (वेदाचा एकदेश असा) धर्मनिर्णयाकरितां 'धर्म जिज्ञासा' = धर्मवाक्यविचार कर्तव्य आहे. असा सूत्रार्थ. केवळ धर्माख्य कर्म-

तयोश्चोदनालक्षणयोरर्थानर्थयोर्धर्माधर्मयोः फले प्रत्यक्षे
सुखदुःखे शरीरवाङ्मनोभिरेवोपभुज्यमाने विषयेन्द्रिय-
संयोगजन्ये ब्रह्मादिषु स्थावरान्तेषु प्रसिद्धे । मनुष्यत्वादा-
रभ्य ब्रह्मान्तेषु देहवत्सु सुखतारतम्य मनुश्रूयते । ततश्च त-

॥ व्याख्यान ॥

नाही परंतु अधर्मरूपही आहे असें सांगतात– 'अधर्मोऽपि हिंसादिः' हिंसादि अधर्मही 'प्रतिषेधचोदनालक्षणत्वात्' = निषेधवाक्य प्रमाणत्वामुळे 'जिहास्यः परिहारार्थ' = त्यागा करितां विचार्य आहे. कर्माला सांगून फलाला सांगतात– 'तयोश्चोदनालक्षणयोरर्थानर्थयोर्धर्माधर्मयोः फले' = त्या अर्थानर्थ चोदनाप्रमाणक अशा धर्माधर्माचीं फळे 'प्रत्यक्षे' = प्रत्यक्ष अशा 'सुखदुःखे' = सुखदुःखें. 'शरीरवाङ्मनोभिरेवोपभुज्यमाने' = शरीर वाणी, व मनाच्या योगानेंच भोगिलीं जाणारीं 'विषयेन्द्रियसंयोगजन्ये' = विषय व इंद्रिय यांच्या संयोगापासून उत्पन्न होणारीं 'ब्रह्मादिस्थावरान्तेषु' स्थावरान्त ब्रह्मदेवादिकांस 'प्रसिद्धे' = प्रसिद्ध आहेत. मोक्ष तर अतीन्द्रिय शोकरहित शरीरादिकांनीं अभोग्य विषयादिकापासून उत्पन्न न होणारा, अनात्मवेत्त्यांस अप्रसिद्ध, अशा वैलक्षण्याच्या ज्ञानाकरितां प्रत्यक्षादिक पांच विशेषणे आहेत. सामान्याने कर्मफलाला सांगून धर्मफलाच्या पृथक् विस्तार करितात– 'मनुष्यत्वादारभ्य' = मनुष्यत्वापासून आरंभ करून 'ब्रह्मान्तेषु देहवत्सु' = ब्रह्मदेवापर्यंत देहवानांचे 'सुखतारतम्यम्' = सुखाचा तरतमभाव. 'अनुश्रूयते' = (अनुभवाला) अनुसरून श्रुत होतो "स एको मानुष आनंदः" [तै. आ.

द्धेतो धर्मस्य तारतम्यं गम्यते, धर्मतारतम्यादधिकारी तारतम्यम् ।
प्रसिद्धं चार्थित्वसामर्थ्यादिकृतमधिकारी तारतम्यम् । तथा च यागाद्य-
नुष्ठायिनामेव विद्यासमाधिविशेषादुत्तरेण पथा गमनम् । केवलैरि-
ष्टापूर्तदत्तसाधनैर्धूमादिक्रमेण दक्षिणेन पथा गमनम् । तत्रापि

॥ व्याख्यान ॥

शतम्] तो एक मनुष्याचा आनंद त्याच्याहून शतगुण गंधर्वादिकांचा यास्तव श्रुतीला अनुभवानुसारित्व आहे. असा 'अनु' शब्दाचा अर्थ. 'ततश्च' = त्यामुळे– सुखतारतम्यामुळे 'तद्धेतोर्धर्मस्य तारतम्यं गम्यते' = त्याला हेतु अशा धर्माचें तारतम्य कळतें. मोक्ष तर निरतिशय आहे व त्याचे साधनही तत्वज्ञान एकरूप आहे. असें येथे वैलक्षण्य आहे असा अर्थ. पुनः साधनचतुष्टय संपन्न एकरूप मोक्षाचे साधन अशा विद्येचा अधिकारी आहे. कर्मात तर नाना प्रकारचा अधिकारी आहे अशा वैलक्षण्याला सांगतात– 'धर्मतारतम्यादधिकारि तारतम्यम्' = धर्माच्या तारतम्यामुळे अधिकार्याचे तारतम्य कळते. केवळ कळतेच असे नाही परंतु प्रसिद्ध ही आहे असें सांगतात– 'प्रसिद्धं च' = 'अर्थित्व सामर्थ्यादिकृतम्' = अर्थित्व सामर्थ्यादिकांनीं केलेले 'अधिकारी तारतम्यं प्रसिद्धम्' = अधिकाऱ्यांचे तारतम्य प्रसिद्धही आहे. अर्थित्व = फलकामित्व, सामर्थ्य = लौकिक पुत्रादिक अलौकिक = शास्त्राने अनिंदितत्व. आदि शब्दाने विद्वत्ता ग्रहण करावे. पुनः कर्मफल भोगाने प्राप्य असून मोक्ष तर नित्य प्राप्त आहे अशा भेदाला सांगतात– 'तथा च यागाद्यनुष्ठायिनामेव' = तसेंच यागादिकांचे अनुष्ठान करणाऱ्यांचेच 'विद्यासमाधि'

सुखतारतम्यं तत्साधनतारतम्यं च शास्त्रात् "यावत्संपातमुषित्वा" [छां. ५।१०।५] इत्यस्माद्गम्यते । तथा मनुष्यादिषु नारकस्थावरान्तेषु सुखलवश्चोदनालक्षणधर्मसाध्य एवेति गम्यते, तारतम्येन वर्तमानः । तथोर्ध्वगतेष्वधोगतेषु च देहवत्सु दुः-

॥ व्याख्यान ॥

'विशेषात्' = उपासनेसंहिताच्या स्थैर्याच्या प्रकर्षामुळेच 'उत्तरेण पथा गमनं' उत्तरमार्गाने = अर्चिरादि मार्गाने ब्रह्मलोकाप्रत गमन "तेऽर्चिषम्" [छां. ५।१०।१] इत्यादिकाने श्रुत होते असा अर्थ. "केवलैरिष्टापूर्तदत्तसाधनैः" केवळ इष्टापूर्त दत्त साधनांनीं 'धूमादिक्रमेण दक्षिणेन पथा गमनम्' = धूमादिक्रमाने दक्षिणमार्गाने गमन. "अथ य इमे ग्राम इष्टापूर्ते" [छां. ५।१०।३] इत्यादि श्रुतींनीं कळते. "तत्रापि" = चंद्रलोकांतही "सुखतारतम्यं तत्साधनतारतम्यं च" - सुखाचा तरतमभाव व त्यांच्या साधनांचा तरतमभाव "यावत्संपातमुषित्वा - इत्यस्माच्छास्त्राद्गम्यते" - 'संपतति अस्माल्लोकादमुं लोकमनेनेति संपातः कर्म' - मनुष्यलोकापासून स्वर्गलोकापर्यंत ज्याच्या योगाने गमन करितो तो संपात कर्म. जेथपर्यंत भोक्तव्य कर्म असते तेथपर्यंत स्थित राहून परत येतात - या शास्त्रावरून कळते. मनुष्यत्वापासून वर गेले त्यांत ते सांगून खाली गेले त्यांचे सांगतात - 'तथा मनुष्यादिषु नारकस्थावरान्तेषु' - तसें मनुष्यादि नारकस्थावरान्तांत 'सुखलवश्चोदनालक्षणधर्मसाध्य एवेति गम्यते तारतम्येन वर्तमानः' = सुखाचा अंश तरतमभावाने वर्तमान चोदनेवरून कळणाऱ्या धर्मानें साध्यच आहे. असे कळते. आतां दुःख त्याचा हेतु व

खतारतम्यदर्शनात्तद्धेतोरधर्मस्य प्रतिषेधचोदनालक्षणस्य तदनुष्ठायिनां च तारतम्यं गम्यते । एवमविद्यादिदोषवतां धर्माधर्मतारतम्यनिमित्तं शरीरोपादानपूर्वकं सुखदुःखतारतम्यमनित्यं संसाररूपं श्रुतिस्मृतिन्यायप्रसिद्धम् । तथा च श्रुतिः- "न ह वै सशरीरस्य सतः प्रि-

॥ व्याख्यान ॥

त्याचे अनुष्ठान करणाऱ्यांचे तारतम्य सांगणारे अधर्मफलाचा विस्तार करितात - 'तथा ऊर्ध्वगतेषु अधोगतेषु च देहवत्सु' = तसेंच वर गेलेल्या व खाली गेलेल्या देहवानांत 'दुःखतारतम्यदर्शनात्' = दुःखाचा तरतमभाव दिसत असल्यामुळे 'तद्धेतोः प्रतिषेधचोदनालक्षणस्य अधर्मस्य' = त्याचा हेतु निषेधवाक्यावरून कळणाऱ्या अधर्माचे 'तदनुष्ठायिनां च' = व त्याचे अनुष्ठान करणाऱ्यांचे 'तारतम्यं गम्यते' = तारतम्य कळते. दोन प्रकारच्या धर्मफळाचा - त्याच्याहून मोक्षफळाच्या वैलक्षण्याकरिता - केलेल्या विस्ताराचा उपसंहार करितात - 'एवमविद्यादिदोषवताम्' = असे अविद्यादिदोषवानांचे. अस्मिता, काम, क्रोध, भय आदि शब्दांचा अर्थ आहे. 'धर्माधर्मतारतम्यनिमित्तम्' = धर्म व अधर्म यांच्या तारतम्याच्या निमित्ताने 'शरीरोपादानपूर्वकं सुखदुःखतारतम्यम्' = शरीराच्या ग्रहणपूर्वक सुखदुःखांचे तारतम्य 'अनित्यं संसाररूपम्' = अनित्य असे संसाररूप 'श्रुतिस्मृतिन्यायप्रसिद्धम्' = श्रुतिस्मृतिन्यायांनी प्रसिद्ध आहे. येथें "ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति" [भ. गी. ९।२१] इत्यादि श्रुति जाणाव्यात. काष्ठाच्या उपचयापासून ज्वाळेच्या उपचय दिसत असल्यामुळे फलतारतम्याने साधनतारतम्याचे अनुमान न्याय जाणावा. श्रुतीला सांगतात 'तथा च-

था प्रिययोरपहतिरस्ति" [छां॰ ८।१२।१] इति यथावर्णितं संसाररूपमनुवदति। "अशरीरं वाव संतं न प्रियाप्रिये स्पृशतः" [छां॰ ८।१२।१] इति प्रियाप्रियस्पर्शप्रतिषेधाच्चोदनालक्षणधर्मकार्यत्वं मोक्षाख्यस्याशरीरस्य प्रतिषिध्यत इति गम्यते। धर्मकार्यत्वे हि

॥ व्याख्यान ॥

श्रुतिः = तशीच श्रुति आहे. 'न ह वै सशरीरस्य सतः प्रियाप्रिययोरपहतिरस्ति' निश्चयेंकरून सशरीर असणाऱ्यास सुखदुःखांचा नाश नसतो. 'इति यथावर्णितं संसाररूपमनुवदति' = अशा वर्णन केलेल्या प्रमाणे संसाररूपाच्या अनुवाद करिते. 'मोक्ष कर्मफळ नाही त्याला कर्मफळाहून विरुद्ध असे अतीन्द्रियत्व, विशोकत्व, शरीरादिकांनीं असंयोग्यत्वादि धर्मवत्व असल्यामुळे व्यतिरेकाने स्वर्गादिकाप्रमाणे' अशा न्यायाने अनुग्राह्य श्रुतीला सांगतात — "अशरीरं वाव संतं न प्रियाप्रिये स्पृशतः" = तत्वतः विदेह असलेल्या आत्म्याला निश्चयेंकरून वैषयिक सुखदुःखें स्पर्श करीत नाहीत. 'इति प्रियाप्रियस्पर्शप्रतिषेधात्' = अशरीरीने सुखदुःखांच्या स्पर्शाचा प्रतिषेध असल्यामुळे 'चोदनालक्षणधर्मकार्यत्वम्' = चोदनाप्रमाणक धर्मफलत्व 'मोक्षाख्यस्य अशरीरस्य प्रतिषिध्यत इति गम्यते' = मोक्षनामक अशरीरत्वाला प्रतिषेधिलें केले जाते असे कळते. श्रुतींत दुःखाच्या स्पर्शाच्या प्रतिषेध, सुखाच्या स्पर्श असतां दुःखाच्या स्पर्शाच्या अवश्यंभावित्वामुळे आहे. मोक्ष जर उपासनारूप धर्मफळ आहे तर तेंच प्रिय (= सुख) आहे. म्हणून येथें त्याच्या प्रतिषेधाचा अयोग आहे असे सांगतात — 'धर्मकार्यत्वे हि' = मोक्षाचा

प्रियाप्रियस्पर्शनप्रतिषेधो नोपपद्यते। अशरीरत्वमेव धर्मकार्यमिति चेन्न, तस्य स्वाभाविकत्वात्। "अशरीरं शरीरेष्वनवस्थेष्ववस्थितम्। महान्तं विभुमात्मानं मत्वा धीरो न शोचति॥" [कं॰ १।२।२१] "अप्राणो ह्यमनाः शुभ्रः" [मुं॰ २।१।२] "असङ्गो ह्ययं पुरुषः" [बृ॰ ४।३।१५] इत्यादि

॥ व्याख्यान ॥

धर्मकार्यत्व असतां तर "प्रियाप्रियस्पर्शनप्रतिषेधो नोपपद्यते" = सुखदुःखांच्या स्पर्शनाच्या प्रतिषेध उपपन्न होत नाही. पण प्रिय नामक वैषयिक सुख आहे. त्याला निषेध केला जातो. मोक्ष तर धर्मफळच आहे, कारण कर्मांना विचित्र फळदानसामर्थ्य आहे? अशी शंका घेतो — 'अशरीरत्वमेव धर्मकार्यमिति चेत्' = अशरीरच धर्मकार्य आहे? असें असेल तर. आत्म्याचे देहाशी असंगत्व अशरीरत्व आहे. त्याला अनादित्व असल्यामुळे कर्मसाध्यता नाही. असें सांगतात — 'न तस्य स्वाभाविकत्वात्' = नाही कारण त्याला स्वाभाविकत्व आहे. कारण 'अशरीरम्' = स्थूलदेहशून्य अशा 'शरीरेषु अनवस्थितेषु' = अनेक अनित्य शरीरें स्थित असतांना 'अवस्थितम्' = स्थित असलेल्या 'महान्तम्' = व्यापी. अपेक्षित महत्वाचे कारण सांगतात — 'विभुम्' = सर्वव्यापी. 'आत्मानं मत्वा' = आत्म्याला जाणून 'धीरो न शोचति' = धीर होत्साता शोकोपलक्षित संसाराला अनुभवीत नाही असा अर्थ. सूक्ष्मदेहाच्या अभावाविषयीं श्रुतीला सांगतात — 'अप्राणो ह्यमनाः शुभ्रः' = अप्राण व अमन. यांनी प्राण व मनाच्या क्रिया व ज्ञानशक्तींचा निषेध केला असल्यामुळे तदधीन असलेल्या कर्मज्ञानेन्द्रियांच्या निषेध होतो. म्हणून 'शुभ्रः' = शुद्ध असा अर्थ. देहद्वयाच्या

श्रुतिभ्यः। अतएवानुष्ठेय कर्मफल विलक्षणं मोक्षाख्यमशरीरत्वं नित्यमिति सिद्धम्। तत्र किंचित् परिणामिनित्यं यस्मिन्विक्रियमाणेऽपि तदेवेदमिति बुद्धिर्न विहन्यते। यथा पृथिव्यादि जगन्नित्यत्ववादिनाम्, यथा च साख्यानां

॥ व्याख्यान ॥

अभावविषयी श्रुती का सांगतात- 'असङ्गो ह्ययं पुरुषः' = हा आत्म पुरुष स्थूल-सूक्ष्मदेहापासून निश्चयेंकरून असंग आहे. 'इत्यादिश्रुतिभ्यः' = इत्यादि श्रुती आहेत. निर्देहात्मस्वरूप मोक्षाला अनादित्व व भावत्व सिद्ध असतां फलित सांगतात- 'अत एव' = म्हणूनच = आत्म्याला अनादित्व व भावत्व असल्यामुळेच. 'अनुष्ठेयकर्मफलविलक्षणम्' = अनुष्ठेय कर्मफलाहून विलक्षण. 'मोक्षाख्यमशरीरत्वम्' = मोक्ष नामक अशरीरत्व. 'नित्यमिति सिद्धम्' = नित्य आहे असें सिद्ध झाले. म्हणून ते धर्माचे साध्य नाही असा भाव. पण नित्यत्व असूनही मोक्षाला परिणामित्वेने धर्मकार्यत्व आहे? अशी आशंका असतां नित्याच्या दोन प्रकारच्या विभाग करितात- 'तत्र' = त्या वस्तुमध्यें 'किंचित्' = कांही वस्तु. 'परिणामि नित्यम्' = परिणामी असून जें नित्य असतें तें परिणामि नित्य. 'यस्मिन्विक्रियमाणेऽपि' = जिच्यांत विकार झाला असतांही 'तदेवेदमिति बुद्धिर्न विहन्यते' = तेंच हें आहे. अशी बुद्धि नाश होत नाही. 'यथा जगन्नित्यत्व वादिनां पृथिव्यादि' = जसें जगन्नित्यत्ववाद्यांच्या मतांत पृथिव्यादि द्रव्य. 'यथा च साख्यानां गुणाः' =

गुणाः। इदं तु पारमार्थिकं कूटस्थ नित्यं व्योमवत्सर्वव्यापि सर्वविक्रियारहितं नित्यतृप्तं निरवयवं स्वयंज्योतिस्वभावम्। यत्र धर्माधर्मौ सह कार्येण कालत्रयं नोपावर्तेते। तदेतदशरीरत्वं मोक्षाख्यं।

॥ व्याख्यान ॥

व जसें सांख्यांचे गुण. आत्मा तर कूटस्थ नित्य आहे, म्हणून कर्मसाध्य नाही असें सांगतात- 'इदं तु पारमार्थिकं नित्यं कूटस्थम्' = हें तर पारमार्थिक कूटस्थ = अविकारी नित्य आहे. परिणामीचें नित्यत्व प्रत्यभिज्ञेनें कल्पित मिथ्याच आहे. कूटस्थाचें तर नाशाभावामुळे नित्यत्व पारमार्थिक आहे. कूटस्थत्वाच्या सिद्धि करितां परिस्पंदाचा अभाव सांगतात- 'व्योमवत्सर्वव्यापि' = आकाशाप्रमाणें सर्वव्यापी. परिणामाच्या अभावाला सांगतात- 'सर्वविक्रियारहितम्' = सर्व विकारानें रहित. फलाची अपेक्षा नसल्यामुळे फलार्थही क्रिया नाही असें सांगतात- 'नित्यतृप्तम्' = नित्यतृप्त, तृष्णेची अपेक्षा नसलेलें, किंवा विशोक सुखरूप असें. निरवयवत्वामुळेही त्यांत क्रिया नाही असें सांगतात- 'निरवयवम्' अवयवरहित. स्वयंज्योतिष्ट्वामुळेही त्याच्या भानाकरितां क्रिया नाही असें सांगतात- 'स्वयंज्योतिस्वभावम्' = स्वयंप्रकाश चैतन्यस्वभाव. म्हणून कूटस्थत्वामुळे कर्म = उपासना साध्य मोक्ष नाही असें सांगितलें. कर्म व त्याच्या कार्याशी असंगित्वामुळेही कर्मसाध्य मोक्ष नाही असें सांगतात- "'यत्र धर्माधर्मौ सहकार्येण' = जेथें = ज्या मोक्षांत कार्याशी = अपूर्वाशी सह धर्माधर्म. कालानें अनवच्छिन्नत्वामुळेही नाही असें सांगतात- 'कालत्रयं च नोपावर्तेते' = तीन्ही कालीं समीप प्राप्त होत नाहीत. 'तदे-

"अन्यत्र धर्मादन्यत्राधर्मादन्यत्रास्मात्कृताकृतात्। अन्यत्र भूताच्च भव्याच्च" [क० १।२।१४] इत्यादि श्रुतिभ्यः। अतस्तद्ब्रह्म

॥ व्याख्यान ॥

तदशरीरत्वं मोक्षाख्यम्’ = तें हें अशरीरत्व मोक्ष नामक आहे. धर्मादिकांच्या असंबंधाकरिता प्रमाणाला सांगतात – ‘अन्यत्र धर्मादन्यत्राधर्मात्’ = धर्माहून अन्य अधर्माहून अन्य ‘अन्यत्रास्मात्कृताकृतात्’ = या कार्य व कारणाहून अन्य. ‘अन्यत्र भूताच्च भव्याच्च’ = भूत भविष्याहून चकारावरून वर्तमानाहूनही अन्य. ‘इत्यादि श्रुतिभ्यः’ = कारण त्याविषयीं इत्यादि श्रुति आहेत. पण सांगितलेल्या श्रुति ब्रह्माला कूटस्थ असंगित्व सांगो, मोक्षाला नियोगफलत्व कां असणार नाही? त्यावर सांगतात – ‘अतः’ = कर्मफलविलक्षणत्वामुळे ‘तत्’ = तें कैवल्य ‘ब्रह्म’ = ब्रह्मच आहे. ब्रह्माशी अभेदामुळे मोक्षाला कूटस्थत्व व धर्मादिकांशी असंगित्व आहे. असा भाव. किंवा ‘यस्येयं जिज्ञासा प्रस्तुता’ = ज्याची ही – ‘अथाऽतो ब्रह्मजिज्ञासा’ = अशी पृथक् जिज्ञासा प्रस्तुत आहे. ‘अतः’ = म्हणून = पृथक् जिज्ञास्यत्वामुळे ‘तत्ब्रह्म’ = तें ब्रह्म धर्मादिकांशी असंस्पृष्ट आहे असा अर्थ. ब्रह्माच्या विधीशी स्पर्श असतां शास्त्राला पृथक्त्व असणार नाही. कारण कार्यविलक्षण अज्ञात विषयाचा लाभ नाही. ब्रह्मात्मैक्य मत्तर भेद प्रमाण जागृत असतां विधिपरवाक्यापासून लब्ध होणे शक्य नाही. किंवा त्याच्यावाचून विधीची अनुपपत्तीही नाही. कारण ब्रह्मदृष्टीच्या उपास्तीचा विधि दिसतो असा भाव. अथवा मोक्षाला नियोगाने असाध्यत्व असतां फलित सूत्रार्थाला सांगतात ‘अतः’ = म्हणून = वेदान्तांचा तेथें समन्वय असल्यामुळे ‘यस्येयं जिज्ञासा

यस्येयं जिज्ञासा प्रस्तुता तद्यदि कर्तव्यशेषत्वेनोपदिश्येत तेन च कर्तव्येन साध्यश्चेन्मोक्षोऽभ्युपगम्येत अनित्य एव स्यात्। तत्रैवं सति यथोक्तकर्मफलेष्वेव तारतम्यावस्थितेषु अनित्येषु कश्चिदतिशयो मोक्ष इति प्रसज्येत। नित्यश्च मोक्षः सर्वैर्मोक्षवादिभिरभ्युपगम्यते। अतो न कर्तव्यशेषत्वेन ब्रह्मोपदेशो युक्तः।

॥ व्याख्यान ॥

प्रस्तुता’ = ज्याची ही जिज्ञासा प्रस्तुत आहे. ‘तद्ब्रह्म’ = तें ब्रह्म स्वतंत्रच वेदान्तांकडून उपदेशिलें जातें. विपक्षांत दोषाला सांगतात – ‘तद्यदि कर्तव्यशेषत्वेनोपदिश्येत’ = व ब्रह्म जर कर्तव्यत्वाच्या शेषत्वाने = उपासनेच्या अंगत्वानें उपदेशिलें जाईल. ‘च’ = व. ‘तेन च कर्तव्येन साध्यश्चेन्मोक्षोऽभ्युपगम्येत’ = त्या कर्तव्यत्वाने साध्य जर मोक्ष मानला जाईल. तर ‘अनित्य एव स्यात्’ = तो अनित्यच होईल. ‘तत्रैवं सति’ = तेथें असें असतां = मोक्ष साध्यत्वाने अनित्य असतां. ‘यथोक्तकर्मफलेष्वेव तारतम्यावस्थितेष्वनित्येषु’ = तारतम्याने अवस्थित यथोक्त कर्मफलांतच ‘कश्चिदतिशयो मोक्षः इति प्रसज्येत’ = कोणी अतिशय मोक्ष आहे असे प्राप्त होईल. ‘नित्यश्च मोक्षः सर्वैर्मोक्षवादिभिरभ्युपगम्यते’ = परंतु नित्यच मोक्ष सर्व मोक्षवाद्यांकडून मानला जातो. उपसंहार करितात – ‘अतः’ = म्हणून = मुक्तीला नियोगाने असाध्यत्वाने नियोगाच्या अलाभामुळे कर्तव्याच्या नियोगाचा अभाव आहे म्हणून ‘कर्तव्यशेषत्वेन’ = कर्तव्याच्या शेषत्वाने ‘ब्रह्मोपदेशो न युक्तः’ = ब्रह्माचा उपदेश युक्त नाही.

॥ व्याख्यान ॥

'शारीरं वाचिकं' येथून 'ब्रह्मोपदेशो न युक्तः' — येथपर्यंतच्या भाष्याचा संक्षेपाने हा अर्थ — श्रुतीवरून व न्यायावरून मोक्षाला नित्यसिद्धत्व प्रतीत होत असल्यामुळे क्रियासाध्य मोक्ष नाही — असा. कसा? जर संध्योपासनाप्रमाणे मानसकर्मक उपासननामक धर्म मोक्षफलक, स्वर्गादि ~~प्रमाणे~~ फलक यागाप्रमाणे विधान केला जातो. तर तसें असतां शरीरवानाकडूनच तें फल भोक्तव्य आहे. म्हणून "अशरीरं वाव सन्तं न प्रियाप्रिये स्पृशतः" [छां. ८।१२।१] असा अशरीर मोक्षाचा अनुवाद व योग्य प्रियाप्रियदर्शनाभावाचा अनुवाद निरालंबन होतील. अशरीरत्वच तर धर्मकार्य नाही कारण त्याचा स्वाभाविकत्व आहे. त्याने अनुष्ठेय फल विलक्षण मोक्षाख्य अशरीरत्व स्वभावसिद्ध नित्य आहे असे सिद्ध होते. त्यांतही कोण्या रीतीने परिणामि नित्य असल्यास कदाचित् धर्मकार्य होईल ही. परंतु हें कूटस्थ नित्य ब्रह्म जिज्ञास्यत्वाने प्रक्रान्त आहे. (त्याच्याशी हें विरुद्ध आहे) कीं ज्याचे स्वरूप ज्ञान जीवाला मोक्ष अभिप्रेत आहे. तथें जर हस्तगत विस्मृत सुवर्णादिकाप्रमाणे भ्रान्तिमात्र व्यवहित मोक्षाला प्रत्याख्यान करून देवताविषयक यागादिकाप्रमाणे ब्रह्मविषयक ध्यानक्रियेपासून प्रीतिविशेष भोग्य मोक्ष कल्पिला जाईल. तर त्याच्यातच तारतम्यावस्थित प्रीतिविशेष यागफलांत हाही तसा होईल. व त्यामुळे "तद्यथेह कर्मचितो लोकः क्षीयते एवमेवामुत्र पुण्यचितो लोकः क्षीयते" [छां. ८।१।६] अशा लिङ्गदर्शनाने उपबृंहित न्यायाने कळणारा अनित्य मोक्ष प्राप्त होईल. मोक्षवाद्यांचा तर तसा अभ्युपगम (= अंगीकार) नाही — असा.

अपिच "ब्रह्मवेद ब्रह्मैव भवति" [मुं. ३।२।९] "क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे" [मु. २।२।८] "आनंदं ब्रह्मणो विद्वान्‌ —

॥ व्याख्यान ॥

'अतो न कर्तव्यशेषत्वेन ब्रह्मोपदेशो युक्तः' हा उपसंहार आहे.

पुनः जें म्हटले कीं — "न च पुनरावर्तते" [छां. ८।१५।१] या शास्त्राने कळून असलेले नित्यत्व तर्काने निराकरण करणे युक्त नाही. तें अयुक्त आहे कारण वर्तमानाच्या भिषत्वामुळे तशाभावाविषयीं प्रमाणाची अपेक्षा आहे. कार्याच्या नित्यत्वाविषयीं तर प्रमाण नाही. परमाणूंचा पाकज गुण नित्यत्वाविषयी उदाहरण नाही. कारण त्याच्या नित्यत्वाची प्रक्रियामात्राने सिद्धि आहे. पुनः "तेषामिह न पुनरावृत्तिः" [बृ.   ] "इमं मानवमावर्तं नावर्तन्ते" [छां. ४।१५।६] ह्या श्रुति 'इह' व 'इमं' या विशेषणामुळे या कल्पांत अनावृत्तीला दाखवितात. निरवधिक अनावृत्तीला नाही.

ब्रह्माच्या क्रियेत अनुप्रवेशाला मान्य करून मोक्षाला अनित्यत्व दोष सांगितला. परंतु वेदान्तवाक्यगत पदसमन्वय क्रियानुप्रवेशाला सहन करीत नाही. कारण वेदन (ब्रह्माला जाणण्यांत) व ब्रह्मभवनांत (= ब्रह्म होण्यांत) एककालत्वाचा निर्देश आहे. म्हणून जाणलेल्या ब्रह्माचा क्रियेंत विनियोग नाही. असें सांगतात — 'अपिच'. किंवा प्रदीपापासून तमाच्या निवृत्तिप्रमाणे ज्ञानापासून अज्ञान निवृत्तिरूप मोक्षाला दृष्टफलत्व असल्यामुळेही नियोगसाध्यत्व नाही असे सांगतात — 'अपिच' = पुनः ही 'ब्रह्मवेद ब्रह्मैव भवति' = जो 'मी ब्रह्म आहे' असें जाणतो तो ब्रह्मच होतो. "क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे" कारण व कार्याचे अधिष्ठान अशा

बिभेति कुतश्चन" [तै. २।९] "अभयं वै जनक प्राप्तोऽसि" [बृ. ४।२।४] "तदात्मानमेवावेदहं ब्रह्मास्मीति तस्मात्तत्सर्वमभवत्" [बृ. १।४।१०] तत्र को मोहः कः शोक एकत्वमनुपश्यतः" [ई. ७] इत्येवमाद्याः श्रुतयो ब्रह्मविद्यानंतरं मोक्षं दर्शयन्त्यो मध्ये कार्यान्तरं वारयन्ति। तथा "तद्धैतत्पश्यन्नृषिर्वामदेवः प्रतिपेदेऽहं मनुरभवं सूर्यश्च" [बृ.

॥ व्याख्यान ॥

तद्रूप त्याला जाणले असतां या द्रष्ट्याची अनारब्ध कर्में नाश होतात. "आनंदं ब्रह्मणो विद्वान्न बिभेति कुतश्चन" = ब्रह्माच्या स्वरूपानंदाला जाणणारा द्वितीयाच्या अभावामुळे निर्भय होतो. "अभयं वै जनक प्राप्तोऽसि" = हे जनका! अज्ञानाच्या नाशामुळे तूं अभय ब्रह्माला प्राप्त झाला आहेस. "तदात्मानमेवावेदहं ब्रह्मास्मीति" = ते जीवरूप ब्रह्म गुरूच्या उपदेशावरून आपल्याला 'मी ब्रह्म आहे' असें जाणते झाले. "तस्मात्तत्सर्वमभवत्" = त्या जाणण्यामुळे ते पूर्ण झाले. 'तत्र को मोहः कः शोक एकत्वमनुपश्यतः' = परिच्छेद भ्रान्तीच्या हानामुळे 'मी ब्रह्म आहे' अशा एकत्वाला अनुभविणाऱ्यास अनुभव काळीं शोकमोह असत नाहीत. असा श्रुतीचा अर्थ. 'इत्येवमाद्याः श्रुतयः' = अशा इत्यादि श्रुति. त्यांचे तात्पर्य सांगतात - 'ब्रह्मविद्यानंतरं मोक्षं दर्शयन्त्यः' = ब्रह्मविद्येच्या अनंतर मोक्षाला दाखविणाऱ्या 'मध्ये' = ब्रह्मविद्या व तिच्या फळामध्ये 'कार्यान्तरं वारयन्ति' = दुसऱ्या उपासना क्रियेचे वारण करितात. मोक्षाला विधिफलत्व असतां स्वर्गादिकाप्रमाणे त्याला कालान्तरभावित्व येईल. व तसें असतां श्रुतींचा बाध होईल असा भावः याही कारणामुळे मोक्षाला विधिफलत्व

१।४।१०] इति ब्रह्मदर्शन सर्वात्मभावयोर्मध्ये कार्यान्तरवारणायोदाहार्यम्। यथा तिष्ठन्गायतीति तिष्ठतिगायत्योर्मध्ये तत्कर्तृकं कार्यान्तरं नास्तीति गम्यते। "त्वं हि नः पिता योऽस्माकमविद्यायाः परं पारं तारयसि" [प्र. ६।८]

॥ व्याख्यान ॥

तेही असें सांगतात - 'तथा' = त्याप्रमाणे 'तत्' = ब्रह्म 'ह' = निश्चयेंकरून 'एतत्' = प्रत्यक् मी आहे असें 'पश्यन्' = पाहणारा 'ऋषिर्वामदेवः' = वामदेव ऋषि. त्या ज्ञानापासून 'प्रतिपेदे' = शुद्ध ब्रह्माला प्राप्त होता झाला. व त्या ज्ञानांत स्थित असा 'अहं मनुरभवं सूर्यश्च' = मी मनु आहे. सूर्य आहे इत्यादि स्वतःला सर्वात्मत्व प्रकाशित करणाऱ्या आत्ममंत्रांना पाहता झाला. 'इति' असें श्रुतिवाक्य 'ब्रह्मदर्शन सर्वात्मभावयोर्मध्ये' = ब्रह्मदर्शन व सर्वात्मभावामध्ये एकफलत्वाच्या निर्देशामुळे 'कार्यान्तरवारणाय' = दुसऱ्या कार्याचे = उपासनेचे वारण करण्याकरिता 'उदाहार्यम्' = उदाहरण घ्यावे. कारण येथीळ 'पश्यन्' असा शतृ प्रत्यय मध्ये क्रियान्तराचे वारण करितो. कारण 'लक्षण हेत्वोः क्रियायाः' [पा. सू. ३।२।१२६] या पाणिनी सूत्रांत हेतुभूत क्रियावाचक धातुवरून 'शतृ' प्रत्ययाचे स्मरण आहे. व अन्वयाने अव्यवहित हेतुमानांत क्रियेला हेतुत्व आहे. मध्ये क्रियान्तराच्या अभावाविषयीं दृष्टान्ताला सांगतात - 'यथा' = जसें 'तिष्ठन्गायतीति' = उभा राहून गायन करितो अशा रीतीनें 'तिष्ठतिगायत्योर्मध्ये' = उभे राहणे व गान करणे या मध्यें 'तत्कर्तृकं कार्यान्तरं नास्तीति गम्यते' = त्यांच्याकडून केले जाणारे दुसरें कार्य नाही असे कळते. दृष्टान्तांत जरी स्थितिक्रियेच्या सामर्थ्यावरूनच गीति क्रियेची सिद्धि नाही. परंतु शब्द या प्रयत्नान्तरापासून आहे; तरी त्यांच्या मध्ये दुसऱ्या क्रियेची प्रतीति नाही. अशा एवढ्याच अंशानें हें उदाहरण आहे.

"श्रुतं ह्येव मे भगवद्दृशेभ्य स्तरति शोकमात्मविदिति सोऽहं भगवः शोचामि तं मा भगवाञ्छोकस्य पारं तारयतु" [छां·७।१।३] "तस्मै

॥ व्याख्यान ॥

येथें सर्वात्मभावाला ब्रह्मदर्शनाहून भिन्न प्रयत्नान्तराची अपेक्षा नाही. पुनः ज्ञानापासून अज्ञानाच्या निवृत्तीचें श्रवण होतें. ज्ञानाला विधेयत्व (= उपासनत्व) असतां कर्मत्वा (क्रियात्वा) मुळे अज्ञान निवर्तकत्व युक्त नाही. म्हणून बोधकत्व वेदान्त आहेत विधायक नाहीत असे सांगतात— 'त्वं हि नः पिता योऽस्माकमविद्यायाः परं पारं तारयसि' = भरद्वाजादिक महाऋषि पिप्पलाद गुरूंच्या पादावर नमन करून बोलते झाले. तूं निश्चयेकरून आमचा पिता आहेस जो तूं आह्माला अविद्यामहासागराच्या 'परं' = पुनरावृत्तिशून्य अशा 'पारं' = ब्रह्म या परतीराला विद्यानौकेनें तारतोस = प्राप्त करितोस. ज्ञानाने अविद्येला नाश करितोस असा अर्थ. प्रश्नोपनिषत्‌वाक्याला सांगून छांदोग्यवाक्याला सांगतात— 'श्रुतम्' इत्यादि. येथे 'तारयतु' येथपर्यंत उपक्रमस्थ वाक्य असून शेष ('तस्मै' इत्यादि) उपसंहारस्थ आहे. नारद सनत्कुमाराला शरण जाऊन म्हणाले— "श्रुतं ह्येव मे भगवद्दृशेभ्य स्तरति शोकमात्मविदिति" = भगवन् आत्मवेत्ता शोकाला तरतो असे आपल्यासदृशांकडून मी श्रवण केले आहे. श्रवणच केले आहे दृष्ट नाही असा भाव. 'सोऽहं भगवः शोचामि' = तो मी अज्ञत्वामुळे हे भगवन् शोक करितो. 'तं मा भगवाञ्शोकस्य परं पारं तारयतु' = त्या शोक करणाऱ्या मला भगवानच ज्ञाननौकेने शोकसागराच्या परं पराला प्राप्त करो. असें नारद बोलले. पुनः "तस्मै-

मृदितकषायाय तमसः परं पारं दर्शयति भगवान्सनत्कुमारः" [छां०७।२६।२] इति चैवमाद्याः श्रुतयो मोक्षप्रतिबंधनिवृत्तिमात्रमेवात्मज्ञानस्य फलं दर्शयन्ति। तथाचाचार्यप्रणीतं न्यायोपबृंहितं सूत्रम्— "दुःखजन्मप्रवृत्तिदोषमिथ्याज्ञानानामुत्तरोत्तरापाये तदनन्तरापायादपवर्गः" [न्यायसू·१।१।२] इति।

॥ व्याख्यान ॥

"मृदितकषायाय तमसः परं पारं दर्शयति भगवान्सनत्कुमारः" = भगवान्सनत्कुमार त्या, तपाने दग्धकिल्बिष नारदाला तमाच्या = शोकाला कारण अज्ञानाच्या ज्ञानाने निवृत्तिरूप परपार ब्रह्माला दाखवितात. 'इति चैवमाद्याः श्रुतयो' = अशाही इत्यादि श्रुति. 'एतद्यो वेद निहितं गुहायां सोऽविद्याग्रन्थिं विकिरतीह सोम्य' [मु· २।१।१०] इत्यादि श्रुति आदि शब्दाचा अर्थ आहे. 'मोक्षप्रतिबंधनिवृत्तिमात्रमेवात्मज्ञानस्य फलं दर्शयन्ति' = मोक्षाचा प्रतिबंध अशा मिथ्याज्ञान तमाच्या निवृत्तिमात्रालाच आत्मज्ञानाच्या फळाला दाखवितात. म्हणून मोक्ष क्रियासाध्य नाही (व म्हणून उपासनापर वेदान्त नाहीत असा अर्थ.) याहि कारणामुळे तत्वज्ञान अविद्यानिवृत्तिरूप मोक्षाला हेतु आहे. कर्म नाही असें सांगतात— 'तथाच' = तसेंच 'आचार्यप्रणीतं न्यायोपबृंहितं सूत्रम्' = गौतमाचार्यप्रणीत न्यायाने पुष्ट असे सूत्र आहे— 'दुःखजन्मप्रवृत्तिदोषमिथ्याज्ञानानामुत्तरोत्तरापाये' = दुःख जन्म प्रवृत्ति दोष मिथ्याज्ञानांमध्ये (तत्वज्ञानाने) उत्तरोत्तराच्या अपाय झाला असतां 'तदनन्तरापायादपवर्गः' = त्याचे (उत्तरोत्तराचे) कार्य अशा पूर्वपूर्वाच्या नाशामुळे मोक्ष होतो. 'इति' = असें. अशारीतीनें अन्यही न्यायवेत्ते मिथ्याज्ञानाच्या अपाय झाला

मिथ्याज्ञानापायश्च ब्रह्मात्मैकत्वविज्ञानाद्भवति । नचेदं ब्रह्मात्मैकत्वविज्ञानं संपद्रूपम् । यथा "अनंतं वै मनोऽनंता विश्वेदेवा

॥ व्याख्यान ॥

असतां तदनंतर दुःखाभाव असा मोक्षाला दाखवितात. पण भिन्नात्मज्ञानापासून मुक्ति सांगणारे सूत्र संमत असल्यास परमताला अनुज्ञा होते? त्यावर सांगतात— 'मिथ्याज्ञानापायश्च'= मिथ्याज्ञानाच्या नाश तर 'ब्रह्मात्मैकत्वविज्ञानाद्भवति'= ब्रह्माशी आत्म्याच्या एकत्व विज्ञानापासून होतो. म्हणून तत्वज्ञानापासून मुक्ति या अंशांत संमति सांगितली. भेदज्ञान तर "यत्र हि द्वैतमिव भवति" [बृ. २।४।१४] या श्रुतिवरून भ्रान्तिरूप असल्यामुळे व "मृत्योः स मृत्युमाप्नोति य इह नानेव पश्यति" [बृ. ४।४।१९] या श्रुतीवरून अनर्थहेतु असल्यामुळे ही मुक्तीला हेतु नाही असा भाव. म्हणून "इन्द्रो मायाभिः पुरुरूप ईयते" [बृ. २।५।१९] असा मिथ्याच असलेला भेदावभास त्याच्या प्रतिपक्षी अशा अभेदावभासापासून नाश होतो असे कळते. हें असो पण एकत्वविज्ञान यथावस्थित वस्तुविषयक नाही कीं ज्याने मिथ्यारूप भेदावभास निवृत्त होईल. तर विधिवरून पुरुषेच्छेने कर्तव्य असे संपदादिरूप आहे? त्यावर सांगतात— 'नचेदं ब्रह्मात्मैकत्वविज्ञानं संपद्रूपम्'= हें ब्रह्मात्मैकत्व विज्ञान संपद्रूप तर नाही. संपत्= अल्पही वस्तूचे आलंबन करून कोण्यातरी सामान्याने दर्शन (शास्त्र) मागवरून तिचे ठिकाणी महद्वस्तूचे संपादन करणे व त्यामुळे फलाची प्राप्ति होणे. किंवा फलाचे संपादन करणे. 'यथा'= जसें 'अनंतं वै मनो'= मन वृत्तिरूपाने निश्चयें करून अनंत

ऽनंतमेव स तेन लोकं जयति" [बृ. ३।१।९] इति । नचाध्यासरूपम् यथा "मनो ब्रह्मेत्युपासीत" [छां. ३।१८।१] "आदित्यो ब्रह्मेत्यादेशः" [छां. ३।१९।१] इति च मन आदित्यादिषु ब्रह्मदृष्ट्यध्यासः । नापि विशिष्टक्रियायोगनिमित्तं "वायुर्वाव संसर्गः" "प्राणोवाव संसर्गः" [छां. ४।३।१] इतिवत् । नाप्याज्या-

॥ व्याख्यान ॥

आहे. 'अनंता विश्वेदेवाः'= विश्वेदेव अनंत आहेत. 'तेन'= अनंतत्वसामान्याने त्याचे ठिकाणी विश्वेदेवाची संपत्ति केल्याने 'सः'= तो संपत्ति करणारा 'अनंतमेव लोकं जयति' = अनंतच लोकाला संपादन करितो. 'इति' असे: याप्रमाणे जीवाच्या चिद्रूपसामान्यानें त्याचे ठिकाणी ब्रह्मरूप संपादन करून ब्रह्मलोकाला प्राप्त होतो. असें तर तें नाही असा अर्थ. 'नचाध्यासरूपम्'= तें अध्यासरूपही नाही. 'यथा मनो ब्रह्मेत्युपासीत'= जसें मन ब्रह्म आहे अशी उपासना करावी. 'आदित्यो ब्रह्मेत्यादेशः'= आदित्य ब्रह्म आहे असा उपदेश आहे. 'इति च मन आदित्यादिषु ब्रह्मदृष्ट्यध्यासः'= असा तर मन आदित्यादिकांत ब्रह्मदृष्टीचा अध्यास आहे; त्याप्रमाणे. अध्यास तर अब्रह्म अशा मन आदित्यादिकांत जसे ब्रह्मदृष्टीनें उपासन, तसें अब्रह्म अशा जीवाचेही ब्रह्मदृष्टीनें उपासन. संपद्रूपांत आलंबन नसल्यासारखे करून संपाद्यमानाचेंच प्राधान्याने चिंतन असते. अध्यासांत तर आलंबनाचेंच प्राधान्याने अनुचिंतन असते. 'नापि विशिष्टक्रियायोगनिमित्तम्'= तें, विशिष्ट क्रियायोग निमित्त आहे ज्या ध्यानाला ते विशिष्ट क्रियायोगनिमित्त, असेंही नाही. "वायुर्वाव संसर्गः प्राणोवाव संसर्गः इतिवत्"= जसे प्रलयकाली वायु अग्न्यादिकांना हरण करितो.

वेक्षणादि कर्मवत्कर्मांग संस्कार रूपं, संपदादिरूपे हि ब्रह्मात्मैकत्व विज्ञाने अभ्युपगम्यमाने "तत्वमसि" [छां· ६।८।७] "अहं ब्रह्मास्मि" [बृ·१।४।१०] "अयमात्मा ब्रह्म" [बृ·२।५।१९] इत्येवमादीनां वाक्यानां ब्रह्मात्मैकत्ववस्तु-

---

॥ व्याख्यान ॥

म्हणून संवर्ग गुण योगाने संवर्ग· स्वापकाळी प्राण वागादिकांना सम्यक् हरण करितो म्हणून संहार क्रिया योगामुळे संवर्ग· असें ध्यान छांदोग्यांत विहित आहे· त्याप्रमाणे जीवाचे स्वगत बृहत्ति अर्थ (गुण) योगाने किंवा वृद्धि क्रिया योगाने ब्रह्म असें उपासन विहित आहे· असेंही नाही असा अर्थ· 'नाप्याज्या वेक्षणादि कर्मवत् कर्मांग संस्कार रूपम्'= ते आज्याच्या अवलोकनादि कर्माप्रमाणे कर्मांग संस्कार रूप ही नाही· जसें "पत्न्यवेक्षित माज्यं भवति" असें उपांशु यागादिकाच्या अंग अशा आज्याचे संस्कारक असे पत्नीचे अवेक्षण विहित आहे· तसें कार्मान्तराने गुणभूताला ब्रह्म दृष्टि संस्कार (= कर्मांत कर्तृत्वाने अंग अशा आत्म्याच्या संस्कारा करिता ब्रह्मज्ञान) विहित आहे· असेंही नाही· असा अर्थ· निषेधरूपी प्रतिज्ञा-चतुष्ट्यांत हेतूला सांगतात- 'संपदादिरूपे हि ब्रह्मात्मैकत्वविज्ञाने अभ्युपगम्यमाने'= संपदादिरूप तर ब्रह्मात्मैकत्व विज्ञान मानले असतां 'तत्वमसि'= तें ब्रह्म तूं आहेस 'अहं ब्रह्मास्मि'= मी ब्रह्म आहे· 'अयमात्मा ब्रह्म'= हा प्रत्यगात्मा ब्रह्म आहे· 'इत्येवमादीनां वाक्यानां'= असा इत्यादि वाक्यांच्या 'ब्रह्मात्मैकत्ववस्तु प्रतिपादनपरः पदसमन्वयः'= उपक्रमादि लिङ्गांनीं ब्रह्मात्मैकत्व वस्तूंत प्रमितीला= ज्ञानाला हेतु असा जो समानाधिकरण वाक्यांच्या पदनिष्ठ समन्वय= ते निश्चित तात्पर्य· 'पीड्येत'= तें पीडित होईल· तसें

-प्रतिपादनपरः पदसमन्वयः पीड्येत। "भिद्यते हृदयग्रन्थिश्छिद्यन्ते सर्वसंशयाः" [मु·२।२।८] इति चैवमादीन्यविद्यानिवृत्तिफलश्रवणान्युपरुध्येरन्। "ब्रह्मवेद ब्रह्मैव भवति" [मुं·३।२।९] इति चैवमादीनि तद्भावापत्तिवचनानि संपदादिपक्षेन सामंजस्येनोपपद्येरन्। तस्मान्न

॥ व्याख्यान ॥

असतां तत्वमस्यादि वाक्यांना कळत असलेला अर्थात ब्रह्मात्मैक्यपर पदसमन्वय कारणावाचून इच्छामात्राने संपदादिपर कल्पित केला जाईल· व त्याच्या ज्ञानाच्या निमित्ताने मिथ्याज्ञानाच्या नाशपूर्वक विस्मृत हस्तगत सुवर्ण प्राप्तीप्रमाणे अनुभवारूढ होणारे ब्रह्म प्राप्ति फळ नाहीसे केले जाईल· व "नेह नानास्ति किंचन" [बृ·४।४।१९ कं· ४।११] अशा भेदाच्या अभावाला सांगणाऱ्या श्रुति उपरुद्ध होतील असें सांगतात- "भिद्यते हृदयग्रन्थिश्छिद्यन्ते सर्वसंशयाः" इति चैवमादीन्यविद्यानिवृत्तिफलश्रवणान्युपरुध्येरन्" = 'मी ब्रह्म आहे' असें दर्शन झाले असतां अज्ञानमय हृदयाची= अंतःकरणाची रागादि ग्रन्थि किंवा चैतन्य व मनाची तादात्म्यरूप अहंकार ग्रन्थि नाश होते· व सर्व संशय छिन्न होतात अशी व अशा प्रकारची अविद्या निवृत्ति फळाला सांगणारी वाक्यें उपरुद्ध होतील· कारण संपदादि ज्ञानाला अप्रमात्वाने अज्ञानाचे अनिवर्तकत्व आहे· 'ब्रह्म वेद ब्रह्मैव भवति' इति चैवमादीनि तद्भावापत्तिवचनानि'= व 'जो ब्रह्माला जाणतो तो ब्रह्मच होतो' हीं व इत्यादिक ब्रह्मभावाच्या प्राप्तीला सांगणारी वचनें· 'संपदादिपक्षे न सामंजस्येनोपपद्येरन्'= संपदादि पक्षांत समंजसपणाने उपपन्न होणार नाहीत· (कारण पूर्वरूपाने स्थित असतां किंवा नष्ट असतां दुसऱ्याला दुसऱ्याच्या स्वरूपत्वाचा अयोग आहे·) उपसंहार करितात 'तस्मान्न-

संपदादिरूपं ब्रह्मात्मैकत्वविज्ञानम्। अतो न पुरुषव्यापारतन्त्रा ब्रह्मविद्या, किं तर्हि प्रत्यक्षादिप्रमाणविषयवस्तुज्ञानवत् वस्तुतन्त्रा। एवंभूतस्य ब्रह्मणः तज्ज्ञानस्य च न कयाचित् युक्त्या कार्यानुप्रवेशः शक्यः कल्पयितुम्। न च विदिक्रियाकर्मत्वेन कार्या-

॥ व्याख्यान ॥

संपदादिरूपं ब्रह्मात्मैकत्वविज्ञानम्? = म्हणून ब्रह्मात्मैकत्वविज्ञान संपदादिरूप नाही. फलित सांगतात- 'अतो न पुरुषव्यापारतन्त्रा ब्रह्मविद्या'? म्हणून (प्रमात्वामुळे) ब्रह्मविद्या पुरुषव्यापारतंत्र नाही. 'किं तर्हि'? = मग कशी आहे? काय नित्यच आहे? नाही प्रमाणसाध्य आहे असें सांगतात- 'प्रत्यक्षादिप्रमाणविषयवस्तुज्ञानवत् वस्तुतन्त्रा'? = प्रत्यक्षादि प्रमाणाचा विषय अशा वस्तूच्या ज्ञानाप्रमाणे वस्तुतंत्र आहे. हानोपादानरहित ब्रह्मवस्तूच्या स्वरूपमात्र निष्ठ आहे. असे मानले पाहिजे. तेथें असें असतां ज्ञानोत्तरकाळीं ब्रह्म, क्रियाकर्मकारकतेला कसें नेले जाईल? किंवा त्याचे ज्ञान अपरोक्षफळपर्यंत असलेले विधीच्या विषय कसें होईल! असें सांगतात- 'एवंभूतस्य ब्रह्मणः'? = अशा प्रकारच्या हेयोपादेयरहित सिद्ध वस्तु मोक्षफलस्वरूप ब्रह्माच्या 'तज्ज्ञानस्य च'? व प्रकृतिसाध्य अशा त्याच्या ज्ञानाच्या 'न कयाचित् युक्त्या' कोणत्याही युक्तीने 'कार्यानुप्रवेशः कल्पयितुं शक्यः'? = कार्यांत अनुप्रवेश कल्पना करणे शक्य नाही. म्हणून मिथ्याच भेदावभास आहे. त्याचा प्रतिपक्षी अभेदावभासापासून नाश होतो. म्हणून मिथ्याज्ञाननिवृत्तिमात्र (ब्रह्मस्वरूप मोक्ष आहे असे श्रुतिन्यायावरून सिद्ध झाले. पण विदिक्रियाकर्मतर ब्रह्म आहे.

नुप्रवेशो ब्रह्मणः। "अन्यदेव तद्विदितादथोऽविदितादधि" [के. १।३] इति विदिक्रियाकर्मत्वप्रतिषेधात्। "येनेदं सर्वं विजानाति तं केन विजानीयात्" [बृ. २।४।१४] इति च। तथोपास्तिक्रियाकर्मत्वप्रतिषेधोऽपि भवति- "यद्वाचानभ्युदितं येन वागभ्युद्यते" इत्यविषयत्वं ब्रह्मणोऽपन्यस्य "तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते" [के. १।४] इति।

॥ व्याख्यान ॥

त्यामुळे क्रियासंबंधाची संभावना असतां विधीच्या अवसर आहे? अशी आशंका असतां सांगतात- 'न च विदिक्रियाकर्मत्वेन कार्यानुप्रवेशो ब्रह्मणः'? = ज्ञानक्रियाकर्मत्वाने ही ब्रह्माचा कार्यांत अनुप्रवेश नाही. कारण "अन्यदेव तद्विदितादथोऽविदितादधि"? = तें कळत असलेल्या कार्याहून व न कळत असलेल्या कारणाहून अधि = पलीकडचे अन्यच आहे 'इति विदिक्रियाकर्मत्वप्रतिषेधात्'? = असा त्याला विदिक्रियाकर्मत्वाचा प्रतिषेध आहे. 'येनेदं सर्वं विजानाति तं केन विजानीयात्'? = ज्या आत्म्याने या सर्व दृश्याला लोक जाणतो त्याला कोणत्या करणाने जाणावे? 'इति च' असाही (त्याला ज्ञानक्रियाकर्मत्वाच्या प्रतिषेध आहे.) 'तथा' = तसें 'यद्वाचानभ्युदितं येन वागभ्युद्यते'? = जे वाणीच्या योगाने प्रकाशित केले जात नाही. परंतु ज्याच्या योगाने वाणी प्रकाशित केली जाते 'इति अविषयत्वं ब्रह्मणः उपन्यस्य'? = असे अविषयत्व ब्रह्माला सांगून 'तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते' ते (= अज्ञेय) च ब्रह्म तू जाण जें हें अशा रीतीने = विषयरूपाने उपासना केले जाते तें ब्रह्म नव्हे 'इति' = असा 'उपास्तिक्रियाकर्मत्वप्रतिषेधोऽपि भवति'? = उपास्तिक्रियाकर्मत्वाचा प्रतिषेध ही आहे. येथें 'इति' याचा 'उपास्तिक्रिया' या वाक्याशी संबंध.

अविषयत्वे ब्रह्मणः शास्त्रयोनित्वानुपपत्तिरिति चेत् । न । अविद्याकल्पितभेदनिवृत्तिपरत्वाच्छास्त्रस्य । नहि शास्त्रमिदंतया विषयभूतं ब्रह्म प्रतिपिपादयिषति । किं तर्हि ? प्रत्यगात्मत्वेनाविषयतया प्रतिपादयदविद्याकल्पितं वेद्यवेदितृवेदनादिभेदमपनयति ।

।। व्याख्यान ।।

पण तो हा शान्तिकर्मांत वेताळाचा उदय आहे. कारण ब्रह्माच्या क्रियेस अनुप्रवेश निराकरण करण्याकरिता ज्ञानक्रियेचे अविषयत्व निराकरण करणाऱ्याकडून - त्यामुळेच शास्त्रयोनित्वही निराकृत होतच. असें सांगतो - 'अविषयत्वे ब्रह्मणः शास्त्रयोनित्वानुपपत्तिः' = पण ब्रह्माला अविषयत्व असतां शास्त्र प्रमाणत्वाची अनुपपत्ति येते 'इति चेत्' = असें असेल तर. यावर उत्तर सांगतात - 'न' = नाही. 'अविद्याकल्पितभेदनिवृत्तिपरत्वाच्छास्त्रस्य' = कारण शास्त्राला अविद्याकल्पित भेदनिवृत्ति परत्व आहे. 'परत्व' = फलत्व. किंवा निष्प्रपंचरूप ब्रह्मांत तात्पर्य. वेदान्तजन्य वृत्तीने केलेल्या अविद्यानिवृत्ति फलशालित्वाने ब्रह्माला शास्त्रप्रमाणकत्व असून स्वप्रकाश ब्रह्माला वृत्तींस अभिव्यक्त स्फुरणाच्या अविषयत्वामुळे अप्रमेयत्व आहे असा अर्थ. सांगितलेल्याचे विवरण करितात - 'नहि शास्त्रमिदंतया विषयभूतं ब्रह्म प्रतिपिपादयिषति' = शास्त्र तर 'हे'त्वाने (= चैतन्यविषयत्वाने) विषयभूत ब्रह्माला प्रतिपादन करण्याची इच्छा करीत नाही. 'किं तर्हि?' मग कसें: 'प्रत्यगात्मत्वेनाविषयतया' = अंतरात्मत्वाने अहेत्वाने 'प्रतिपादयदविद्याकल्पितं वेद्यवेदितृवेदनादिभेदमपनयति' = प्रतिपादन करीत अविद्याकल्पित वेद्यवेदितृवेदनादि (ज्ञेयज्ञातृज्ञानादि) भेदाला निवृत्त करिते.

तथाच शास्त्रम् - "यस्यामतं तस्य मतं मतं यस्य न वेद सः । अविज्ञातं

।। व्याख्यान ।।

शास्त्र तर 'तो हा' इत्यादि लौकिक वाक्याप्रमाणे ब्रह्मांत प्रमाण आहे. तें असें - 'तो हा' असा देशकाळकृत भेदोपाधींच्या प्रविलयाने अभेद कळतो. तसा त्वंपदार्थही - आपल्याला अहंरूप मानणारा 'तत्त्वमसि' वाक्यावरून तत्पदार्थाशी आपल्या एकतेला जाणणारा 'तो हा' या वाक्याप्रमाणे अस्मात्मक इदमंशोपाधीने केलेल्या वेद्यवेदितृवेदनात्मक अशा सामर्थ्यावरून प्रविलीयमान प्रपंचाने आपल्याला पृथक् करून पृथक् झालेला, - अशा प्रकारा शास्त्रदर्शित प्रमाणफळ दाखविलेला, त्यालाही (प्रमाणफलालाही) अवच्छेदकाच्या (ब्रह्माकार वृत्तीच्या) नाश झाला असतां तेव्हांच सोडीत निर्विशेषतेला प्राप्त होतो. त्याने प्रमात्रादिचतुष्टयाचा एककाळी प्रलय होत असतांही त्या अवच्छेदाने उत्पन्न होणारे अनुभवफळ वाक्यनिर्वचन आहे. म्हणून वेदान्ताचा विषय निर्वाण आहे असे वेदवेत्ते जाणते झाले.

असे असल्यामुळेच अशा प्रकारच्या प्रमाणव्यापाराला प्रकाशक मंत्र व ब्राह्मण वाक्यें आहेत. असें सांगतात - 'तथाच शास्त्रम्' = तसेंच शास्त्र आहे की - 'यस्यामतं तस्य मतम्' = ज्याला ब्रह्म अमत = चिदाभासाचे (प्रमात्याचे) अविषय आहे. असा निश्चय आहे. त्याला ब्रह्म सम्यक् अवगत आहे. 'मतं यस्य' = ज्या अज्ञाला ब्रह्म चिदाभासाचे विषय आहे' 'न वेद सः' = तो ब्रह्माला सम्यक् जाणत नाही. सांगितलेल्या अर्थाचाच दृढतेकरिता श्रुति अनुवाद करिते - 'अविज्ञातं विजानताम्' = सम्यक् जाण-

विजानतां विज्ञातमविजानताम्" [के० २।३] "न दृष्टेर्द्रष्टारं पश्येः" "न विज्ञातेर्विज्ञातारं विजानीयाः" [बृ० ३।४।२] इति चैवमादि। अतोऽविद्याकल्पितसंसारित्वनिवर्तनेन नित्यमुक्तात्मस्वरूपसमर्पणान्न मोक्षस्यानित्यत्वदोषः। यस्य तूत्पाद्यो मोक्षः तस्य मानसं वा-

॥ व्याख्यान ॥

-नात्पास ब्रह्म अविषयत्वामुळे अविज्ञात-अदृश्य असते. 'अविजानतां' = अज्ञानांना ब्रह्म 'विज्ञातम्' = दृश्य असते. 'न दृष्टेर्द्रष्टारं पश्येः' = चाक्षुष मनोवृत्तीच्या साक्षीला या दृश्य दृष्टीने पाहूं नकोस. 'न विज्ञातेर्विज्ञातारं विजानीयाः' = निश्चयस्वरूप बुद्धिवृत्तीच्या साक्षीला तिच्या योगाने विषय करूं नकोस. 'इति चैवमादि' = असे वइत्यादि. पण अविद्यादिकांच्या निवर्तकत्वाने शास्त्राला प्रामाण्य असतां ही निवृत्तीला आगन्तुकत्व असल्यामुळे मोक्षाला अनित्यत्व येईल की? याबर नाही असें सांगतात- 'अतो' = म्हणून = तत्वज्ञानामुळे 'अविद्याकल्पित संसारित्व निवर्तनेन' = अविद्याकल्पित संसारित्वाच्या निवर्तनानें 'नित्यमुक्तात्मस्वरूप समर्पणात्' = नित्यमुक्त आत्मस्वरूपाच्या समर्पणानें 'न मोक्षस्यानित्यत्व दोषः' = मोक्षाला अनित्यत्वदोष येत नाही. अविद्यानिवृत्तिरूप ध्वंसाला नित्यत्व असल्यामुळे व तद्रूप मोक्षाला (नित्य) आत्मस्वरूपत्व असल्यामुळे अनित्यत्व प्रसंग नाही. असा अर्थ. उत्पत्ति विकार आप्ति व संस्कार चार प्रकारचे क्रियाफळ आहे. त्याच्याहून भिन्नत्व असल्यामुळे मोक्षाला उपासनासाध्यत्व नाही असें सांगतात- 'यस्य तु' = ज्याला = ज्याच्या मतांतर 'उत्पाद्यो मोक्षः' = उत्पन्न केल्या जाणारा मोक्ष आहे. 'तस्य' = त्याला =

चिकं कायिकं वा कार्यमपेक्षते इति युक्तम्। तथा विकार्यत्वे च। तयोः पक्षयोर्मोक्षस्य ध्रुवमनित्यत्वम्। न हि दध्यादि विकार्यं उत्पाद्यं वा घटादि नित्यं दृष्टं लोके। न चाप्यत्वेनापि कार्यापेक्षा, स्वात्मस्वरूपत्वे सत्यनाप्यत्वात्। स्वरूपव्यतिरिक्तत्वेऽपि ब्रह्मणो नाप्यत्वम्,

॥ व्याख्यान ॥

त्याच्या मतांत तो 'मानसं वाचिकं कायिकं वा कार्यम्' = मानसिक, वाचिक किंवा कायिक कार्याला 'अपेक्षते इति युक्तम्' = अपेक्षित करितो. हें युक्त आहे. 'तथा विकार्यत्वे च' = तसें त्याला विकार्यत्व असतांही कार्याला अपेक्षित करितो हें युक्त आहे असा अन्वयः. असलेल्याला अवस्थान्तर प्राप्ति विकार होय. त्यांना दूषित करितात- 'तयोः पक्षयोर्मोक्षस्य ध्रुवमनित्यत्वम्' = त्या दोन पक्षांत मोक्षाला निश्चयेंकरून अनित्यत्व येते. दृष्टान्ताला सांगतात- 'हि दध्यादि विकार्यं' = निश्चयेंकरून विकाराला प्राप्त होणारे दध्यादि "उत्पाद्यं वा घटादि" = किंवा उत्पन्न केले जाणारे घटादि 'न नित्यं दृष्टं लोके' = लोकांत नित्य दृष्ट नाही. पण अनित्यत्वाच्या निरासाकरितां। स्थित अशाच ब्रह्माची क्रियेच्या योगाने ग्रामाप्रमाणे प्राप्ति असेल? याबर नाही असें सांगतात- "न चाप्यत्वेनापि कार्यापेक्षा" = प्राप्यत्वाने ही ब्रह्माला कार्याची अपेक्षा नाही. काय ब्रह्म जीवाशी अभिन्न आहे? किंवा नाही? दोन्ही प्रकारांनी अनाप्यत्व असल्यामुळे त्याला क्रियेची अपेक्षा नाही असें सांगतात- स्वात्मस्वरूपत्वे सति अनाप्यत्वात्' = कारण त्याला स्वतःचे आत्मस्वरूपत्व असतां = असल्यामुळे अप्राप्यत्व आहे. 'स्वरूपव्यतिरिक्तत्वेऽपि ब्रह्मणो नाप्यत्वम्" =

सर्वगतत्वेन नित्याप्तस्वरूपत्वात्सर्वेण ब्रह्मणः आकाशस्येव । नापि संस्कार्यो मोक्षः येन व्यापारमपेक्षेत, संस्कारो हि नाम संस्कार्यस्य गुणाधानेन वा स्याद्दोषापनयनेन वा । न तावद्गुणाधानेन संभवति, अनाधेयातिशयब्रह्मस्वरूपत्वान्मोक्षस्य । नापि दोषापनयनेन नित्यशुद्धब्रह्मस्वरूपत्वान्मोक्षस्य । स्वात्मधर्म एव

॥ व्याख्यान ॥

= व ब्रह्माला स्वरूप व्यतिरिक्तत्व असतांही प्राप्यत्व नाही. 'सर्वगतत्वेन नित्याप्तस्वरूपत्वात्सर्वेण ब्रह्मणः आकाशस्येव' = कारण आकाशाप्रमाणे ब्रह्माला सर्वगतत्वाने सर्वांकडून नित्य आप्तस्वरूपत्व आहे. जशी व्रीहींना संस्कार्यत्वाने प्रोक्षणाची अपेक्षा आहे. तशी मोक्षाला नाही असें सांगतात– 'नापि संस्कार्यो मोक्षः' = मोक्ष संस्कार्य ही नाही. 'येन व्यापारमपेक्षेत' = कीं ज्याने संस्काराकरितां तो व्यापाराची अपेक्षा करील. 'संस्कारो हि नाम' = संस्कार नामक तर 'संस्कार्यस्य गुणाधानेन वा स्यात्' = संस्कार्याला गुणाच्या आधानाने = ठेवण्याने होतो. 'दोषापनयनेन वा' = किंवा दोषाच्या दूरीकरणाने होतो. जसें गुणाधान, व्रीहींना प्रोक्षणादिकाने, व दोषापनयन, वस्त्रादिकांत मळाच्या अपनयनाने = दूरीकरणाने होतो. त्याप्रमाणे. 'न तावद्गुणाधानेन संभवति' = गुणांच्या ठेवण्याने तर संभवत नाही. 'अनाधेयातिशयब्रह्मस्वरूपत्वान्मोक्षस्य' = कारण मोक्षाला, ~~नित्य शुद्ध ब्रह्माचे स्वरूपत्व आहे. दुसऱ्यारीतीनें शंका घेतो~~ ज्याच्यांत अतिशय ठेवल्या जात नाही. अशा ब्रह्माचे स्वरूपत्व आहे. 'नापि दोषापनयनेन' = दोषाच्या निराकरणानेही नाही. 'नित्यशुद्धब्रह्मस्वरूपत्वान्मोक्षस्य'

संस्तिरोभूतो मोक्षः क्रियया ऽऽत्मनि संस्क्रीयमाणे ऽभिव्यज्यते, यथाऽऽदर्शे निघर्षणक्रियया संस्क्रीयमाणे भास्वरत्वं धर्म इति चेत् । न । क्रियाश्रयत्वानुपपत्तेरात्मनः । यदाश्रया हि क्रिया तमविकुर्वती नैवात्मानं लभते । यद्यात्मा क्रियया विक्रियेतानित्यत्वमात्मनः प्रसज्येत ।

दुसऱ्यारीतीनें शंका घेतो–

कारण मोक्षाला नित्यशुद्धब्रह्माचे स्वरूपत्व आहे. 'स्वात्मधर्म एव सन्' = पण आत्मधर्मच असून 'तिरोभूतो मोक्षः' = आच्छादित मोक्ष 'क्रियया आत्मनि संस्क्रीयमाणे' = क्रियेच्या योगाने आत्म्याला संस्कार केला असतां 'अभिव्यज्यते' = अभिव्यक्त होतो. ब्रह्मात्मस्वरूपच अनादि अविद्यामळाने आवृत उपासनेच्या योगाने मळ नष्ट झाला असतां अभिव्यक्त होतो. याविषयीं दृष्टान्त सांगतात– 'यथा आदर्शे निघर्षणक्रियया संस्क्रियमाणे' = जसा आदर्श निघर्षण क्रियेने स्वच्छ केला असतां 'भास्वरत्वं धर्मः' = त्याचा प्रकाशग्राही धर्म अभिव्यक्त होतो. 'इति चेत्' = असे असेल तर. संस्कार = मळनाश. काय आत्म्यांत मळ सत्य आहे? किंवा कल्पित? किंवा अन्यनिष्ठ? पहिला पक्ष नाही असें सांगतात– 'न' नाही 'क्रियाश्रयत्वानुपपत्तेरात्मनः' = कारण आत्म्याला क्रियेच्या आश्रयत्वाची अनुपपत्ति आहे. अनुपपत्तीला स्पष्ट करितात– 'यदाश्रया हि क्रिया' = ज्याच्या आश्रयाने तर क्रिया असते ती 'तमविकुर्वती नैवात्मानं लभते' = त्याला विकार केल्यावाचून आपल्या अस्तित्वाला प्राप्त होत नाही. क्रिया तर आपल्या आश्रयांत संयोगादि विकार केल्यावाचून उत्पन्न होत नाही असा अर्थ. विकार तर आत्म्याला संभवत नाही असें सांगतात– 'यदि आत्मा क्रियया विक्रियेत' = जर आत्मा क्रियेच्या योगाने विकाराला प्राप्त होईल तर 'अनित्यत्वमात्मनः प्रसज्येत' = आत्म्याला

"अविकार्यो यमुच्यते" [भ॰गी॰ २।२५] इति चैवमादीनि वाक्यानि बाध्येरन्। तच्चानिष्टम्। तस्मान्न स्वाश्रया क्रियाऽऽत्मनः संभवति। अन्याश्रयायास्तु क्रियाया अविषयत्वान्न तयात्मा संस्क्रियते। ननु देहाश्रयया स्नानाचमनयज्ञोपवीतादिकया क्रियया देही संस्क्रियमाणो दृष्टः"। न देहादिसंहतस्यैव अविद्यागृहीतस्यात्मनः संस्क्रियमाणत्वात्।

॥ व्याख्यान ॥

अनित्यत्व प्राप्त होईल. याला वाक्यांचा विरोधही आहे असें सांगतात- 'अविकार्योऽयमुच्यते इति चैवमादीनि वाक्यानि बाध्येरन्'= 'हा विकारी म्हटला जातो' असे व इत्यादि वाक्यें बाधित होतील. 'तच्चानिष्टम्'= तें तर वाक्यांचे बाधन अनिष्ट आहे 'तस्मान्न स्वाश्रया क्रिया आत्मनः संभवति'= म्हणून स्वतःच्या आश्रयाने असलेली क्रिया आत्म्याला संभवत नाही. दुसरा पक्षही संभवत नाही असें सांगतात- 'अन्याश्रयायास्तु क्रियाया'= अन्याच्या आश्रयाने असलेल्या तर क्रियेच्या 'अविषयत्वात्'= अविषयत्वामुळे = क्रियाश्रय द्रव्याच्या असंयोगामुळे असा अर्थ. 'न तयाऽऽत्मा संस्क्रियते'= त्या क्रियेच्या योगाने आत्मा संस्कृत केल्या जात नाही. सावयव दर्पण तर क्रियाश्रय इष्टिका चूर्णादि द्रव्य संयोगित्वामुळे संस्कृत केले जाते असा भाव. अन्याश्रय क्रियेनी अन्य संस्कृत केल्या जात नाही. याविषयी व्यभिचाराची शंका घेतो- 'ननु देहाश्रयया स्नानाचमन यज्ञोपवीतादिकया क्रियया'= पण देहाच्या आश्रयाने असलेल्या स्नानाचमन यज्ञोपवीतादि क्रियेच्या योगाने 'देही संस्क्रियमाणो दृष्टः'= जीवात्म्याला संस्कार होत असल्याचे दिसते. 'न'= नाही. 'देहादिसंहतस्यैव अविद्यागृहीतस्यात्मनः'= मूळाविद्येंत प्रतिबिंबितत्वाने गृहीत

प्रत्यक्षं हि स्नानाचमनादेर्देहसमवायित्वम्। तया देहाश्रयया तत्संहत एव कश्चिदविद्ययाऽऽत्मत्वेन परिगृहीतः संस्क्रियते इति युक्तम्। यथा देहाश्रयचिकित्सानिमित्तेन धातुसाम्येन तत्संहतस्य तदभिमानिनो आरोग्यफलं 'अहमरोगः' इति यत्र बुद्धिरुत्पद्यते। एवं स्नाना

॥ व्याख्यान ॥

असा 'मी मनुष्य आहे' अशा भ्रान्तीने देहाच्या तादात्म्याला प्राप्त झालेल्या आत्म्याला 'संस्क्रियमाणत्वात्'= क्रियाश्रयत्वभ्रान्तीने संस्कार्यत्व भ्रम होतो. त्यामुळे व्यभिचार नाही. 'प्रत्यक्षं हि स्नानाचमनादेर्देहसमवायित्वम्'= प्रत्यक्ष तर स्नानाचमनादिकाला देहाशी संबंधित्व आहे. म्हणून 'तया देहाश्रयया क्रियया'= त्या देहाच्या आश्रयाने असलेल्या क्रियेनी 'तत्संहत एव'= त्या देहाशी तादात्म्याला प्राप्त झालेलाच 'कश्चित्'= कोणी = अनिश्चित ब्रह्म स्वरूप 'अविद्ययाऽऽत्मत्वेन परिगृहीतः'= अविद्येच्या योगाने आत्मत्वाने ग्रहण केल्या गेलेला 'संस्क्रियते इति युक्तम्'= संस्कृत केल्या जातो असे युक्त आहे. याविषयी दृष्टान्ताला सांगतात- 'यथा देहाश्रयाचिकित्सानिमित्तेन धातुसाम्येन'= जसें देहाच्या आश्रयाने असलेल्या चिकित्सेच्या निमित्ताने होणाऱ्या धातुसाम्यानें 'तत्संहतस्य तदभिमानिनः' देहाशी तादात्म्याला प्राप्त झालेल्या त्याच्यावर अभिमान असलेल्याला 'अहमरोगः इति यत्र बुद्धिरुत्पद्यते'= 'मी अरोगी आहे' अशी जेथें= ज्या आत्म्यात बुद्धि उत्पन्न होते. त्याला 'आरोग्यफलं'= आरोग्य फल होते. दार्ष्टान्तिकाला सांगतात- 'एवं स्नानाचमन यज्ञोपवीतादिना'= याप्रमाणे स्नान आचमन यज्ञोपवीतादिकाने 'अहं

चमन यज्ञोपवीतादिना 'अहं शुद्धः संस्कृतः' इति यत्र बुद्धिरुत्पद्यते स संस्क्रियते। स च देहेन संहत एव। तेनैव ह्ययं कर्त्राऽहंप्रत्ययविषयेण प्रत्ययिना सर्वाः क्रिया निर्वर्त्यन्ते। तत्फलं च स एवाश्नाति। "तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्नन्यो अभिचाक-

---

॥ व्याख्यान ॥

शुद्धः संस्कृतः = मी शुद्ध आहे संस्कृत आहे इति यत्र बुद्धिरुत्पद्यते = अशी जेथे (ज्या आत्म्यांत) बुद्धि उत्पन्न होते 'स संस्क्रियते' = तो संस्कृत केल्या जातो. 'स च देहेन संहत एव' = तो तर देहाशी तादात्म्याला प्राप्त झालेलाच आहे पण देहाशी अभिन्नाला संस्कार कसा? कारण त्याला पारलौकिक फलभोक्तृत्वाचा असंभव आहे? त्यावर सांगतात- 'तेनैव हि' = देहाशी तादात्म्याला प्राप्त झालेल्या त्या त्यानेंच तर 'अहंप्रत्ययविषयेण' = अंतःकरणांत प्रतिबिंबितरूप अशा अहंप्रत्ययाच्या विषयानें 'प्रत्ययिना' = मनाशी तादात्म्यामुळे कामादिक प्रत्यय ज्याला आहेत अशा. 'अहं कर्त्रा' = मी कर्ता आहे अशा भासमानाकडून 'सर्वाः क्रिया निर्वर्त्यन्ते' = सर्व स्नानादिक क्रिया केल्या जातात. 'तत्फलं च स एवाश्नाति' = व त्याचे फळही तोच भोगतो. मनोविशिष्ट अशा पारलौकिक भोक्त्याला संस्कार युक्त आहे असा भाव. विशिष्टाचे भोक्तृत्व आहे केवळ साक्षीला नाही याविषयीं प्रमाणाला सांगतात- 'तयोः' = त्या प्रमातृ व साक्षीमध्यें 'अन्यः' = अंतःकरण संसर्गमात्रानें कल्पित कर्तृत्वादिमान प्रमाता 'पिप्पलं' = सुखदुःखरूप कर्मफळाला. 'स्वादु' = अनेकविचित्र वेदनास्वादरूप अशा त्याला. 'अत्ति' = भोगतो. 'अन्यः' = तोच शोधितत्वाने अन्य 'अनश्नन्' = न भो-

शीति" [मुं ३।१।१] इति मंत्रवर्णात्। "आत्मेन्द्रियमनोयुक्तं भोक्तेत्याहुर्मनीषिणः" [क. १।३।४] इति। तथा "एको देवः सर्वभूतेषु गूढः सर्वव्यापी सर्वभूतान्तरात्मा। कर्माध्यक्षः सर्वभूताधिवासः साक्षीचेता केवलो निर्गुणश्च" [श्वे. ६।११] इति, "स पर्यगाच्छुक्रमकायमव्रण-

---

॥ व्याख्यान ॥

-गीत्च 'अभिचाकशीति' = साक्षित्वाने प्रकाशतो. 'इति मंत्रवर्णात्' = कारण असा मंत्रवर्ण आहे. विशिष्टाच्या भोक्तृत्वाविषयीं दुसरें प्रमाण सांगतात- "आत्मेन्द्रिय मनो युक्तं भोक्तेत्याहुर्मनीषिणः" = देहेन्द्रिय मनानें युक्त प्रमात्या आत्म्याला विद्वान भोक्ता म्हणतात. 'इति च' = असाही मंत्रवर्ण आहे. असे सोपाधिक सिद्धान्तला मिथ्यासंस्कार्यत्व सांगून निरुपाधिकाच्या असंस्कार्यत्वाविषयी प्रमाणाला सांगतात- 'तथा' = तसें 'सर्वभूतेषु' = सर्व भूतांत 'एकः' = अद्वितीय 'देवः' = स्वप्रकाश. तथापि मायावृतत्वामुळे प्रकाशत नाही असें सांगतात- 'गूढः' पण जीवाशी असंबंधामुळे किंवा भिन्नत्वामुळे देवाचें अभान आहे मायागूहनामुळे नाही? यावर सांगतात- 'सर्वव्यापी सर्वभूतान्तरात्मा' = सर्व भूतांत व्यापक व सर्व भूतांचा अंतरात्मा. देवाला विभुत्व असल्यामुळे व सर्व प्राण्यांचे प्रत्यक्त्व असल्यामुळे त्याचे आवरणामुळेच अभान आहे असा अर्थ. पण प्रत्यक्त्व असतां कर्तृत्वही येईल? यावर नाही असें सांगतात- 'कर्माध्यक्षः' = कर्मांचा = क्रियेचा साक्षी. मग साक्ष्य वस्तु असल्यामुळे द्वैतापत्ति आहे? नाही 'सर्वभूताधिवासः' सर्व भूतांचे अधिष्ठान होऊन 'साक्षी' = साक्षी होतो असा. अधिष्ठान अशा साक्षींत साक्ष्य वस्तु कल्पित आहे असा भाव. साक्षी शब्दाच्या अर्थाला सांगतात. 'चेता केवलः' = केवळ जाणणारा. बोद्धृत्व असता अकर्ता अशाला लोकांत साक्षित्व प्रसिद्ध आहे. 'निर्गुणः' = गुण

मस्नाविरं शुद्धमपापविद्धम्" [ई. ८] इतिच। एतौ मंत्रौ अनाधेयातिशयतां नित्यशुद्धतांच ब्रह्मणो दर्शयतः। ब्रह्मभावश्च मोक्षः। तस्मान्न संस्कार्योऽपि मोक्षः। अतोऽन्यं मोक्षं प्रति क्रियानुप्रवेश

॥०व्याख्यान॥

रहित. चकार दोषाभावाच्या समुच्चयाकरिता आहे. निर्गुणत्वामुळे व निर्दोषत्वामुळे गुणाधान दोष नाशक संस्कार त्याला नाही. असा अर्थ. 'इति' = असा मन्त्रवर्ण. 'सः' = तो. तो अशा उपक्रमावरून शुक्रादि शब्द पुल्लिंगत्वाने जाणावेत. तोच आत्मा 'पर्यगात्' = सर्वत्र व्याप्त आहे. 'शुक्रं' = दीप्तिमान आहे. 'अकायः' = लिङ्गशरीरशून्य. 'अव्रणः' = अक्षत. 'अस्नाविरं' = शिरारहित. या दोन विशेषणांनी स्थूलदेहशून्यत्व सांगितले. 'शुद्धः' = रागादि मल शून्य. 'अपापविद्ध' = पुण्य पापापासून असंस्पृष्ट. 'इति च' = असाही मंत्र आहे. 'एतौ मंत्रौ' = हे दोन मंत्र 'अनाधेयातिशयतां नित्यशुद्धतांच ब्रह्मणो दर्शयतः' ब्रह्माला, ज्याठिकाणी अतिशय ठेवता येत नाही अशा रूपतेला व नित्य शुद्धतेला दाखवितात. तथापि मोक्षाला काय प्राप्त व्हावे? त्यावर सांगतात- 'ब्रह्मभावश्च मोक्षः' व ब्रह्मभाव मोक्ष आहे. 'तस्मान्न संस्कार्योऽपि मोक्षः' म्हणून मोक्ष संस्कार्यही नाही. पण अन्यही क्रियाफळ आहे. त्याच्या द्वाराने मोक्षाला क्रियेचा अनुप्रवेश होईल? अशी आशंका असता सांगतात- 'अतो अन्यं' = यांच्याहून दुसरे = या उत्पत्ति, आप्ति विकार व संस्कार यांच्याहून दुसरे. पांचवे क्रियाफळ दृष्ट किंवा अदृष्ट 'मोक्षं प्रति क्रियानुप्रवेश द्वारम्' = मोक्षाप्रत क्रियेच्या अनुप्रवेशाचे द्वार 'न शक्यं केनचित् दर्शयितुम्' = कोणाकडूनही दाखविणे शक्य नाही. पण मोक्षाला असाध्यत्व असता शास्त्रारंभ व्यर्थ आहे? नाही कारण

द्वारं न शक्यं केनचित् दर्शयितुम्। तस्माज्ज्ञानमेकं मुक्त्वा क्रियायाः गंधमात्रस्याप्यनुप्रवेशः इह नोपपद्यते।

॥०व्याख्यान॥

त्याला ज्ञानार्थत्व आहे असे सांगतात- 'तस्माज्ज्ञानमेकं मुक्त्वा' = म्हणून द्वाराभावामुळे एका ज्ञानाला सोडून 'इह' = येथे मोक्षांत 'क्रियायाः गंधमात्रस्यापि' क्रियेच्या गंधमात्राचाही 'अनुप्रवेशो नोपपद्यते' = अनुप्रवेश उपपन्न होत नाही. (म्हणून ज्ञानाचाच विषय मोक्ष आहे क्रियेचा नाही असा अर्थ.)

'यस्यतुत्पाद्यो मोक्षः' इत्यादि 'तस्माज्ज्ञानमेकं मुक्त्वा क्रियायाः गंधमात्रस्यापि अनुप्रवेशः इह नोपपद्यते' इत्यन्त भाष्याने (ज्ञानाने) अविद्येच्या निवर्तनाने नित्य मुक्तात्मस्वरूपाच्या समर्पणरूपी मोक्षाला सोडून क्रियेच्या अनुप्रवेशाची कल्पना करणाऱ्यास ही येथे मोक्षांत त्याचा (क्रियेच्या अनुप्रवेशाचा) संभव नाही असे दाखविले. कसा? जेव्हां तर मोक्ष उत्पाद्य किंवा विकार्य आहे. तेव्हां जरी क्रियेचा अनुप्रवेश युक्त आहे तरी मोक्षाला निश्चित अनित्यत्व येईल. असे (येथे वपूर्वी) 'न कर्मब्रह्मविद्याफलयोर्वैलक्षण्यात्' इत्यादि भाष्याने सांगितले.

पण अनित्यत्वाच्या परिहाराकरिता स्थित मोक्षाचेच आप्यत्व सांगितले जाते? तेही नाही कारण आत्मस्वरूप (मोक्ष)ला क्रियापूर्वक आप्यत्वाची अनुपपत्ति आहे. (आत्म्याहून त्याच्या) व्यतिरेक असतांही आकाशाप्रमाणे त्याला सर्वगतत्वाने नित्यप्राप्तत्व असल्यामुळे त्याची क्रियेच्या अपेक्षेने प्राप्ति नाही. पण विकारांच्या बाहेर असलेल्या "अथ यदतः परो दिवो ज्योतिर्दीप्यते" [छां. ३।१३।७] अशा श्रूयमाण ब्रह्माच्या प्राप्तीकरिता क्रियेची

॥ व्याख्यान ॥

अपेक्षा आहे? नाही कारण विकारदेशीही ब्रह्माला विकारांच्या संस्पर्शाचा अभाव असल्यामुळे अविशेष आहे. पण विकारांच्या बाहेरच ब्रह्म आहे, विकारदेशीं नाही त्याने त्याच्या प्राप्तीकरिता क्रियेची अपेक्षा आहे; मग आत्म्याला ती त्याची प्राप्ति तादात्म्यापत्ति आहे? किंवा स्वतःच्याच रूपानें तेथें अवस्थान आहे? जर पूर्वकल्प असेल तर स्वरूपाचा नाश होईल. जर दुसरा कल्प आहे तर संयोगाला वियोगावसानत्व (वियोगांत शेवट) असल्यामुळे पुनरावृत्ति होईल. वर्तमान मिळाने सांगणारी अपुनरावृत्ति श्रुति तर तशाभावाकरिता प्रमाणान्तराला अपेक्षित करणारी स्वतःप्रमाण होत नाही. मोक्षाला संस्कार्यत्वही संभवत नाही. कारण ठेवल्या जाणाऱ्या व नाहीसे केल्या जाणाऱ्या गुण व दोषांचा तेथे असंभव आहे. पण विद्यमान अशा ब्रह्मात्मस्वरूप मोक्षाची जशी आदर्शाची निघर्षणाने तशी संस्कारानें अभिव्यक्ति केली जाते? तेही नाही कारण आत्म्याला क्रियारहितत्व आहे. अन्याश्रय क्रियेचा तर आत्मा विषय नाही. कारण त्याला प्रत्यक्रूपत्व आहे. पण ईश्वराच्या अभिध्यानाने मळाचा नाश होईल. जसा दीप प्रभेने घटाच्या व्यापनाने तमाचा नाश होतो. सांगतो- काय हा मळ परमार्थसत् आहे? किंवा अविद्यात्मक? जर परमार्थसत् आहे तर स्वाश्रयाच्या विकारावाचून दूर करणे शक्य नाही. विकार तर आत्म्याला संभवत नाही. कारण अविकारित्व श्रुति आहे. जर अविद्यात्मक आहे तर अविद्यावानातील सम्यक् ज्ञानावाचून त्याचा नाश होणार नाही. कारण लोकांत तसे दृष्ट आहे. व दुसऱ्या रीतीने दृष्ट नाही. स्नानादिक्रियेनें जसे तसे संस्कार्यत्वही संभवत नाही कारण अहंकर्त्याच्या इदमंशालाच तेथें संस्कार्यत्व आहे.

ननु ज्ञानं नाम मानसी क्रिया। न वैलक्षण्यात्। क्रिया हि नाम सा यत्र वस्तुस्वरूपनिरपेक्षैव चोद्यते, पुरुषचित्तव्यापाराधीना च। यथा "यस्यै देवतायै हविर्गृहीतं स्यात्तां मनसा ध्यायेद्वषट् करिष्यन्" [ ] इति

॥ व्याख्यान ॥

म्हणून संस्कार्यही मोक्ष नाही. व अन्यही क्रियेच्या अनुप्रवेशाकरिता द्वार नाही. म्हणून ज्ञानाचाच विषय मोक्ष आहे. क्रियेचा नाही.

पण ज्ञानाचाही विषय ब्रह्म नाही असे 'न विदिक्रियाकर्मत्वेन कार्यानुप्रवेशो ब्रह्मणः' असे सांगणाऱ्या भाष्यकारांनी पूर्वी सांगितले? खरें तेथे ज्ञानाप्रत ब्रह्माचे कर्मत्व निषिद्ध आहे. सर्वथा ज्ञानाचा अनुपयोगच सांगितला नाही व तसें असल्यामुळे तेथेंच 'अविद्याकल्पितभेदनिवृत्तिपरत्वात्' इत्यादि भाष्याने उपयोगप्रकार सांगितला आहे.

तरी 'क्रियेच्या गंधमात्राचा अनुप्रवेश येथें उपपन्न होत नाही' असे म्हणूं नका. असें सांगतो- 'ननु ज्ञानं नाम मानसी क्रिया'= पण ज्ञाननामक मानसी क्रिया आहे? उत्तर सांगतात- 'न वैलक्षण्यात्'= नाही कारण ज्ञान व क्रियेंत वैलक्षण्य आहे. कसें वैलक्षण्य? कारण ज्ञानाला अजन्यफलत्व आहे. तें अजन्यफलत्व तर अहंकाराच्या व्याख्यानांत सांगितले आहे. हें दुसरे (कारणापरून) वैलक्षण्य सांगतात- 'क्रिया हि नाम सा'= क्रियानामक तर ती आहे की जी "यत्र"= विषयांत 'वस्तुनिरपेक्षैव चोद्यते'= त्या वस्तूच्या स्वरूपाची (तेथें स्थितीची) अपेक्षा न करिताच प्रेरित केली जाते. 'पुरुषचित्तव्यापाराधीना च' व पुरुषाच्या चित्ताच्या व्यापाराधीन असते. ती 'यथा'= ज्याप्रमाणे "यस्यै देवतायै हविर्गृहीतं स्यात् तां मनसा ध्यायेद्वषट् करिष्यन्"= अध्वर्यूकडून ज्या देवते-

"संध्यां मनसा ध्यायेत्" [ऐ. ब्रा. ३।८।१] इत्येवमादिषु। ध्यानं चिंतनं यद्यपि मानसं तथापि पुरुषेण कर्तुमकर्तुमन्यथा वा कर्तुं शक्यं पुरुषतंत्रत्वात्। ज्ञानं तु प्रमाणजन्यं प्रमाणंच यथाभूतवस्तुविषयम्, अतो ज्ञानं कर्तुमकर्तुमन्यथा वा कर्तुमशक्यं केवलं वस्तुतंत्रमेव तत्, न चोदनातंत्रं नापि पुरुषतंत्रम्, तस्मान्मानसत्वेऽपि ज्ञानस्य महद्वैलक्षण्यम्। यथा च "पुरुषो वाव गौतमाग्निः योषा वाव गौतमाग्निः" [छां. ५।७।८।१] इत्यत्र योषित्पुरुषयोरग्निबुद्धिर्मानसी भवति। केवलचोदनाजन्यत्वात्क्रियैव सा पुरुषतंत्रा च। या तु प्रसिद्धेऽग्नावग्निबुद्धिर्न सा चोदनातंत्रा नापि पुरुषतंत्रा, किं तर्हि प्रत्यक्षविषयवस्तुतंत्रैवेति

॥ व्याख्यान ॥

करिता हविग्रहण केला असेल त्या देवतेला होता वषट् करीत असतां मनाने ध्यान करो इति' अशी 'संध्यां मनसा ध्यायेत् इति च'= व संध्येला मनाने ध्यान करो अशीही. 'एवमादिषु'= इत्यादि वाक्यांत जशी ध्यानक्रिया वस्तु अनपेक्ष व पुरुषतंत्र प्रेरित केली जाते. तशी क्रिया आहे असा अर्थ. पण ध्यानही मानसत्वामुळे ज्ञानाप्रमाणे क्रिया नाही? त्यावर सांगतात- 'ध्यानं चिंतनं यद्यपि मानसं'= ध्यान चिंतन जरी मानस आहे; 'तथापि'= तरी 'पुरुषेण कर्तुमकर्तुमन्यथा वा कर्तुं शक्यम्'= पुरुषाने करण्यास न करण्यास किंवा अन्यथा करण्यास शक्य आहे; 'पुरुषतंत्रत्वात्'= कारण ते पुरुषतंत्र= प्रयत्नसाध्य आहे; म्हणून क्रियाच आहे असा शेष. पूर्वपक्षाच्या अनुमानांत पुरुषप्रयत्नाने साध्यत्व उपाधि आहे असा भाव. ध्यानक्रियेला सांगून त्याहून ज्ञानाचे वैलक्षण्य स्पष्ट करितात- 'ज्ञानं तु प्रमाणजन्यम्'= ज्ञान तर प्रमाणजन्य आहे. 'प्रमाणं च यथाभूतवस्तुविषयम्'= व प्रमाण जशी वस्तु असते तद्विषयक असते. 'अतो ज्ञानं कर्तुमकर्तुमन्यथा वा कर्तुमशक्यम्'= म्हणून ज्ञान करण्यास न करण्यास किंवा अन्यथा करण्यास शक्य नाही. 'केवलं वस्तुतंत्रमेव तत्'= तर ते केवळ वस्तुतंत्रच आहे; 'न चोदनातंत्रम्'= विधीचा विषय नाही.

॥ व्याख्यान ॥

'नापि पुरुषतंत्रम्'= व पुरुषप्रयत्नाधीनही नाही. पुरुषप्रयत्नद्वारा तंत्र= हेतु आहे ज्याला ते पुरुषतंत्र. ज्ञान तसे नाही. म्हणून न चोदनाजन्य नाही तर वस्तुजन्य आहे. वस्तु तर ज्ञानाच्या पूर्वी स्वरूपांत व्यवस्थित असते. म्हणून तत्तंत्र= ती ज्याला हेतु आहे; असें ज्ञान आहे. ती तर ज्ञानाने अन्यथा करणे शक्य नाही. म्हणून वस्तूशी अव्यभिचारामुळे व अपुरुषतंत्रत्वामुळे ध्यानाहून ज्ञानाचा महान भेद आहे असें सांगतात- 'तस्मान्मानसत्वेऽपि ज्ञानस्य महद्वैलक्षण्यम्'= म्हणून मानसत्व असले तरी ध्यानाहून ज्ञानाला मोठे वैलक्षण्य आहे. भेदालाच दुसऱ्या दृष्टान्ताने सांगतात- 'यथा च'= पुनः जशी "पुरुषो वाव गौतमाग्निः योषा वाव गौतमाग्निः"= हे गौतमा पुरुषच अग्नि आहे; हे गौतमा स्त्रीच अग्नि आहे. 'इत्यत्र योषित्पुरुषयोरग्निबुद्धिर्मानसी भवति'= अशी या वाक्यावरून स्त्री व पुरुषांत अग्निबुद्धि मानसी केली जाते. 'केवलचोदनाजन्यत्वात्क्रियैव सा'= केवळ विधिजन्यत्वामुळे ती क्रियाच आहे; 'पुरुषतंत्रा च'= व पुरुषतंत्र आहे. 'या तु प्रसिद्धे अग्नौ अग्निबुद्धिः'= जी तर प्रसिद्ध अग्नीत अग्निबुद्धि आहे; 'न सा चोदनातंत्रा नापि पुरुषतंत्रा'= ती चोदनातंत्र नाही व पुरुषतंत्रही नाही. 'किं तर्हि'= मग कशी? 'प्रत्यक्ष-

ज्ञानमेवैतन्नक्रिया। एवं सर्वप्रमाणविषयवस्तुषु वेदितव्यम्। तत्रैवं सति यथाभूतब्रह्मात्मविषयमपि ज्ञानं न चोदनातंत्रम्।

॥ व्याख्यान ॥

’विषयवस्तुतंत्रैवेति’ = प्रत्यक्षाच्या विषय अशा वस्तूच्या तंत्रानेंच आहे. म्हणून ’ज्ञानमेवैतन्न क्रिया’ = हें ज्ञानच आहे क्रिया नाही. पण प्रत्यक्ष ज्ञान वस्तुजन्य असो अनुमानादिकांत तें कसें? अशी आशंका असतां सांगतात — (किंवा प्रत्यक्ष ज्ञानाचा विषय जन्यतेने वस्तुतंत्रत्व असतां ही शाब्दबोधाला त्याचा अभाव असल्यामुळे विधेय क्रियात्व आहे त्यावर नाही असें सांगतात — ’एवम्’ = असें पुरुषप्रयत्न अजन्यत्व ’सर्वप्रमाणविषयवस्तुषु वेदितव्यम्’ = सर्व अनुमानादि प्रमाणाच्या विषय अशा वस्तूच्या ज्ञानाविषयी जाणावे. कारण तेथेंही ती लिंगादि (शब्दादि) परतंत्र आहेत. तेथें चोदनेचा = विधीचा अनुप्रवेश नाही. पुन: चोदना (= विधि) जन्य ज्ञान अवश्य वस्तु परिच्छेदक नसते. कारण योषिदादिकांत अग्न्यादि दृष्टीचे विधान दिसते. म्हणून वस्तुविषयक ज्ञानाला क्रियात्व मानले तरी चोदनाजन्यत्व नाही. पुरुषतंत्रत्वही नाही. परंतु प्रमाण वस्तु परतंत्रत्व आहे. असें असतां अग्नींत अग्नि ज्ञाना प्रमाणे त्याला सम्यक् ज्ञानत्वाची उपपत्ति होते. ’तत्रैवं सति’ = लोकांत ज्ञानाला अविधेयत्व असून यथाभूत वस्तुविषयत्व असतां ’यथाभूतब्रह्मात्मविषयमपि विज्ञानम्’ = जसें आहे तसें = यथार्थ ब्रह्मात्मविषयक ज्ञानही ’न चोदनातंत्रम्’ = चोदनाजन्य नाही. म्हणून विधीचा तेथें अवकाश नाही. असा अर्थ. ’यथाभूत’ = अबाधित. पण "आत्मानं पश्येत" [ ] ’ब्रह्म त्वं विद्धि’ [के. १।५] "आत्मा वाऽरे द्रष्टव्यः" [बृ. २।४।५] असें ब्रह्माच्या

तद्विषये लिङ्गादयः श्रूयमाणा अप्यनियोज्यविषयत्वात्कुंठीभवन्त्युपलादिषु प्रयुक्तक्षुरतैक्ष्ण्यादिवत् अहेयानुपादेयवस्तुविषयत्वात्। किमर्थानि तर्हि "आत्मा वाऽरे द्रष्टव्यः श्रोतव्यः" [बृ. २।४।५] इत्यादीनि

॥ व्याख्यान ॥

विज्ञानांत विधायक लिङ् लोट् तव्य प्रत्यय श्रुत होतात. म्हणून ज्ञान विधेय आहे. त्यावर सांगतात — ’तद्विषये’ = त्या केवळ प्रमाणवस्तुपरतंत्र ज्ञानरूप विषयांत ’लिङादयः श्रूयमाणा अपि’ = लिङादिक विधिप्रत्यय श्रूयमाण असले तरी ’अनियोज्यविषयत्वात्’ = पुरुष प्रयत्नाने असाध्य किंवा नियोज्य शून्य ज्ञान त्यांचा विषय असल्यामुळे किंवा ’हा माझा नियोग आहे’ असा जाणणारा नियोज्य वा विषय ज्या विधींना नाही असे असल्यामुळे ’उपलादिषु प्रयुक्त क्षुरतैक्ष्ण्यादिवत्’ = पाषाणादिकांत प्रयुक्त सुऱ्याच्या तैक्ष्ण्यादिका प्रमाणे अकिंचित्करत्वामुळे ’कुंठीभवन्ति’ = कुंठित होतात = पुरुषाला प्रवृत्त करण्यास असमर्थ होतात असा अर्थ. मग ज्ञेय ब्रह्माचे विधान असो! त्यावर नाही असें सांगतात — ’अहेयानुपादेयवस्तुविषयत्वात्’ = कारण ब्रह्माला आत्मत्वामुळे विधेयत्व नाही. असा अर्थ. उदासीन वस्तुविषयत्वामुळेही ज्ञान विधेय नाही कारण प्रवृत्त्यादि फलाचा अभाव आहे. किंवा असा अर्थ. विधिपदांच्या गतीला विचारतो — ’किमर्थानि तर्हि "आत्मा वाऽरे द्रष्टव्यः श्रोतव्यः" इत्यादीनि विधिच्छायावचनानि" — मग ’अरे आत्मा दर्शन करण्यास श्रवण करण्यास योग्य आहे’ इत्यादिक प्रसिद्ध यागादि विधितुल्य वचने कोण्या प्रयोजनाकरिता आहेत? विधीच्या प्रत्ययांनी आत्मज्ञान परम पुरुषार्थाचे साधन आहे असे स्तवन केले जाते व स्तुतीच्या योगाने आत्यन्तिक इष्ट हेतुत्व भ्रांतीने जी विषयांत प्रवृत्ति, आत्म्याच्या

विधिच्छाया वचनानि। स्वाभाविक प्रवृत्ति विषय विमुखीकरणार्थानीति ब्रूमः। यो हि बहिर्मुखः प्रवर्तते पुरुषः इष्टं मे भूयादनिष्टं मा भूदिति नच तत्रात्यन्तिकं पुरुषार्थं लभते। तमात्यन्तिक पुरुषार्थं वांछिनं स्वाभाविक कार्यकरण संघात प्रवृत्तिगोचराद्विमुखीकृत्य प्रत्यगात्मस्रोतस्तया प्रवर्तयन्ति "आत्मा वारे द्रष्टव्यः" इत्यादीनि।

॥ व्याख्यान ॥

श्रवणादिकांस प्रतिबंध करणारी, तिची निवृत्ति ज्यांचे फळ आहे अशी विधिपदें आहेत असे सांगतात- 'स्वाभाविक प्रवृत्ति विषय विमुखीकरणार्थानीति ब्रूमः' = स्वाभाविक प्रवृत्तीचे विषय अशा स्रक् चंदनादिकांपासून विमुखी करण्याकरितां आहेत असें आम्ही म्हणतों. याचेच विवरण करितात- 'यो हि बहिर्मुखः प्रवर्तते पुरुषः इष्टं मे भूयादनिष्टं मा भूदिति' = जो तर बहिर्मुख पुरुष इष्ट मला प्राप्त होवे. अनिष्ट होऊं नये' अशा रीतीनें विषयांत प्रवृत्त होतो. 'नच तत्रात्यन्तिकं पुरुषार्थं लभते' = तेथें तर आत्यन्तिक पुरुषार्थाला प्राप्त होत नाही. 'तमात्यन्तिक पुरुषार्थं वांछिनं' = त्या आत्यन्तिक पुरुषार्थाची इच्छा करणाऱ्या अधिकाऱ्याला 'स्वाभाविक कार्यकरणसंघातगोचरात्' = स्वाभाविक जो कार्यकरणसंघाताची प्रवृत्ति तिचे जे शब्दादिक विषय त्यांच्यापासून 'विमुखीकृत्य' = विमुख करून 'प्रत्यगात्मस्रोतस्तया' = प्रत्यगात्म्याकडे चित्तवृत्तीच्या प्रवाहत्वानें 'आत्मा वाऽरे द्रष्टव्यः श्रोतव्यः इत्यादीनि प्रवर्तयन्ति' = अरे आत्मादर्शन करण्यास योग्य आहे. इत्यादि वाक्यें प्रवृत्त करितात.

॥ व्याख्यान ॥

म्हणून 'द्रष्टव्यः' इत्यादि वाक्यें अर्थवादत्वेनें आत्मज्ञानाच्या स्तावकत्वानें त्याप्रत उन्मुखीकरणामुळे व सामर्थ्यानें सिद्ध बहिर्मुखतेच्या निरोधामुळे विधि कार्य लेशाच्या विद्यमानत्वामुळे विधिप्रमाणे लक्षित होतात. तसेंच श्रवण म्हणजे ब्रह्मात्म्याच्या अपरोक्ष ज्ञानाकरितां वेदान्तवाक्यांचा विचार व शारीरिक शास्त्राचे श्रवण. मनन- म्हणजे वस्तुनिष्ठ वाक्याला अपेक्षित दुंदुभ्यादि दृष्टान्त व (ब्रह्मापासून जगताचे) जन्मस्थिति लय व वाचारंभणत्वादि युक्ति. अर्थवादानें वस्तूचे अनुसंधान व वाक्यार्थाला अविरोधि अनुमानानें तिचे अनुसंधान. निदिध्यासन म्हणजे मननानें पुष्ट केलेल्या वाक्यार्थाच्या विषयांत चित्ताचा स्थिरीभाव. कारण उपासना पर्याय विधेयाला निष्फलत्व आहे. दर्शन म्हणजे श्रवणादिकांनंतर वाक्यार्थांत स्थैर्यामुळे निरस्तसमस्त- प्रपंचावभास अशा विज्ञानघन आत्म्याच्या एकत्वाचा अनुभव. पुनः येथें (आत्म्यांत) अर्थवाद कसा? येथें हे प्रस्तुत आहे कीं- क्रियाकारक फलात्मक संसारापासून विरक्त मुमुक्षु मैत्रेयीला मोक्षसाधन आत्मज्ञानाला प्रतिपादन करणारे "नवाऽरे पत्युः कामाय पतिः प्रियो भवति" [बृ·२।४।५] असे पत्यादिकांचे ईप्सितत्व प्रतिषेध करून आत्म्याला इच्छितत्व याज्ञवल्क्य सांगतात. पण येथें आत्म्याचे इच्छितत्व सांगितलेंच जात नाही परंतु "आत्मनस्तु कामाय पतिः प्रियो भवति" = आपल्याच कामाकरितां पति प्रिय होतो. असे आत्मार्थत्वेनें पत्यादिकांचे ईप्सितत्व सांगितलें जातें? असें नाही कारण ते पत्यादिक अनिष्ट असतां त्याच्याकरितां इष्ट असत नाही. म्हणून या उपायानें आत्म्यालाच ईप्सितत्व सांगितलें जातें. व जर ईप्सित आहे तर 'द्रष्टव्यः श्रोतव्यः'

तस्यात्मान्वेषणाय प्रवृत्तस्याहेयमनुपादेयं चात्मतत्त्वमुपदिश्यते। "इदं सर्वं यदयमात्मा" [बृ.२.४.६] "यत्रत्वस्य सर्वमात्मैवाभूत् तत्केन कं पश्येत्…केन कं विजानीयात्, विज्ञातारमरे केन विजानीयात्" [बृ.४.५.१५] "अयमात्मा ब्रह्म" [बृ.२.५.१९] इत्यादिभिः।

॥ व्याख्यान ॥

असा हा अर्थवाद आहे. हें सर्व प्रथमसूत्रांतच सूचित असून भाष्यांत विस्तृतही आहे. पुनः हा ('द्रष्टव्यः' येथील) 'कृत्य' प्रत्यय विधिविषयक नाहींच. तर कसा आहे? तर "अर्हे कृत्य तृचश्च" [पा.सू. ३.३.१६९] या सूत्रावरून योग्य अर्थी आहे. याने "आत्मेत्येवोपासीत" [बृ.१.४.७] "आत्मानमेव लोकमुपासीत" [बृ.१.४.१५] इत्यादि विधिच्छाया वाक्यें व्याख्यात जाणावीत. म्हणून हानोपादानशून्य आत्मज्ञानापासूनच कृतकृत्यता प्रतीत होते कारण श्रुति स्मृति वादही तसेंच प्रस्थित आहेत असें सांगतात. किंवा श्रवणाच्या स्वरूपाला सांगतात – 'तस्यात्मान्वेषणाय प्रवृत्तस्य' = त्या आत्म्याच्या शोधा (ज्ञाना) करितां प्रवृत्त झालेल्या अधिकाऱ्याला 'अहेयमनुपादेयं चात्मतत्त्वमुपदिश्यते' = आत्मस्वरूपत्वामुळें अत्याज्य व अग्राह्य आत्मतत्त्व उपदेशिलें जातें. 'इदं सर्वं यदयमात्मा' = जें हें सर्व जगत तें अनात्म्यांच्या बाधानें हा आत्मा आहे. 'यत्र त्वस्य सर्वमात्मैवाभूत्तत्केन कं पश्येत्' = ज्या विद्यावस्थेंत याला सर्व आत्माच आहे त्या अवस्थेंत तो कोण्या करणानें कोण्या विषयाला पाहील? 'केन कं विजानीयात्' = कोण्या करणानें कोणाला जाणील? 'विज्ञातारमरे केन विजानीयात्' = हे मैत्रेयी जो सर्वांना जाणतो त्याला कशानें जाणावें? 'अयमात्मा

यद्यप्यकर्तव्यप्रधानमात्मज्ञानं हानोपादानाय न भवतीति तत्तथैवाभ्युपगम्यते। अलंकारो ह्ययमस्माकं यद्ब्रह्मात्मावगतौ सत्यां सर्वकर्तव्यताहानिः कृतकृत्यता चेति। तथा च श्रुतिः – "आत्मानं चेद्विजानीयादयमस्मीति पूरुषः। किमिच्छन्कस्य कामाय शरीरम-

॥ व्याख्यान ॥

ब्रह्म' इत्यादिभिः' = हा प्रत्यगात्मा ब्रह्म आहे इत्यादिकांनीं. याचा 'उपदिश्यते' = उपदेशिला जातो या मागील क्रियेशीं संबंध. 'यद्यपि अकर्तव्यप्रधानमात्मज्ञानं हानोपादानाय न भवतीति' = जेंही 'कर्तव्य विधींत अनुप्रवेश नसतां येथें अकर्तव्यप्रधान आत्मज्ञान असतां त्यागाकरितां किंवा ग्रहणाकरितां कारणीभूत होत नाहीं असें लढे' 'तत्तथैवाभ्युपगम्यते' = तें तसेंच मानलें जातें. 'अलंकारो हि अयमस्माकं यद्ब्रह्मात्मावगतौ सत्याम्' = जें ब्रह्मात्मैक्य ज्ञान झालें असतां 'सर्वकर्तव्यताहानिः कृतकृत्यता च' = सर्व कर्तव्यतेची हानि व कृतकृत्यता होते. 'इति' = असा. आत्मज्ञानाच्या सर्वकर्तव्याभावविषयीं श्रुतिप्रमाणाला सांगतात – 'तथा च श्रुतिः' = तशीच श्रुति आहे कीं 'आत्मानं चेद्विजानीयादयमस्मीति पूरुषः।' = हा स्वयंप्रकाशानंद परमात्मा मी आहे असें जर कोणी पुरुष आपल्याला जाणील "किमिच्छन्कस्य कामाय शरीरमनुसंज्वरेत्" = तेव्हां कोणत्या फळाची इच्छा करून कोण्या भोक्त्याच्या प्रीतिकरितां तप्यमान शरीराच्या अनुसरून तप्त होईल? अर्थात् भोक्तृभोग्यद्वैताच्या अभावामुळें हा आत्म्याप्रमाणें कृतकृत्य होतो असा अभिप्राय. ज्ञानाच्या दौर्लभ्या करितां 'चेत्' शब्द आहे. 'एतद्बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात्कृतकृत्यश्च भारत' = हे भारता ह्या गुह्यतम

नुसंज्वरेत्॥" [बृ.४।४।१२] इति । "एतद्बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात्कृतकृत्यश्च भारत ।" [भ.गी.१५।२०] इतिच स्मृतिः । तस्मान्न प्रतिपत्तिविधिविषयतया ब्रह्मणः समर्पणम् ।

यदपि केचिदाहुः — प्रवृत्तिविधितच्छेषव्यतिरेकेण केवलवस्तु

॥ व्याख्यान ॥

तत्वाला जो जाणतो तो ज्ञानी व कृतकृत्य होतो.' इतिच स्मृतिः' = अशी स्मृतिही आहे. वृत्तिकाराच्या मताच्या निरासाचा उपसंहार करितात - 'तस्मात्' = म्हणून 'प्रतिपत्तिविधिविषयतया' = उपासनाविधीच्या अंगत्वाने 'न ब्रह्मणः समर्पणम्' = वेदान्तांत ब्रह्माचे कथन नाही. याचा हा अर्थ — प्रमाणात्मक किंवा कल्पित इतर ज्ञानव्यापाराशी विधीयमानत्वाने ब्रह्माचा संस्पर्श नाही — असा.

प्राभाकराने सांगितलेल्याचा उपन्यास करितात- 'यदपि केचिदाहुः' = जेही कोणी म्हणतात की - 'प्रवृत्तिविधितच्छेषव्यतिरेकेण केवलवस्तुवादी वेदभागो नास्तीति' = प्रवृत्तिविधि व त्याच्या अंगत्वावाचून केवळ वस्तुला सांगणारा वेदभाग नाही असे. कर्ता आत्मा लोकसिद्धत्वामुळे वेदान्ताचा अर्थ नाही त्याच्याहून अन्य ब्रह्म नाहीच कारण वेदाचा कार्यपरत्वाने त्याविषयीं प्रमाणाचा अभाव आहे असा अर्थ.

किंवा याचा हा अर्थ - जर स्वरूपमात्रनिष्ठ हा वेदभाग आहे तर हें पूर्वोक्त, प्रतिष्ठेला प्राप्त होते (परंतु ते निष्फळ आहे) जर नाही तर क्रियानुप्रवेशाहून व्यतिरिक्त असलेला अवेदार्थच होईल (म्हणून क्रियेच्या अंगत्वानेच त्याला प्रामाण्य मानले पाहिजे) असा

(कर्ता आत्मा या पहिल्या विकल्पाचे उत्तर सांगतात.) प्रमाणाभाव असिद्ध आहे असें

वादी वेदभागो नास्तीति, तन्न औपनिषदस्य पुरुषस्यानन्यशेषत्वात् । योऽसावुपनिषत्स्वेवाधिगतः पुरुषोऽसंसारी ब्रह्म उत्पत्त्यादिचतुर्विध

सांगतात- 'तन्न' = ते नाही 'औपनिषदस्य पुरुषस्य अनन्यशेषत्वात्' = कारण उपनिषदांत सांगितलेल्या पुरुषाला कर्मांगत्व नाही. उपनिषदैकवेद्य अज्ञात फलरूप आत्म्याला अकार्यशेषत्व असल्यामुळे संपूर्ण वेदाला कार्यपरत्व असिद्ध आहे; असें तर म्हणता येणार नाही कीं - श्रोत्याच्या प्रवृत्तिनिवृत्ति लिंगावरून त्याला हेतु कार्य बोधाचे अनुमान करून व वक्त्याच्या वाक्याला कार्यपरत्वाचा निश्चय करून वाक्यातील पदांच्या कार्यान्वित अर्थात शक्तिग्रह होत असल्यामुळे सिद्ध पदार्थाला वाक्यार्थत्व नाही असे. कारण 'तुला पुत्र झाला' असे वाक्य श्रवण करणाऱ्या पित्याच्या हर्षलिंगाने इष्ट पुत्रजन्माचे अनुमान करून, पुत्रादि पदांच्या सिद्धांत संगतिग्रह होत असल्यामुळे कार्यान्वित अर्थापेक्षा अन्वित अर्थात पदांची शक्ति आहे अशा अंगीकारांत लाघव असल्यामुळे सिद्धार्थाला ही वाक्यार्थत्व आहे. असा अर्थ. पुनः काय ब्रह्माच्या नास्तित्वामुळेच समस्तवेदांना कार्यपरत्व आहे? किंवा ~~प्रमाणान्तराच्या विरोध असल्या~~ वेदान्तांत त्याच्या अभावामुळे? अथवा कार्यशेषत्वामुळे? किंवा लोकांत सिद्धत्वामुळे? किंवा प्रमाणान्तराच्या विरोधामुळे? त्यांत पहिल्या तीन पक्षांचा निरास करितात- 'योऽसौ' = जो हा 'उपनिषत्स्वेवाधिगतः पुरुषो असंसारी ब्रह्म' = असंसारी ब्रह्म पुरुष उपनिषदांवरूनच कळतो. 'उत्पत्त्यादि चतुर्विध द्रव्यविलक्षणः' = उत्पन्न होणाऱ्या इत्यादि चतुर्विध द्रव्याहून विलक्षण. 'स्वप्रकरणस्थो अनन्यशेषः' = स्वप्रकरणांत असलेला (म्हणूनच) अन्य (= क्रिया) शेष नसलेला. 'नासौ ~~नाधिगम्य~~-

द्रव्यविलक्षणः स्वप्रकरणस्थो नान्यशेषः, नासौ नास्ति नाधिगम्यत इति वा शक्यं वदितुम्, "स एष नेति नेतीत्यात्मा" [बृ. ३।९।२६] इति आत्मशब्दात्, आत्मनश्च प्रत्याख्यातुमशक्यत्वात्, य एव निराकर्ता तस्यैवात्मत्वप्रसंगात्। नन्वात्माऽहंप्रत्ययविषयत्वादुपनिषत्स्वेव विज्ञायत इत्यनुपपन्नम्। न। तत्साक्षित्वेन प्रत्युक्तत्वात्।

'नास्ति नाधिगम्यत इति वा शक्यं वदितुम्'= हा नाही किंवा कळत नाही असे म्हणणे तर शक्य नाही. अन्यशेष नसण्याकरितां असंसारी इत्यादि विशेषणे आहेत. नास्तित्वाच्या अभावा विषयी वेदान्तप्रमाणांनीं सिद्धत्व हेतूला सांगून आत्मत्व या दुसऱ्या हेतूला सांगतात- 'स एष नेति नेतीत्यात्मा' इति आत्मशब्दात्= ('नेति नेति' येथील इति शब्द 'हे' अर्थी आहे.) कारण 'हें नाहीं हें नाहीं' अशा रीतीने सर्व दृश्याच्या निषेधानें जो आत्मा उपदिष्ट आहे; तो हा असा त्याविषयीं आत्मशब्द आहे; 'आत्मनश्च प्रत्याख्यातुमशक्यत्वात्'= आत्म्याचा तर निराकरण करणे शक्य नाही. 'य एव निराकर्ता तस्यैवात्मत्वप्रसंगात्'= कारण जो निराकर्ता आहे त्यालाच आत्मत्व प्रसंग येतो. चवथ्या पक्षाची शंका घेतात- 'नन्वात्मा अहंप्रत्ययविषयत्वादुपनिषत्स्वेव विज्ञायत इत्यनुपपन्नम्'= पण आत्मा अहंप्रत्ययाचा विषय असल्यामुळे उपनिषदांवरूनच कळतो हें अनुपपन्न आहे?! आत्म्याला अहंकारादि साक्षित्वानें अहंप्रत्ययविषयत्वाच्या निरास केला असल्यामुळे त्याला लोकसिद्धत्व नाही असें सांगतात- 'न'= नाही. 'तत्साक्षित्वेन प्रत्युक्तत्वात्'= कारण अहंकाराच्या साक्षित्वानें आत्म्याच्या अहंप्रत्ययविषयत्वाच्या

न ह्यहंप्रत्ययविषयकर्तृव्यतिरेकेण तत्साक्षी सर्वभूतस्थः समः एकः कूटस्थनित्यः पुरुषो विधिकाण्डे तर्कसमये वा केनचिदधिगतः सर्वस्यात्मा, अतः स न केनचित्प्रत्याख्यातुं शक्यो विधिशेषत्वं वा नेतुम्। आत्म-

---

॥ व्याख्यान ॥

निरास केले~~असल्यामुळे~~ला आहे. ज्याला शास्त्रकार देखील जाणत नाहीत त्याचे अलौकिकत्व काय सांगावे? असें सांगतात- 'नहि अहंप्रत्ययविषयकर्तृव्यतिरेकेण'= अहंप्रत्ययाच्या विषय अशा कर्त्याहून भिन्नत्वाने 'तत्साक्षी'= त्याचा साक्षी 'सर्वभूतस्थः समः एकः'= सर्वभूतांत स्थित असलेला 'समः'= तारतम्यवर्जित एक 'कूटस्थः नित्यः'= निर्विकार नित्य 'पुरुषः'= पूर्ण 'विधिकाण्डे तर्कसमये वा'= पूर्वमीमांसेत किंवा तर्कशास्त्रांत 'नहि केनचिदधिगतः सर्वस्यात्मा'= निश्चयें करून सर्वांचा आत्मा कोणाकडून जाणला गेला नाही. त्या त्या मतांत आत्म्याच्या न जाणण्याला सूचित करणारी ही विशेषणे जाणावीत. (प्रमाणान्तराच्या विरोधामुळे या) पाचव्या पक्षाचा निरास करितात- 'अतः'= म्हणून 'स न केनचित्'= तो कोणत्याही वादीकडून प्रमाणाने किंवा युक्तीने 'न प्रत्याख्यातुं शक्यः'= निरास करण्यास शक्य नाही. त्यांच्याकडून न जाणला गेल्यामुळे दुसऱ्या प्रमाणांच्या विरोध नाही असा भाव. पण 'साक्षी कर्मांग आहे त्याला चेतनत्व असल्यामुळे कर्त्या प्रमाणे'? त्यावर सांगतात- 'विधिशेषत्वं वा नेतुम्'= किंवा विधीच्या शेषत्वाला नेण्यास शक्य नाही. अज्ञातसाक्षीचा उपयोग नसल्यामुळे व ज्ञाताला घातकत्व असल्यामुळे कर्मशेषत्व नाही. असा अर्थ. साक्षीला सर्वांचे शेषित्व असल्यामुळे व अत्याज्य व अग्राह्यत्व असल्यामुळे कर्मशेषत्व नाही. असें सांगतात- 'आत्मत्वादेव च सर्वेषाम्'= सर्वांच्या आत्मत्वामुळे 'न हेयो नाप्युपादेयः'=

त्वादेव च सर्वेषां न हेयो नाप्युपादेयः। सर्वं हि विनश्यद्विकारजातं पुरुषान्तं विनश्यति। पुरुषो हि विनाशहेतुत्वाभावादविनाशी, विक्रियाहेतुत्वाभावाच्च कूटस्थनित्यः। अत एव नित्यशुद्धबुद्धमुक्तस्वभावः। तस्मात् "पुरुषान्न परं किंचित् साकाष्ठा सा परागतिः" [क॰ १।३।११] "तं त्वौपनिषदं पुरुषं

॥ व्याख्यान ॥

= त्याज्य नाही व ग्राह्यही नाही. अनित्यत्वाने आत्म्याच्या हेयत्वाची आशंका असतां सांगतात- 'सर्वं हि विनश्यद्विकारजातम्' = सर्वच विनाश होणारे विकारजात 'पुरुषान्तं विनश्यति' = पुरुषापर्यंतच विनाशाला प्राप्त होते. 'पुरुषो हि विनाशहेतुत्वाभावादविनाशी' = पुरुष तर विनाशाच्या हेतुत्वाचा अभाव असल्यामुळे अविनाशी आहे. परिणामित्वाने हेयत्वाची आशंका असता सांगतात- 'विक्रियाहेतुत्वाभावाच्च कूटस्थनित्यः' = व विक्रियाहेतुत्वाचा अभाव असल्यामुळे तो कूटस्थनित्य आहे. उपादेय (ग्राह्य) त्वाचा निरास करितात- 'अत एव नित्यशुद्धबुद्धमुक्तस्वभावः' = म्हणूनच = निर्विकारित्वामुळेच नित्यशुद्धबुद्धमुक्तस्वभाव आहे. उपादेयत्व तर साध्याला असते आत्म्याला नसते. कारण त्याला नित्यसिद्धत्व आहे असा अर्थ. पण परा (परब्रह्मा-) च्या प्राप्तीकरिता आत्मा हेय आहे? त्यावर सांगतात- 'तस्मात्' = म्हणून "पुरुषान्न परं किंचित्साकाष्ठा सापरागतिः" पुरुषाच्या पलीकडे कांही नाही. ती सर्वांची मर्यादा आहे. ती परमगति आहे. अशा रीतीने आत्म्याला अनन्यशेषत्व असल्यामुळे, अबाध्यत्व असल्यामुळे, अपूर्वत्व असल्यामुळे, व वेदान्तांत स्पष्ट भानत्व असल्यामुळे वेदान्तांकडूनच वेद्यत्व सांगितले. त्याविषयीं श्रुतीच सांगतात- "तं त्वौपनिषदं पुरुषं पृच्छामि" = त्या सकारण हिरण्यगर्भ-

पृच्छामि" [बृ॰ ३।९।२६] इति चौपनिषदत्व विशेषणं पुरुषस्योपनिषत्सु प्राधान्येन प्रकाश्यमानत्व उपपद्यते। अतो भूतवस्तुपरो वेदभागो नास्तीति वचनं साहसमात्रम्.

॥ व्याख्यान ॥

त्या अधिष्ठान अशा औपनिषत्पुरुषाला = पूर्णाला हे शाकल्या तुला मी विचारतो. 'इति चौपनिषदत्व विशेषणम्' = असें तर औपनिषदत्व विशेषण 'पुरुषस्योपनिषत्सु प्राधान्येन प्रकाश्यमानत्वे उपपद्यते' = पुरुषाचा उपनिषदांत प्राधान्याने प्रकाश्यमानत्व असतां उपपन्न होते. प्राभाकर मताच्या निरासाचा उपसंहार करितात- 'अतो भूतवस्तुपरो वेदभागो नास्तीति वचनं साहसमात्रम्' = म्हणून = उक्त हेतूनीं व श्रुतीने वेदान्तांना आत्मवस्तुपरत्व निश्चित होत असल्यामुळे सिद्धवस्तुपर वेदभाग नाही हें वचन साहस (= अविचार) मात्र आहे.

'किंवा याचा हा अर्थ' इत्यादिकांनीं पूर्वी जो आक्षेप सांगितला त्याच्या उत्तराला सांगतात- 'तन्न औपनिषदस्य पुरुषस्य अनन्यशेषत्वात्' असे जे उत्तर सांगितले ते वस्तुसंग्रह वाक्य आहे. त्याचा विस्तार "योसावुपनिषत्स्वेवाधिगतः" इत्यादि आहे. त्याचा हा अर्थ — जो हा अहंप्रत्ययाचा विषय किंवा संबंधी आत्म्याहून अतिरिक्त सम एक सर्वभूतांत असलेला, अहंकर्त्याचाही साक्षीभूत, तो कोण्या प्रमाणाने सिद्ध नाही की ज्याने क्रियाशेषतेला प्राप्त केला जाईल. प्रमाणान्तराने असिद्ध तर क्रियासंबंधित्वाने उपदेश करण्यास शक्य नाही. तो प्रतीत होत नाही असे म्हणणे तर युक्त नाही. कारण त्याला प्रतिपादक उपनिषत् पदसमन्वय दाखविला आहे. म्हणूनच अनन्यविषयत्वामुळें औपनिष-

यद्यपि शास्त्रतात्पर्यविदामनुक्रमणम्- "दृष्टो हि तस्यार्थः कर्मावबोधनम्" [पू.मी.भा.१।१।१] इत्येवमादि, तद्धर्मजिज्ञासाविषयत्वा-

---

॥ व्याख्यान ॥

इत्व विशेषण आहे. ते तर वेदान्तांना ब्रह्मपरत्व असतां समर्थ होते. हा प्रतीत होत असतांही शुक्तिरजताप्रमाणें मिथ्या आहे, असें म्हणणे तर शक्य नाही. कारण बाधाचा अभाव आहे. याही कारणामुळें मिथ्या आहे असे म्हणणे शक्य नाही. कारण त्या औपनिषद् पुरुषांत "स एष नेति नेत्यात्मा" [बृ.३।८।२६] असा (सर्वांच्या निषेधानें आत्मशब्दप्रयोग) आहे व आत्म्याला अनिराकार्यत्व आहे. कारण, जो निराकर्ता त्यालाच आत्मत्व प्रसंग आहे. त्याचा कदाचित् अभावही संभवत नाही. कारण तो अभावाच्या हेतूंचा अविषय आहे. निर्हेतुक तर विनाश नसतो. कारण चितीच्या एकरूपावभासानें क्षणभंगाचें निराकरण केलेलें आहे. म्हणून अवच्छेदत्रयशून्य असा तो स्वयंप्रकाशमान असतां सर्वांचा पुरुषावधि विनाश आहे. कारण "सा काष्ठा सा परा गतिः" [क.१।३।११] अशी श्रुति आहे. म्हणून अशा रीतीनें प्रमाणान्तराचा अविषय असा असंसारी आत्मा वेदान्तवाक्यसमन्वयावरून प्रतीयमान असतां तत्पर वेदभाग कसा असणार नाही? किंवा प्रतीयमान निराकरण कसा केल्या जाईल?- असा.

पूर्वी सांगितले त्याचा अनुवाद करितात- 'यद्यपि शास्त्रतात्पर्यविदामनुक्रमणम्'- जेही शास्त्रतात्पर्यवेत्त्यांचे वेदार्थसंग्राहक वाक्यजात आहे-

---

॥ व्याख्यान ॥

'दृष्टो हि तस्यार्थः कर्मावबोधनम्'- दृष्ट तर अध्ययनविधीनें विहित वेदाचा कर्मावबोधन अर्थ आहे.' 'इत्येवमादि'- असेच इत्यादि. ते वेदान्त्या नैरर्थक्याची शंका असतां त्याच्या अर्थवत्तापर हें भाष्य आहे. तेथें 'फलवत् अर्थावबोधनम्' असें वक्तव्य असतां धर्मविचाराचा आरंभ असल्यामुळें 'कर्मावबोधनम्' असें म्हटलें. एवढ्यानें वेदान्तांच्या ब्रह्मपरत्वाचा निरास होत नाही. म्हणूनच सूत्रकार 'अर्थे अनुपलब्धे तत्प्रमाणम्' [जै.सू.१।१।५] असें धर्माला फलवत् अज्ञातत्वानेंच वेदार्थता दाखवितात. ती तर ब्रह्माला अविशिष्ट आहे. म्हणून वृद्धवाक्याशीं विरोध नाही असें सांगतात- 'तत्' तें 'धर्मजिज्ञासाविषयत्वात्'- धर्मजिज्ञासेच्या विषयत्वामुळें 'विधिप्रतिषेधाभिप्रायं द्रष्टव्यम्'- विधिप्रतिषेधशास्त्राच्या अभिप्रायाचे आहे असें जाणावें. विधिप्रतिषेधशास्त्रालाही निवृत्तिकार्यपरत्व आहे. म्हणून तें सूत्रभाष्यवाक्यजात कर्मकाण्डाच्या कार्यपरत्वाच्या अभिप्रायाचे आहे असा अर्थ. वस्तुतः तर लिङ्, अर्थात कर्मकाण्डाचें तात्पर्य आहे. लिङ् येथे लोकांत प्रवर्तक ज्ञानाच्या विषयत्वानें कल्पिलेले यागादि क्रियेतील इष्टसाधनत्वच आहे. क्रियेहून अतिरिक्त कार्य (= अपूर्व) नाही. कारण त्याला कूर्माच्या लोमाप्रमाणे अप्रसिद्धत्व आहे. म्हणून त्यालाही = कर्मकाण्डालाही दुसऱ्याला अभिमत कार्याहून विलक्षण सिद्धांत प्रामाण्य आहे. मग ज्ञानकाण्डाला आहे हें काय सांगावे? पुनः 'वेदान्त सिद्धवस्तुपर आहेत, त्यांना फलवत्भूतशब्दत्व-

द्विधि प्रतिषेधशास्त्राभिप्रायं द्रष्टव्यम्। अपिच "आम्नायस्य क्रियार्थत्वादानर्थक्यमतदर्थानाम्" [जै० १।२।१] इत्येतदेकान्तेनाभ्युपगच्छतां भूतोपदेशानर्थक्यप्रसंगः। प्रवृत्तिनिवृत्तिव्यतिरेकेण। भूतं चेद्वस्तूपदिशति भव्यार्थत्वेन, कूटस्थ-

---

॥ व्याख्यान ॥

असल्यामुळें दध्यादिशब्दप्रमाणे' असें सांगतात- 'अपिच'= पुनः हीं. काय अक्रियार्थक शब्दांचे आनर्थक्य काय अभिधेया(अर्था)भाव आहे? किंवा फलाभाव? पहिल्या पक्षीं सांगतात- 'आम्नायस्य क्रियार्थत्वादानर्थक्यमतदर्थानाम्'= वेदाला क्रियार्थत्व असल्यामुळें त्या अर्थाला न सांगणाऱ्या पदांना अर्थशून्यत्व आहे. 'इति'= असें 'एतत्'= हें 'एकान्तेन अभ्युपगच्छताम्'= नियमानें मानणाऱ्यांना 'भूतोपदेशानर्थक्यप्रसंगः'- 'सोमेन यजेत' 'दध्ना जुहोति' इत्यादि वाक्यांत दधि सोमादि भूतवाचक शब्दांना अर्थशून्यत्व प्रसंग येईल. पण अर्थराहित्य कोणी सांगितलें? अशी आशंका असतां सांगतात- 'प्रवृत्ति निवृत्ति व्यतिरेकेण'= प्रवृत्तिनिवृत्तिरूप कार्याहून भिन्नतेने 'भव्यार्थत्वेन भूतं चेद्वस्तु उपदिशति'= कार्यशेषत्वानें जर दध्यादि शब्द उपदेशित करितो. तर 'कूटस्थनित्यं भूतं नोपदिशतीति को हेतुः'= सत्यादि शब्द निर्विकार नित्यभूत ब्रह्मात्मैक्य वस्तूला सांगत नाहीत याविषयीं कोणता हेतु? काय कूटस्थाला अक्रियात्व असल्यामुळें? किंवा क्रियाशेषत्व नसल्यामुळें? असा प्रश्न. पण

नित्यं भूतं नोपदिशतीति को हेतुः? नहि भूतमुपदिश्यमानं क्रिया भवति। अक्रियात्वेऽपि भूतस्य क्रियासाधनत्वात्क्रियार्थ एव भूतोपदेश इति चेत्। नैष दोषः। क्रियार्थत्वेऽपि क्रियानिर्वर्तनशक्ति-

---

॥ व्याख्यान ॥

दध्यादिकाला कार्यांत अन्वयितेनें कार्यत्व असल्यामुळें त्याचा उपदेश आहे. कूटस्थाचा अकार्यत्वामुळें नाही? अशी पहिल्या पक्षाची आशंका घेऊन निरास करितात- 'नहि भूतमुपदिश्यमानं क्रिया भवति'= सिद्ध तर कार्याकरिता उपदेशिलें जाणारें क्रिया होत नाही. दध्यादिकाला क्रियात्व असतां कार्याहून अभेद असल्यामुळें शेषत्वाची हानि होते. म्हणून कार्याहून भिन्न भूत अशा दध्यादिकाला शब्दार्थत्व लब्ध झालें असा भाव. दुसऱ्या पक्षाची शंका घेतो- 'अक्रियात्वेऽपि भूतस्य'= भूताला अक्रियात्व असतांही 'क्रियासाधनत्वात्'= क्रियेचें साधनत्व असल्यामुळें 'क्रियार्थ एव भूतोपदेशः'= क्रियेकरितांच= क्रियाशेषत्वानेंच भूताचा उपदेश आहे. कूटस्थाला तर कार्यशेषत्व नसल्यामुळें त्याचा उपदेश नाही असा भाव. 'इति चेत्'= असें म्हणणे असेल तर काय भूताला कार्यशेषत्व शब्दार्थत्वाकरितां आहे? किंवा फलाकरितां? पहिला पक्ष नाही असें सांगतात- "नैष दोषः"= हा दोष येत नाही कारण 'अक्रियार्थत्वेऽपि'= अक्रियार्थत्व असतांही 'क्रियानिर्वर्तनशक्तिमद्वस्तूपदिष्टमेव'= क्रियेला सिद्ध करणारी शक्ति जिच्यांत आहे, अशी वस्तु उपदेशिलीच आहे. दध्यादिकाला कार्यशेष-

मङ्कस्तूपदिष्टमेव । क्रियार्थत्वं तु प्रयोजनं तस्य । नचैतावता वस्त्वनुपदिष्टं भवति । यदि नामोपदिष्टं किं तव तेन स्यादिति । उच्यते - अनवगतात्म वस्तूपदेशश्च तथैव भवितुमर्हति । तदवगत्या मिथ्याज्ञानस्य संसारहेतो र्निवृत्तिः प्र

॥ व्याख्यान ॥

त्व असतांही शब्दानें वस्तुमात्राळाच उपदेशिलें जातें. कार्यान्वयी शब्दार्थ नाही कारण अन्वित अर्थमात्रांत शब्दाच्या शक्तीचें ग्रहण केलेलें आहे. असा अर्थ. दुसऱ्या पक्षाचा अंगीकार करितात - 'क्रियार्थत्वंतु प्रयोजनंतस्य' = क्रिये करितां असणे हें तर त्या अर्थाचें प्रयोजन आहे. त्याभूतविशेष दध्यादिकाचे क्रियाशेषत्व फळाच्या उद्देशानें अंगीकार केळें जातें, असा अर्थ. ब्रह्माचें तर नाही, असा 'तु' शब्दाचा अर्थ. पण भूताळा कार्यशेषत्वाचा अंगीकार असतां स्वातंत्र्यानें त्यांना शब्दार्थता कशी? त्यावर सांगतात - 'नचैतावता वस्त्वनुपदिष्टं भवति' = एवढ्यानेंच तर वस्तु उपदेशिली नाही, असें होत नाही. फळाकरिता शेषत्वाच्या अंगीकारमात्रानें भूताला शब्दार्थतेचा भंग होत नाही असा अर्थ. आनर्थक्य फळाभाव आहे? अशी परि त्याविकल्पातील दुसऱ्या पक्षाप्रमाणे शंका घेतो - 'यदिनामोपदिष्टं किं तव तेन स्यात्' = पण जर भूतवस्तु उपदिष्ट आहे तर त्यानें तुम्हाळा काय लाभ होईल? जरी दध्यादि स्वतः निष्फळ असले तरी क्रियेच्या द्वारानें सफळत्वामुळें उपदिष्ट आहे, तथापि कूटस्थब्रह्मवाद्याळा क्रियेच्या द्वाराचा अभाव असल्यामुळें त्यादृष्टान्तानें

योजनं क्रियत इति अविशिष्टमर्थवत्त्वं क्रियासाधनवस्तूपदेशेन ।

॥ व्याख्यान ॥

काय फल होणार? असा अर्थ. भूताला साफल्याविषयीं क्रियाच द्वार आहे असा नियम नाही. कारण रज्जूच्या ज्ञानमात्रानें साफल्य दिसतें असें सांगतात - 'उच्यते' = सांगतो. 'अनवगतात्मवस्तूपदेशश्च तथैव भवितुमर्हति' = न कळलेल्या ब्रह्मात्म वस्तूचा उपदेशही दध्यादिकाप्रमाणेंच सफळ होणे योग्य आहे. 'तदवगत्या मिथ्याज्ञानस्य संसारहेतो र्निवृत्तिः प्रयोजनं क्रियते' = कारण त्याच्या ज्ञानानें संसाराळा हेतु अशा मिथ्याज्ञानाची निवृत्ति फळ केलें जातें' इति अविशिष्टमर्थवत्त्वं क्रियासाधनवस्तूपदेशेन' = असें क्रियासाधन दध्यादि वस्तूच्या उपदेशाशी समान सत्यादि शब्दांना अर्थवत्त्व आहे. दध्यादिकांना क्रियेच्या द्वारानें साफल्य आहे. ब्रह्माळा तर स्वतः आहे. असा विशेष असतांही वेदान्तांना सफळ भूतार्थकत्व मात्रानें दध्यादि उपदेशाशीं साम्य आहे. म्हणून हें निर्दोष आहे, असा अर्थ.

पुनः "अपिच आम्नायस्य' या उत्तरपक्षभाष्याचें तात्पर्य सांगण्याकरितां येथीळ पूर्वपक्ष असा - "आम्नायस्य क्रियार्थत्वादानर्थक्यमतदर्थानाम्" असें अक्रियार्थत्व पदांना अर्थशून्यत्व शास्त्रतात्पर्यवेत्ते सांगतात. म्हणून प्रवृत्तिनिवृत्तीच्या व्यतिरिक्त अर्थाळा सांगणाऱ्या शब्दानां निराळंबनत्व असल्यामुळें त्याच्यापासून होणारें वस्तूचें ज्ञान सामान्यतोदृष्ट निबंधन भ्रम आहे. त्यानें प्रवृत्ति निवृत्तीच्या अनुपयोगी वस्तु शब्दापासून कळत नाही. म्हणूनच ती (वे-

॥ व्याख्यान ॥

दोरू वस्तु) मिथ्या आहे. असें म्हणणे शक्य आहे. कारण तद्विषयक प्रमाणान्तराचाही असंभव आहे. पण पुनः प्रवृत्ति निवृत्तींच्या अनुपयोगी वस्तु शब्दावरून कशी कळत नाही? शब्दाचें तेथें सामर्थ्य ग्रहण होत नसल्यामुळें अगृहीत सामर्थ्यच शब्द तर चक्षुरादिका प्रमाणा विज्ञानाला उत्पन्न करीत नाही सामर्थ्याचें ग्रहण तर ज्ञान कार्यावरून केलें जातें. व ज्ञान, विशिष्टार्थविषयक तद्विषयक प्रवृत्ति वरून जाणलें जातें. तिचा अभाव असतां सामर्थ्य कल्पना कोठून होणार? व अकल्पित सामर्थ्य शब्द अक्रियाशेष अर्थात विज्ञान कसें उत्पन्न करील?

सांगतो- सूत्रकार व भाष्यकारांचा अभिप्राय किंवा लौकिक न्याय तूं सम्यक् जाणला नाहीस. तें तूंच पहा— 'देवदत्त! शुक्ल गाईला दंडने वळवून आण' येथें प्रवर्तक आण पदाहून अतिरिक्त देवदत्तादि भूतार्थवादी अप्रवर्तकही पदांचें प्रवर्तकच वाक्यावरून भूतवस्तु विषयकही सामर्थ्य प्रतीत होते? किंवा नाही? जर प्रतीत होते तर आनर्थक्य निष्प्रयोजनत्व होय, निरालंबनत्व नव्हे. ते भाष्यकार "अपि च आम्नायस्य क्रियार्थत्वादानर्थक्यमतदर्थानाम्" या भाष्याने सांगतात. प्रयोजनही अनंतर किंवा परंपरेने सुखप्राप्ति किंवा दुःखपरिहार होईल. म्हणून तदर्थ क्रियेच्या अनुपयोगी अर्थाला सांगणाऱ्या 'सोऽरोदीत्' इत्यादि वाक्यांना आनर्थक्य असो. परंतु ब्रह्मात्मज्ञानांत समन्वित परमपुरुषार्थ फळ असा सत्यादि पदांना निष्प्रयोजनत्व कसें? हें असो पण जरी प्रवर्तकच वाक्यापासून भूतार्थ विषयकही सामर्थ्य प्रतीत होते

॥ व्याख्यान ॥

तथापि (कार्यावाचून) न कळलेल्या (शुद्ध) भूतार्थाच्या ज्ञानाचा संभव नाही. कारण क्रियार्थतेनेंच संसर्ग कळतो. 'गो' पदावरून तर व्युत्पत्तिकालीं त्याचा अर्थ सास्नादिमान् पिंड धर्मत्वाने कळलेला पुनः प्रयोगान्तरांत अप्रतिष्ठित किंवा केसरादिमान् पिण्डधर्मत्वानें प्रतीत होत नाही. विषम उपन्यास (=दृष्टान्त) आहे. 'गो' पदाचे (प्रयोग भेदांत भिन्न) अभिधेयांच्या संबंधानें नानाविध सामर्थ्य उपलब्ध आहे. म्हणून (केवळ त्याची) एकरूपच प्रतीति युक्त आहे. शब्दान्तराच्या अर्थाशीं अन्वय असतां तर प्रति विभक्ति व प्रति पदार्थान्तर प्रयोग भेदावरून संबंध ग्रहण काळींच ग्रहण व त्यागाच्या निबंधनानें अन्यथा अन्यथा समन्वय दिसतो. त्यानें संबंधाच्या योग्यतेला सांगणाऱ्या विभक्ति संयुक्त द्रव्य गुण क्रियेला सांगणाऱ्या पदाशी प्रयोगाच्या ऐदंपर्य वशातेमुळे अनियत संबंध व्युत्पत्तिकाळीं निरूपित आहे. तसाच "वषट्कर्तुः प्रथमभक्षः" "तस्मात्पूषा प्रपिष्टभागः" असा इत्यादिकांत क्रियाशून्यपदांचा समन्वय दिसतो. जो तर 'कर्तव्यः' असा क्रियेशी संबंध ग्रहण केल्या जातो. तो (प्रयोजनाकरितां द्रव्यदेवतेच्या) समन्वयानिमित्तक आहे. त्याच्या निमित्तानें पदाचा समन्वय नाही. जें तर "तद्भूतानां क्रियार्थेन समाम्नायः" असे जैमिनीनें सूत्र केलें आहे. तें ही सिद्ध अशा रूपादि अर्थात वर्तमान पदांचे सामानाधिकरण्यादिकाच्या अर्थत्वानें समाम्नाय= सम्यगुच्चारण आहे. म्हणून आहे. तेही कारण विशेषण विशेष्यत्वानें भाष्यकारांनींच समन्वय दाखविला आहे. 'क्रिया'

॥ व्याख्यान ॥

